संपर्क
संपादकीय : 9922970023 ; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018
महासागर NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २४९ * * अकोला * बुधवार, दिनांक ५ मार्च २०२५ ८ पाने ● किंमत रू. २/- + वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




अग्रलेख

## खरीखरी..

# वसंतऋतु सारखे वसंतराव

महाराष्ट्राच्या राजकीय क्षेत्रात तीन वसंत अत्यंत सुप्रसिद्ध आहेत. त्यापैकी पहिले वसंतदादा पाटील, दुसरे वसंतराव नाईक आणि तिसरे वसंतराव साठे. यापैकी पहिल्या वसंत रावांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आपले मोठे स्थान निर्माण केलेले होते. वसंतदादा मुख्यमंत्री म्हणून जास्त काळ नसले. तरी महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी अनेक महत्त्वाच्या नोंदी केल्या. हरित क्रांतीचे प्रणेते म्हणून महाराष्ट्राला दुसऱ्या वसंतराव नाईकांची ओळख आहे. शेती हाच विकासाचा मूलभूत आधार आहे, असे वसंतराव नाईक यांचे म्हणणे होते. या दोन्ही व्यक्तिमत्त्वा सारखेच प्रसन्न असे, तिसरे व्यक्तिमत्व म्हणजे वसंतराव साठे. कामगारांचे नेते, समाजवादी, विचारवंत आणि वसंतासारखे मोहक व्यक्तिमत्वाचे वसंतराव साठे यांनी 1972 साली तत्कालीन इंदिरा काँग्रेसमध्ये प्रवेश केला आणि त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. 1972 सालामध्ये अकोल्यातून खासदार असलेल्या खान मोहम्मद असगर हुसेन यांचा वसंतराव साठे यांनी पराभव केला. काँग्रेसचे तिकीट मिळाले आणि त्यांनी सहज विजय मिळवला. मुळातच अतिशय हुशार आणि विद्वान असलेल्या वसंतराव साठे यांना इंदिराजींच्या अंतर्गत वतुर्ळात अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. वसंतराव यांनी त्या काळात ब्युरोक्रसी म्हणजेच सरकारी अधिकारी यांची बांधिलकी सत्तारूढ पक्षाशी असली पाहिजे. असे मत व्यक्त करून त्या काळात चांगलीच खळबळ उडवली होती. त्यांचे शब्द तेव्हा खळबळजनक वाटले असले, तरी आता त्याची प्रचिती आपल्यालाही येऊ लागलेली आहे. आज वसंतराव 100 वर्षांचे झाले असते. त्यांनी आपल्या खासदारकीच्या काळात कितीतरी वक्तव्ये देऊन वेगवेगळ्या प्रकारे सरकार सोबतच जनतेची नाडी पकडण्याचा प्रयत्न केला होता. वसंतराव सच्चे समाजवादी होते. त्याकाळी काँग्रेसलाही समाजवादाचे वावडे नव्हते. त्यामुळे ते पक्के काँग्रेसजन म्हणून ओळखले गेले. शब्दप्रभू असलेल्या साठे यांनी काँग्रेसला नवनवीन नारे दिले. इंदिराजींच्या पराभवानंतर 1980 साली 'न जात पर न पात पर, मोहर लगेगी हाथ पर' हा त्यांचा नारा जबरदस्त लोकप्रिय झाला होता. आणीबाणीच्या काळात इंद्रकुमार गुजराल यांच्यानंतर वसंतराव साठे यांच्याकडे माहिती आणि प्रसारण खाते देण्यात आले होते. त्याकाळी भारतात टीव्हीचे युग सुरू झाले होते. जगात सर्वत्र रंगीत टीव्हीचे प्रसारण होत होते. मात्र भारतात रंगीत टीव्ही सुरू झाला नव्हता. त्याकाळी त्यांनी अगदी प्रचंड मोठ्या प्रमाणात पाठपुरावा करून राष्ट्रकुल खेळांच्या आधी रंगीत टीव्हीचे प्रसारण सुरू करून दाखवले. वसंतराव जसे समाजवादी होते तसेच ते विदर्भवादीही होते. इंदिराजींनी वेगळ्या विदर्भाची मागणी जवळजवळ मान्य करून टाकलेली होती. पण काही कारणामुळे घोषणा करण्यात आलेली नव्हती. केंद्रीय मंत्रिमंडळात अनेक खाती सांभाळणा?या वसंतरावांच्या व्यक्तिमत्व जो गोडवा होता. जी रसिकता होती. जे साहित्य प्रेम होते, जी पक्षनिष्ठा होती. त्यासोबतच सर्वांना प्रसन्न करणारे खळखळीत हास्य होते. ही सर्व त्यांची खास वैशिष्ट्ये मानली पाहिजेत. गुंतागुंतीच्या आखाड्यात असूनही त्यांच्या नावाप्रमाणे आपल्या मनातील वसंत-बहार शेवटपर्यंत त्यांनी कायम राखलेली होती. वसंतराव जेव्हा पहिल्यांदा अकोल्यातून निवडून आले. तेव्हा महासागरने एक मथळा दिला होता 'वसंतराव आता दिल्लीत साठेबाजी करणार' आणि नंतरच्या काळात ते अक्षरशः खरे ठरले. वर्धा येथील त्यांनी लढवलेल्या शेवटच्या लोकसभा निवडणुकीत कॉम्रेड रामचंद्र घंगारे यांनी त्यांचा पराभव केला. त्यानंतर त्यांची साठेबाजी तिथेच थांबली. त्यांना या पराभवाची जराही अपेक्षा नव्हती. पण त्यानंतर त्यांच्या मनाची चलबिचल त्यांना थांबविता आली नाही. विदर्भ राज्य व्हावे, ही त्यांची इच्छा होती. पण ती फलद्रूप झाली नाही. याची त्यांना शेवटपर्यंत खंत राहिली. वसंतरावांच्या या मोहक हास्याला आमचा मनापासून मानाचा मुजरा!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# अखेर विकेट पडलीच!

## धनंजय मुंडेंचा राजीनामा

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :



बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर अखेर राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी सायंकाळी झालेल्या एका बैठकीत मुंडे यांना आपल्या पदाचा राजीनामा देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार आज धनंजय मुंडे यांनी आपल्या पीए व ओएसडींच्या मार्फत आपला राजीनामा मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केला. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी तो तत्काळ स्वीकारला.

बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याकांडामुळे धनंजय मुंडे अडचणीत सापडले होते. विरोधकांनी सातत्याने त्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती. अखेर सोमवारी संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आणि अवघा महाराष्ट्र अस्वस्थ झाला. यामुळे सरकारवरील दबाव वाढल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापुढे धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतल्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय उरला नाही. अखेर त्यांनी राजीनामा मागितला आणि धनंजय मुंडे यांनी तो लागलीच दिला.

आता या प्रकरणी धनंजय मुंडे यांच्या सखोल चौकशीची मागणी केली जात आहे. कदाचित भविष्यात त्यांची आमदारकी धोक्यात येवू शकते. त्याचप्रमाणे त्यांच्यावर अटकेचीही टांगती तलवार येऊ शकते.

**संतोष देशमुख हत्याकांडामुळे अडचणीत**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी निर्घृण हत्या करण्यात आली. या हत्येशी संबंधित खंडणी प्रकरणात वाल्मीक कराडला अटक करण्यात आली. वाल्मीक कराड हा धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय असल्यामुळे विरोधकांनी मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी केली. पण महायुती सरकारने आजपर्यंत चालढकल केली. पण अखेर सोमवारी देशमुख यांच्या निर्घृण हत्येचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आणि सरकारचा नाईलाज झाला. मुख्यमंत्र्यांनी धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागितला व तो तत्काळ स्वीकारला.

### सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून राजीनामा

संतोष देशमुख हत्या प्रकरणी अखेर राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे यांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

माझ्या सद्सद्विवेक बुद्धीला स्मरून आणि वैद्यकीय कारणांमुळे मी माझ्या मंत्रिपदाचा राजीनामा मुख्यमंत्र्यांकडे सुपूर्द केला, असे धनंजय मुंडे यांनी एका ट्विटद्वारे स्पष्ट केले आहे.

**नैतिकतेच्या आधारावर राजीनामा**

धनंजय मुंडे यांनी नैतिकतेच्या आधारावर आपला राजीनामा दिला आहे, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले आहे. ते विधिमंडळ परिसरात प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलत होते.

## कोकाटेही रांगेत

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांना नाशिक कोर्टाने २ वर्षांची कैद व ५० हजार रुपयांच्या आर्थिक दंडाची शिक्षा ठोठावली आहे. मुख्यमंत्री कोट्यातील सदनिका खोटी माहिती देऊन लाटल्याप्रकरणी ते गोत्यात आलेत. त्यामुळे त्यांच्या राजीनाम्याची मागणी होते आहे. सोबतच त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई करा, अशी मागणी होते आहे.

विधिमंडळ अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी हा मुद्दा उपस्थित झाला होता. मात्र, सध्या कोकाटे यांच्या प्रकरणाची सुनावणी पूर्ण झाली नाही. ही सुनावणी ज्यावेळेस पूर्ण होईल, त्यानंतर सभागृह किंवा राज्यपाल या प्रकरणी योग्य तो निर्णय घेतील, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

## सव्वातास बैठक आणि फिरली चक्रे!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :

बीडचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडात कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे सहकारी वाल्मीक कराड याला आरोपी करण्यात आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे मंत्री धनंजय मुंडे यांनी अखेर राजीनामा दिला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या बंगल्यावर मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत मुंडेंच्या राजीनाम्याचा निर्णय घेण्यात आला. संतोष देशमुख हत्या प्रकरणाच्या जवळपास तीन महिन्यांनंतर आज मुंडेंनी राजीनामा दिला आहे.

**फडणवीस- अजितदादांच्या बंगल्यावर**

काल मुख्यमंत्री उपमुख्यमंत्र्याकडे गेले. तिथे बैठक झाली. दोन्ही नेत्यांमध्ये जवळपास सव्वा तास चर्चा झाली. त्या ठिकाणी आधीच राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि धनंजय मुंडे उपस्थित होते. या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी वाढलेल्या दबावाचे कारण देतानाच, व्हायरल फोटोमुळे वातावरण तापण्याची शक्यता लक्षात घेत धनंजय मुंडेंना राजीनामा देण्याच्यासूचना दिल्या.

धनंजय मुंडे यांनी माज्याकडे राजीनामा दिला असून मी तो स्वीकारला आहे. पुढील कारवाहीसाठी तो राज्यपालांकडे पाठविला असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.



## औरंगजेब मुद्यावर सत्ताधाऱ्यांचे आधीच आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी,मुंबई, दि. ४ :

समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांनी औरंगजेबाचे समर्थन करणारे वक्तव्य केल्यामुळे राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

विरोधकांनी मंत्री धनंजय मुंडे आणि माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्यासाठी विधानभवनाच्या पायऱ्यांवर आंदोलन करण्याचे ठरवले होते. मात्र, आंदोलन सुरू होण्याआधीच सत्ताधारी आमदारांनी पायऱ्यांवर आपली जागा अडवली, त्यामुळे विरोधकांना मागे उभे राहून आंदोलन करावे लागले. सत्ताधाऱ्यांची आक्रमक भूमिका

### विरोधकांना पायऱ्यांवर जागा मिळाली नाही

विधानभवनाच्या पायऱ्यांवर सामान्यतः विरोधक आंदोलन करताना दिसतात, मात्र यावेळी सत्ताधारी पक्ष अधिक आक्रमक भासला. भाजपा आणि शिवसेनेच्या आमदारांनी अबू आझमी यांच्या वक्तव्याचा निषेध करत जोरदार घोषणाबाजी केली. त्यामुळे विरोधकांचे आंदोलन ढवळून निघाले आणि त्यांना मागे उभे राहावे लागले.

**विरोधकांमध्ये एकजुटीचा अभाव?**

विरोधकांना आपल्या मुद्द्यावर एकसंघ राहता येत नसल्याचे यातून स्पष्ट झाले. सत्ताधाऱ्यांच्या आक्रमक भूमिकेमुळे विरोधक माध्यमांसमोर स्वतःचा मुद्दा प्रभावीपणे मांडण्यात अपयशी ठरले. सत्ताधारी पक्षाने विरोधकांची जागा व्यापताच त्यांचे आंदोलन दुय्यम ठरले.

आंदोलनाच्या पद्धतीवरून सत्ताधारी पक्ष आणि विरोधक यांच्यातील टोकाची भूमिका स्पष्ट झाली आहे. औरंगजेबाच्या मुद्द्यावरून सत्ताधारी अधिक आक्रमक भासत असून, विरोधकांकडे ठोस रणनीतीचा अभाव आहे, आजच्या आंदोलनात ते दिसले, असे राजकीय निरीक्षकांचे मत आहे.

## अमेरिकेने युक्रेनची लष्करी मदत थांबवली

■ वृत्तसंस्था, वॉशिंग्टन, दि. ४ :

व्हाईट हाऊसमध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी झालेल्या चर्चेच्या तीन दिवसांनंतर, अमेरिकेने युक्रेनला लष्करी मदत थांबवण्याची घोषणा केली आहे. ब्लूमबर्गने दिलेल्या वृत्तानुसार, हा आदेश तात्काळ लागू होईल. अमेरिकेकडून अद्याप युक्रेनपर्यंत न पोहोचलेली मदत देखील रोखण्यात आली आहे. पोलंडमध्ये पोहोचलेल्या वस्तूंचाही समावेश आहे.

युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की खरोखर शांतता इच्छितात याची खात्री राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांना होईपर्यंत युक्रेनला थांबवलेली मदत पूर्ववत केली जाणार नाही. युक्रेनला लष्करी मदत थांबवण्याबाबत अमेरिकेच्या संरक्षण विभागाने किंवा राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी अद्याप कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही. डोनाल्ड ट्रम्प आणि व्होलोडिमिर झेलेन्स्की यांची २८ फेब्रुवारी रोजी भेट झाली. अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या ओव्हल ऑफिसमध्ये दोघांमध्ये वाद झाला. ब्लूमबर्गने संरक्षण विभागाच्या एका अधिकाऱ्याचा हवाला देत म्हटले आहे की, अध्यक्ष ट्रम्प झेलेन्स्की रशियासोबत शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहेत का याचा आढावा घेत आहेत.

न्यू यॉर्क टाईम्सच्या मते, याचा परिणाम एक अब्ज डॉलर्स (८.७ हजार रुपये) किमतीच्या शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा मदतीवर होऊ शकतो. युक्रेनला फक्त अमेरिकन संरक्षण कंपन्यांकडून थेट नवीन लष्करी हार्डवेअर खरेदी करण्यासाठी मिळणारी मदत रोखली जाते.

## अबू आझमीला निलंबीत करा..

### विरोधकांचा विधानसभेत गोंधळ

**सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब**

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :

समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांच्या औरंगजेब समर्थनाच्या वक्तव्यावरून विधानसभेत आज मोठा गदारोळ झाला. सत्ताधारी पक्षाने त्यांच्या तात्काळ निलंबनाची मागणी करत जोरदार घोषणाबाजी केली. यामुळे सुरुवातीला दहा मिनिटे, नंतर अर्धा तास, आणि अखेर दिवसभरासाठी कामकाज तहकूब करावे लागले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी तारांकित प्रश्नोत्तरांची सुरूवात होण्याआधीच सत्ताधारी आमदारांनी आझमी यांच्या निलंबनाची मागणी केली. आमदार सुधीर मुनगंटीवार, अतुल भातखळकर आणि मंत्री उदय सामंत यांनी तीव्र भावना व्यक्त केल्या. आझमी यांच्या वक्तव्याचा निषेध करत सत्ताधारी आमदारांनी जोरदार घोषणाबाजी केली.

विरोधी पक्षाने या गदारोळात संयमित भूमिका घेतली, मात्र सत्ताधारी आमदार आक्रमक राहिले. विधानसभेतील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) नेते भास्कर जाधव यांना बोलण्याची संधी मिळताच सत्ताधारी पक्षाने गोंधळ वाढवला.

विधानसभा अध्यक्षांनी प्रथम दहा मिनिटांसाठी कामकाज स्थगित केले, नंतर गोंधळ वाढल्याने अर्धा तास तहकूब केले. मात्र, वातावरण तणावपूर्ण राहिल्याने अखेरीस विधानसभेचे कामकाज संपूर्ण दिवसासाठी तहकूब करण्यात आले.

सत्ताधारी पक्षाच्या आक्रमक भूमिकेमुळे अबू आझमी यांच्या निलंबनाचा मुद्दा अधिक चिघळण्याची शक्यता आहे. विरोधकांनी शांत भूमिका घेतली असली तरी सत्ताधाऱ्यांनी सभागृहात घेतलेला आक्रमक पवित्रा राजकीयदृष्ट्या महत्त्वाचा मानला जात आहे.

## वडेट्टीवार समर्थकांचा भाजपमध्ये प्रवेश



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

काँग्रेस विधीमंडळ नेते तथा माजी विरोधी पक्ष नेते आमदार विजय वडेट्टीवार यांचे खंदे समर्थक तथा ब्रम्हपुरी नगर परिषदेचे माजी गटनेते विलास विखार, माजी उपाध्यक्ष डॉ. सतिश कावळे, गौरव अशोक भैय्या, माजी पंचायत समिती सभापती नामदेव लांजेवार, सुरेश दुर्वे यांनी मुंबईत भाजप प्रदेशाध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावणकुळे यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केल्याने काँग्रेसला खिंडार पडले आहे.

विशेष म्हणजे आठ दिवसांपूर्वी याच कार्यकर्त्यांसह वडेट्टीवार यांनी ब्रम्हपुरीत स्वतःच्या बंगल्यावर राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेशाची चर्चा केल्याची माहिती आहे.

काँग्रेस विधीमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार मागील पाच वर्षापासून सत्तेपासून दूर आहेत. वडेट्टीवार सत्तेत नसल्यामुळे अस्वस्थ आहेत. याच अस्वस्थतेतून आठ दिवसांपूर्वी वडेट्टीवार यांनी ब्रम्हपुरी येथील निवासस्थानी काही विश्वासू सहकाऱ्यांना बोलावून घेतले. यावेळी वडेट्टीवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात प्रवेशाचा प्रस्ताव सर्वांसमोर ठेवला.

मात्र या प्रस्तावाला अनेकांनी विरोध केला. वडेट्टीवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला तर त्यांना आमदारकीचा राजीनामा द्यावा लागेल आणि पून्हा निवडणूक लढवून निवडून यावे लागेल.

राष्ट्रवादीत जाण्याची इच्छा नसलेल्या ब्रह्मपुरी विधानसभेतील गौरव अशोक भैय्याजी, नगर परिषद माजी गटनेते विलास विखार, माजी नगर परिषद उपाध्यक्ष डॉ. सतीश कावळे, पंचायत समितीचे माजी सभापती नामदेव लांजेवार, सुरेश दर्वे यांसह अनेकांनी आज मुंबईत भाजपात प्रवेश केला.

प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, चिमूरचे आमदार बंटी भांगडिया यांच्या नेतृत्वाखाली हा पक्ष प्रवेश झाला. भाजपा नेतृत्व आणि कार्यावर विश्वास ठेवूनच मागच्या ५० वर्षापासून काँग्रेसशी जोडलेल्या भैय्या कुटुंबातील अशोक भैय्याजी यांचे पुत्र गौरव, विलास विखार विजय वडेट्टीवार यांचे खंदे समर्थक कावळे यांनी भाजपामध्ये प्रवेश केला.

# भारत विजयाच्या उंबरठ्यावर







■ वृत्तसंस्था, दुबई, दि. ४ :

चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पहिल्या उपांत्य सामन्यात टीम इंडिया ऑस्ट्रेलियाविरुद्ध २६५ धावांचे लक्ष्य गाठत असल्याचे दिसून आले. अखेरचे वृत्त हाती आले संघाने ४२.४ षटकांत ५ बाद २२५ धावा केल्या होत्या. केएल राहुल आणि हार्दिक पांड्या क्रीजवर होते.

विराटने त्याचे अर्धशतक पूर्ण केले होते. त्याने ॲडम झाम्पाच्या चेंडूवर चौकार मारून आपले अर्धशतक पूर्ण केले. कोहलीचे हे ७४ वे अर्धशतक आहे. ९८ धावात ८४ धावा करून तो बाद झाला.

श्रेयस अय्यर ४५ धावा करून बाद झाला, कर्णधार रोहित शर्मा २८ धावा करून बाद झाला आणि शुभमन गिल ८ धावा करून बाद झाला. श्रेयसला ॲडम झाम्पाने बोल्ड केले. रोहितला कूपर कॉनोलीने एलबीडब्ल्यू केले. बेन द्वारशीसच्या एका चेंडूवर गिल प्लेड-ऑन झाला.

मंगळवारी दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. संघ ४९.३ षटकांत २६४ धावांवर ऑलआउट झाला. कर्णधार स्टीव्ह स्मिथने ९६ चेंडूत ७३ धावांची खेळी केली. ॲलेक्स कॅरीने ६१ आणि ट्रॅव्हिस हेडने ३९ धावा केल्या. भारताकडून मोहम्मद शमीने ३ विकेट्स घेतल्या. रवींद्र जडेजा आणि वरुण चक्रवर्ती यांनी प्रत्येकी २-२ विकेट घेतल्या.

## मंत्री जयकुमार रावल यांनी जमीन बळकावली



■ वृत्तसंस्था, धुळे, दि. ४ :

राज्याचे पणन मंत्री व धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच राज्य शिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची तब्बल 26 एकर जमीन हडप केल्याचे समोर आले आहे. हा आरोप माजी आमदार अनिल गोटे यांनी केला आहे. माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची दिंडाईचा शिवारातील 26 एकर जमीन जयकुमार रावल यांनी हाड केल्याचा आरोप अनिल गोटे यांनी केला आहे.

याप्रकरणी धुळे जिल्हा न्यायालयाने रावल कुटुंबाने राष्ट्रपतींची हडप केलेली जमीन त्यांना परत करण्याचे आदेश दिल्याचे देखील माहिती पुढे आली आहे. अनिल गोटे यांनी जयकुमार रावल यांच्यावर टीका केली आहे. गोटे म्हणाले, राष्ट्रपती असलेल्या प्रतिभाताई पाटील यांना जयकुमार रावल आणि त्यांच्या कुटुंबीयांनी सोडले नसून इतर गरीब कुटुंबीयांचे काय? असा प्रश्न गोटे यांनी उपस्थित केला आहे.

## अबू आझमीवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा



### एकनाथ शिंदेंची विधासभेत मागणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ४ :

अबू आझमी यांनी औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता. औरंगजेब आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्यात धर्माची नाही, तर सत्तेसाठी होती, असे विधान केले होते. त्यांच्या या विधानाचे पडसाद विधानसभेतही पाहायला मिळाले. औरंगजेबाचे गोडवे गायल्याबद्दल सपाचे आमदार अबू आझमी यांच्यावर गुन्हा दाखल करावा, औरंगजेबाचे गुणगान गाणाऱ्यांना सभागृहात बसण्याचा अधिकार नाही, असेही शिंदे म्हणाले.

अबू आझमी यांच्या औरंगजेबावरील वक्तव्यावरून सभागृहात गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले. अबू आझमींना निलंबित करावे आणि त्यांच्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी सत्ताधारी नेत्यांकडून करण्यात आली होती. या मागणीनंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी सभागृहाचे आजचे दिवसभराचे कामकाम स्थगित केले.

काल, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या मारेकऱ्याचे म्हणजेच औरंग्याचे गोडवे अबू आझमीने गायले. खरे म्हणजे अबू आझमीचा निषेध करायला हवा. अबू आझमीचा धिक्कार करतो. अबू आझमी वारंवार छत्रपतींचा जाणीवपूर्वक अपमान करतो, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले.

# धनंजय मुंडे यांची आमदारकी रद्द होणार का?

■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई , दि. ४ :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणाचे फोटो आणि व्हिडिओ सोमवार ३ मार्च रोजी समोर आले आणि मंगळवार ४ मार्च रोजी मंत्री धनंजय मुंडे यांची विकेट पडली. त्यांचा राजीनामा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. मात्र, हा राजीनामा दिल्यानंतरही धनंजय मुंडे यांनी एक ट्विट केले. ते वादात सापडले. त्यात आपण वैद्यकीय कारणाने राजीनामा दिल्याचा उल्लेख केला. यानंतर अंजली दमानिया आक्रमक झाल्यात. त्यांनी धनंजय मुंडे यांची आमदारकी रद्द होईपर्यंत शांत होणार नाही, असा इशारा दिला. खरेच धनंजय मुंडे यांची आमदारकीही रद्द होणार का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

संतोष देशमुख हत्याकरांड प्रकरणात वाल्मीक कराड हा प्रकरणाचा सूत्रधार असल्याचे तपास यंत्रणेने आरोपपत्रात नमूद केले. तत्पूर्वी वाल्मीक कराड माझा खास असल्याचे स्वत: धनंजय मुंडेंनी कबूल केले होते. त्यामुळे त्यांच्या मंत्रि?पदाभोवती आपोआप फास घट्ट व्हायला सुरुवात झाली. त्यातच संतोष देशमुख यांना हालहाल करून मारल्याचे व्हिडिओ आणि फोटो काल समोर आले.

दुसरीकडे विधिमंडळ अधिवेशन सुरू. धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला नसता, तर विरोधकांचे सभागृहात आणि बाहेरही आरोप वाढले असते. क्रूर हत्याकांड प्रकरणात सरकारची

## मंत्रिपद गेले, आता राजकीय करिअरही पणाला



प्रतिमा अजून मलीन झाली असती, हे टाळण्यासाठी अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी फोटो आणि व्हिडिओ लीक होताच दुस?याच दिवशी धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला.

धनंजय मुंडे यांचे राजकीय कारकीर्द पणाला लागली आहे. त्यांचे राजकारणातले भविष्य तूर्तास तरी अंधारलेले आहे. हत्याकांडातले आरोपी राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघटनेचे पदाधिकारी होते. विष्णू चाटे हा तालुकाध्यक्ष होता. या खुनाचा सूत्रधार असलेला वाल्मीक कराड. त्याच्यावर अनेक गुन्हे दाखल होते, असे असतानाही तो धनंजय मुंडे यांचा खास माणूस होता. विशेष म्हणजे धनंजय मुंडे यांच्या शिफारसीवरून वाल्मीक कराड याची लाडकी बहीण योजनेच्या परळी मतदारसंघाच्या समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती. हे सारे संबंध पाहता धनंजय मुंडे यांची राजकीय वाटचाल अत्यंत कठीण आहे. आमदार सुरेश धस आणि मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे यांनी त्यांच्याविरोधात जोरदार मोट बांधलीय. मनोज जरांगे यांनी तर त्यांच्यावर राजकीय बहिष्णार टाकण्याचे आव्हान समाजाला केले आहे.

### आमदारकीचे काय होणार?

धनंजय मुंडे यांना सहआरोपी करण्याची मागणी होते आहे. मात्र, तसे पुढे होणार का, हे पाहावे लागेल. तसे झाले तरीही धनंजय मुंडे यांची आमदारकी तातडीने रद्द होणार नाही. कारण नुसते सहआरोपी करूनही भागणार नाही. त्यात धनंजय मुंडे यांचा सहभाग सिद्ध व्हावा लागेल. कोर्टात शिक्षा झाली, तर त्यांची आमदारकी रद्द होऊ शकते. मात्र, हा खटला कधीपर्यंत चालणार, पुढे तपास कसा होणार आणि आरोपीमध्ये आणखी काही नावे येणार का, हे सारे पाहावे लागेल. मात्र, याउपरही मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांनी त्यांना आमदारकीचा राजीनामा द्यायला सांगितला आणि त्यांनी तो दिला, तर हे होऊ शकते. पण हे इतक्या सहज होईल, असे वाटत नाही.

### कायदा काय सांगतो?

सर्वोच्च न्यायालयाच्या दिशानिर्देशांनुसार जर एखादा लोकप्रतिनिधी फौजदारी प्रकरणात दोषी ठरवला गेला. त्याला किमान दोन वर्षांची शिक्षा झाली, तर त्या लोकप्रतिनिधीला कोणतेही सार्वजनिक पद भूषविता येत नाही. तो निवडणूक लढवण्यासही अपात्र ठरतो. राज्यघटनेतील अनुछेद १९२ नुसार राज्य सरकारचा विधी व न्याय विभाग ही माहिती राज्यपालांना पाठवतो. ते त्यावर केंद्रीय निवडणूक आयोगाचा सल्ला घेतात.

महाराष्ट्रातले पहिले प्रकरण

फौजदारी स्वरूपाच्या गुन्ह्यामुळे आमदारकी रद्द होण्याचे महाराष्ट्रातील पहिलेच प्रकरण आहे काँग्रेस नेते सुनील केदार यांचे. नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील १५० कोटी रुपयांच्या रोखे घोटाळ्यात त्यांना पाच वर्षांच्या कारावासाची शिक्षा झाली. त्यामुळे त्यांची आमदारकी रद्द करण्यात आली. ते काँग्रेसचे सावनेरचे आमदार होते. काही काळ त्यांनी मंत्रीपदही भूषवले होते. केदार यांना जिल्हा सत्र न्यायालयाने पाच वर्षांची कारावासाची शिक्षा सुनावली होती. लोकप्रतिनिधत्व कायद्यातील कलम १४१ (१) (ई) नुसार दोन वर्षांपेक्षा जास्त शिक्षा झालेल्या लोकप्रनिधीचे सदस्यत्व रद्द होते. त्यानुसार केदार यांची आमदारकी रद्द करण्यात आली होती, तशी अधिसूचना विधिमंडळ सचिवालयाने काढली होती. केदार यांना शिक्षा सुनावण्यात आलेल्या २२ डिसेंबर या तारखेपासून ही आमदारकी रद्द केली होती.

## देर आयें दुरुस्त आयें....
# पंकजा मुंडेंनी केले धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचे स्वागत

■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई , दि. १२ :**भाजप नेत्या आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचे स्वागत केले आहे. धनंजय मुंडेंचा राजीनामा फार आधीच व्हायला हवा होता. धनंजयने देखील आधीच राजीनामा द्यायला पाहिजे होता, असे त्या म्हणाल्या. धनंजय मुंडेचा राजीनामा घेणाजयांनी आधी घेतला असता, तर त्याला गरिमामय एक मार्ग मिळाला असता. खुर्चीवर बसून विचार करताना राज्याच्या प्रत्येकाच्या सारख्याचा विचार केला पाहिजे. संतोष देशमुखांच्या जीवाच्या, परिवारांच्या वेदनांपुढे हा निर्णय मोठा नाही. देर आए दुरुस्त आए, अशी प्रतिक्रिया पंकजा मुंडे यांनी दिली.

### ते व्हिडिओ बघायची माझी हिंमत झाली नाही

मी पंकजा गोपीनाथ मुंडे आहे. त्यामुळे मी या विषयावर व्यक्त होणे आपल्याला अपेक्षा आहे. त्याप्रमाणे मी व्यक्त होत आहे. हा विषय माणुसकीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. संतोष देशमुखांना मारण्याच्या संदर्भातले काही व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाले. मला त्याविषयी माहिती नाही. पण इन्स्टाग्रामवर एक पोस्ट पाहिली. तेव्हा ते व्हिडिओ उघडायची किंवा बघायची माझी हिंमत झाली नाही.

ज्यांनी संतोष देशमुखांना जेवढ्या अमानुषपणे मारले आणि मारहाण करून व्हिडिओ केला. त्यांच्यामध्ये जेवढी निर्मनुष्यता आहे किंवा या व्हिडिओचा काही तरी वापर करायचा, असा कुणी प्रयत्न करत असेल, त्याच्यामध्ये देखील जी निर्मनुष्यता आहे, ती माझ्यामध्ये नाही. ते बघण्याची माझी हिंमत नाही, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

संतोष देशमुखांच्या हत्येनंतर मी पहिल्यांदा मुख्यमंत्र्यांना पत्र दिले होते, ज्या मुलांनी ही हत्या केली, त्या मुलांमुळे समस्त राज्यातील समाज, ज्यांचा काहीही दोष नाही. तो सुद्धा



मान खाली घालून गंभीरपणे वावरत आहे. खरे तर त्या समाजाची मुले आणि ज्याची इतकी निर्घृण हत्या झाली, तो समाज एका आक्रोशात वावरत आहे.

समाज आणि जात याच्यावर बोलायची गरज नाही. पण आता परिस्थितीच अशी आहे. प्रत्येक गोष्ट जातीवर जाते. गुन्हेगाराला कुठलीही जात नसते. कुणाला निर्दयीपणे संपवणाजयाला कुठलीही जात नसते. त्याच्यावर निर्णय घेणाजया राज्यकर्त्यांना सुद्धा जात नसली पाहिजे, असे पंकजा मुंडे म्हणाल्या.

धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याचे मी स्वागत करते. हा राजीनामा फार आधी व्हायला पाहिजे होता. या राजीनाम्यापेक्षा शपथच व्हायला नको होती. तर या सगळ्या गोष्टींना कदाचित सामोरे जावे लागले नसते. राजीनामा घेणाजयांनी सुद्धा आधी घ्यायला पाहिजे होता. धनंजयने सुद्धा आधी द्यायला पाहिजे होता. या सगळ्या वेदनांपासून कदाचित गरिमामय त्याला मार्ग मिळाला असता.

मी त्याची बहीण असले, तरी आम्ही वेगवेगळ्या पक्षात काम केले होते. त्या पोराच्या परिवाराच्या, त्याच्या जिवाच्या वेदनांपुढे धनंजय मुंडेंचा राजीनामा काहीही मोठा निर्णय नाही. धनंजय मुंडेंनी जो निर्णय घेतला, ते योग्यच केले आहे. मला वाटते देर आयें दुरुस्त आयें, असे मत पंकजा मुंडे यांनी व्यक्त केले.

## ही सर्व नैतिकतेची हत्या
# विजय वडेट्टीवारांची महायुतीवर टीका

■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई , दि. १२ :** बीड प्रकरणातील हैवानांचे हे फोटो व्हिडिओ मागील २ महिन्यांपासून राज्याचे गृहमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे होते. आणि तरीही धनंजय मुंडे यांचा राजीनामा न घेता नैतिकतेची हत्या तुम्ही केली, असे म्हणत काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर टीका केली आहे.

विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, पोलिस स्टेशनमधील सीसीटिव्ही बंद करून वाल्मीक कराडला पोलिस कोठडीत सर्व पंचतारांकित सुविधा दिल्या जात आहे. कारण ते मंत्री धनंजय मुंडे यांचे खासमखास असून त्यांच्याशिवाय मुंडेंचे पान हालत नाही.

विजय वडेट्टीवार यांनी ट्विट केले आहे की, बीड प्रकरणातील हैवानांचे हे फोटो व्हिडिओ मागील २ महिन्यांपासून राज्याचे गृहमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याकडे होते. आणि तरीही धनंजय मुंडे यांचा राजीनामा न घेता नैतिकतेची हत्या तुम्ही केली! पोलिस स्टेशन मधील सीसीटिव्ही बंद करून वाल्मीक कराडला पोलिस कोठडीत सर्व पंचतारांकित सुविधा दिल्या.

विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, हे सगळं का ? तर महायुतीतील मंत्री धनंजय मुंडे यांचा खासमखास आणि त्याच्याशिवाय या मंत्र्याचा पान ही हलत नाही म्हणून हैवान वाल्मीक कराड आणि त्याच्या साथीदारांचे लाड गृहमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पोलिसांनी पोसले.

संपूर्ण महाराष्ट्राला चीड येईल असे संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो आता महाराष्ट्रापुढे आले आहे. पण धनंजय मुंडेंचा राजीनामा घेण्याची हिंमत अजूनही या सरकारने दाखवली नाही. राजीनाम्याला खूप उशीर झाला, आता तरी मुख्यमंत्री आणि उपमख्यमंत्र्यांनी राजीनामा घ्यावा, अशी मागणी केली आहे.

# पंकजा मुंडे इंटरनॅशनल नेत्या, त्यांना बीडचे प्रश्न विचारू नका

### सुरेश धस यांचा टोला

■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई , दि. १२ :** पंकजा मुंडेंना इंटरनॅशनल नेत्या आहेत. त्यांना बीड जिल्ह्याबद्दल सोयरसुतक राहिलेले नाही. इथून पुढे तुम्ही त्यांना डोनाल्ड ट्रम्प, बायडन, पुतीन, गाझा पट्टी, डेन्मार्क जर्मनी या देशांतील हवामानाचे प्रश्न विचारत जा असा टोला भाजप आमदार सुरेश धस यांनी लगावला आहे.

सुरेश धस पुढे बोलताना म्हणाले की, बीड जिल्ह्यात इतकी दुदैर्वी घटना घडली आहे. माझी पंकजा मुंडे यांना विनंती आहे की, आता तरी संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांना भेटून यावे. संतोष देशमुख आणि धनंजय देशमुख हे दोघे भाऊ भाजपचे बुथप्रमुख होते, अशी आठवणही धस यांनी पंकजा मुंडेंना करुण दिली आहे.

सुरेश धस म्हणाले की, देशमुख बंधूनी लोकसभा निवडणुकीच्या वेळी पंकजा मुंडे यांच्यासाठी भाजपच्या बुथवर काम केले आहे. पंकजा मुंडे यांच्याकडून किमान आपल्या बुथप्रमुखाच्या बाबतीत असंवेदेशनली वक्तव्य होईल असं वाटले नव्हते.

आमदार सुरेश धस म्हणाले की, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील सर्व आरोपींना वर्षभराच्या आत फाशी देण्यात यावी. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी कुणालाच सोडणार नाही असे स्पष्ट केले होते, आणि त्यांनी दिलेला शब्द पूर्ण केला असेही धस यांनी म्हटले आहे. खंडणीमुळेच ही हत्या झाली आहे. धनंजय मुंडेंनी खंडणी संदर्भात त्यांच्या बंगल्यावर बैठक झाली की नाही याबद्दल उत्तर द्यावेच.

आमदार सुरेश धस म्हणाले की, एसआयटीने पुढील तपास करावा. धनंजय देशमुख, यांच्यासह मस्साजोगकरांनी केलेल्या मागण्याचा तपास झाला पाहिजे. यातील एक मागणी मंजूर पूर्ण झाली आहे. यातील बरेच आरोपी हे बाहेर आहेत. त्यांचीपण चौकशी झाली पाहिजे. संतोष देशमुखच्या खूनाचे पान धनंजय मुंडेंच्या परस्पर कसे हलले असा सवाल धस यांनी केला आहे. मी आधीपासूनच सांगत होतो की, हे खूप भयंकर आहे. आमच्या जिल्ह्यातील नपेत्यांची संवेदनशीलता संपलेली दिसली. मी जे सांगितले होते ते सर्व मुद्दे कालच्या फोटोतून पुढे आले आहेत.

## बुद्धगया टेम्पल मॅनेजमेंट कमिटी ॲक्ट रद्द करा
# भाजपा एससी मोर्चाचे जिल्हाधिकारी मार्फत राष्ट्रपती व पंतप्रधानांना निवेदन

■ महासागर प्रतिनिधी,
**अमरावती, दि. ४ :** महाबोधी बुद्ध विहाराचे व्यवस्थापन बौद्ध समुदायांच्या ताब्यात देण्यात यावे यासाठी देश विदेशातील बौद्ध भिक्षू आणि बौद्ध भिक्षूनि यांनी १२ फेब्रुवारी पासून महाबोधि बुद्ध विहार या ठिकाणी आमरण आंदोलनासाठी बसलेले आहेत बौद्ध विहार बौद्ध समुदायांच्या ताब्यात देण्यात यावे हा केवळ धार्मिक मुद्दा नाही तर हा मुद्दा बुद्धांच्या आत्म सन्मानाचा आहे अस्तित्वाचा आहे अधिकाराचा आहे आणि मान सन्मानाचा मुद्दा आहे असे कथन राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांना दिलेल्या लेखी निवेदनामधून भारतीय जनता पार्टी अनुसूचित जाती मोर्चाचे सरचिटणीस संजय आठवले यांनी केले . जिल्हाधिकारी अमरावती यांच्यामार्फत राष्ट्रपती आणि पंतप्रधान यांना भाजपा शहर संघटक गजानन देशमुख भाजपा किसान मोर्चा अध्यक्ष मिलिंद बांबल डॉ. धनराज चक्रे, मनोहर बारसे, सचिन पाटील सरचिटणीस संजय आठवले राजेंद्र तांबेकर वैशाली प्रधान, सरला गडलिंग लता खेडकर विशाल डोके नागेंद्र तायडे यांच्या



नेतृत्वात निवेदन देण्यात आले. बौद्धांची संस्कृती व वारसा आणि ओळख अबाधित ठेवण्यासाठी बौद्ध भिक्षू आणि बौद्ध भिक्षुनी यांनी महाबोधी विहाराचे आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनादरम्यान स्थानिक राजकीय नेते मंडळी राजकीय हस्तक्षेप करीत असल्याचे आंदोलनकर्त्यांच्या निदर्शनास आले आहे.

स्थानिक नेत्यांचा राजकीय हस्तक्षेप तात्काळ थांबविण्यात यावा आणि याकडे राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांनी लक्ष केंद्रित करून महाबोधी बुद्ध विहार बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे . बोधगया टेम्पल मॅनेजमेंट कमिटी १९४९ च्या संविधानिक आणि आंतरराष्ट्रीय सांस्कृतिक कायद्यानुसार बौद्धांच्या ताब्यात महाबोधी विहार देण्यात यावे आणि हा कायदा रद्द करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे. बौद्ध धर्माची खरी ओळख भगवान बुद्ध आणि सम्राट अशोक हेच आहेत भारत देशाचे चिन्ह सम्राट अशोकाचे चिन्ह आणि सम्राट अशोक बौद्ध अनुयायांसाठी पूज्यनीय आहेत त्यांचा मानसन्मान करणे प्रत्येक बुद्ध अनुयायी यांचे नैतिक जबाबदारी आहे. महाबोधी बुद्ध विहार बुद्धांच्या ताब्यात भारत सरकारने बुद्धांच्या ताब्यात तात्काळ देण्यात यावे अशी मागणी भारतीय जनता पार्टी एससी मोर्चा शहर जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली आहे .

# सुत्रधारांवर कारवाई करावी

### सुप्रिया सुळे यांची मागणी

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, वृत्तवाहिन्यांनी स्व. संतोष देशमुख यांना मारहाण होत असतानाचे फोटो प्रसारीत केले आहेत.

हे फोटो पाहताना कोणत्याही संवेदनशील माणसाचा संताप झाल्याशिवाय राहणार नाही. हे फोटो पाहताना किती क्रूरपणे ही हत्या झाली असावी याचा अंदाज येतो.

ही घटना आणि त्यातील क्रौर्य प्रचंड अस्वस्थ करणारे आणि माणूसकीला काळीमा फासणारे आहे. याप्रकरणी ज्या शक्तींचा वारंवार उल्लेख होत आहे त्या शक्तींवर कारवाई झालीच पाहिजे. उभा महाराष्ट्र आज देशमुख कुटुंबीयांच्या न्याय्य मागणीच्या मागे ठामपणे उभा आहे. स्व संतोष देशमुख यांना न्याय मिळालाच पाहिजे ही आमची भूमिका आहे.

मुख्यमंत्री महोदयांनी जनभावना लक्षात घेऊन जनतेला आश्वस्त करण्याची आवश्यकता आहे. त्यांना माझी नम्र विनंती आहे की कृपया आपण या घटनेशी संबंधित प्रत्येक व्यक्ती आणि त्यांच्या सुत्रधारांवर कारवाई करावी.

# मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र राज्य सचिवपदी शेतकरी नेते डॉ. अजित नवले यांची निवड

■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई , दि. १२ :-**मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्र प्रांताच्या राज्य सचिवपदी शेतकरीनेते डॉ.अजित नवले यांची निवड करण्यात आली.डॉ.नवले यांची नवीन राज्य सचिव म्हणून एकमताने निवड करण्यात आली. कम्युनिस्ट पक्षाच्या देशभरातील सर्व राज्यातील सर्वात लहान वयातील राज्य सचिव म्हणुन डॉ. नवले यांनी मान पटकवला आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे महाराष्ट्र राज्य अधिवेशन नुकतेच पार पडले . तीन दिवसीय अधिवेशनात



राज्यभरातून आलेले ३३७ प्रतिनिधी उपस्थित होते.

यावेळी सामाजिक राजकीय ८ ठराव मांडण्यात आले,जे एकमताने पारित करण्यात आले. मुख्य राजकीय आणि संघटनात्मक अहवाल राज्य सचिव डॉ उदय नारकर यांनी मांडला. या अहवालावरील चर्चेत ५४ प्रतिनिधींनी भाग घेतला,यात १४ महिला होत्या. डॉ उदय नारकर यांच्या उत्तरानंतर अहवाल एकमताने मंजूर झाला.

या अधिवेशनात ५०सदस्यांची नवीन राज्य कमिटी आणि१५ सदस्यांचे राज्य सचिव मंडळ निवडण्यात आले.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या महाराष्ट्रा प्रांताच्या राज्य सचिवपदी शेतकरीनेते डॉ.अजित नवले यांची निवड करण्यात आली.

डॉ. नवले यांची नवीन राज्य सचिव म्हणून एकमताने निवड करण्यात आली असून कम्युनिस्ट पक्षाच्या देशभरातील सर्व राज्यातील सर्वात लहान वयातील राज्य सचिव म्हणुन डॉ. नवले यांनी मान पटकवला आहे.

# धनंजय मुंडेंची आमदारकी रद्द होईपर्यंत लढणार

## अंजली दमानिया कडाडल्या

■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई , दि. ४ :** धनंजय मुंडे यांची आमदारकी रद्द होईपर्यंत लढणार आहे, असे आव्हान अंजली दमानिया यांनी मुंडे यांना दिले. धनंजय मुंडे वैद्यकीय कारणाने राजीनामा दिल्याचे म्हणतात. त्यांना मन तरी आहे का, असा सवालही अंजली दमानिया यांनी केला. त्या धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर बोलत होत्या.

सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी अखेर धनंजय मुंडे यांची विकेट पडली. मात्र, त्यांनी केलेल्या ट्विटवरूनही आता संताप व्यक्त होत आहे.

अंजली दमानिया यांनी यावरूनही त्यांना लक्ष्य केले.

अंजली दमानिया आक्रमक झाल्यात. त्यांची आमदारकी रद्द होईपर्यंत आपला लढा सुरू राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. सोबतच धनंजय मुंडे हे वैद्यकीय कारणाने राजीनामा दिल्याचे म्हणतात. मात्र, त्यांना मन तरी आहे का, असा सवालही त्यांनी केला. धनंजय मुंडेंची आमदारकी रद्द होईपर्यंत मी लढत राहणार असून हीच माझी संतोष देशमुखांना आदरांजली असणार आहे, असे दमानिया म्हणाल्या. धनंजय मुंडे यांनी जितके लोकांना छळले, त्याचा हिशोब त्यांना मिळाला आहे. त्यांच्या पापाचा घडा भरलेला दिसतोय, अशी प्रतिक्रिया अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यानंतर दिली.

जोपर्यंत धनंजय मुंडेंसारखी माणसे राजकारणात बसली आहेत, तोपर्यंत असे कराड सगळीकडे मोकाट आहेत.

ह्यांना आपल्याला धडा शिकवायचा आहे. वाल्मीक कराडला मिळणारी व्हीआयपी ट्रिटमेंट आधी बंद करा. त्याला जमिनीवर मातीत झोपवा. त्याच्या हातात आणि पायात बेड्या घाला. त्याला एका गुन्हेगारासारखे वागवा, अशी मागणी अंजली दमानिया यांनी केली.

अशी गुन्हेगारी प्रवृत्ती बीडमध्येच नाही, तर सगळीकडे आहे.

जालन्यातूनही असाच प्रकार समोर आला आहे. पुण्यात कोयता गँग आहे. नाशिकमध्येही प्रकरणे घडत आहे.

कारण राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले आहे. प्रत्येक राजकारण्यांचे असे लोक असतात, जे सगळ्या यंत्रणेवर, पोलिसांवर कंट्रोल ठेवतात. जोपर्यंत प्रशासकीय अधिकारी स्वत: थोडी ताकद ठेवून मी करणार नाही, असे सांगत नाहीत तोपर्यंत हे चित्र बदलणार नाही, असे अंजली दमानिया म्हणाल्या.

### अधिवेशन बंद पाडणार

**अजित पवारांनी लोकप्रतिनिधी म्हणून वागावे. आरोपपत्र दाखल होईपर्यंत मुख्यमंत्री जे गृहमंत्री आहेत त्या देवेंद्र फडणवीसांना या फोटोबाबत, व्हिडिओबाबत माहिती नव्हते का? असा प्रश्न अंजली दमानिया यांनी उपस्थित केला. जर आज यांचा आता राजीनामा नाही आला, बडतर्फ केले गेले नाही..**

**तर संपूर्ण महाराष्ट्रात जे जे लढले आणि जे सामान्य लोक लढले त्या सगळ्यांना मी हात जोडून निवेदन करते की उद्या सकाळी आपण अधिवेशनावर पोहोचायचे आणि यांचा अधिवेशन बंद पाडायचा, असे अंजली दमानिया म्हणाल्या.**

# औरंगजेबाइतकेच क्रौर्य संतोष देशमुखांच्या हत्येवेळी दिसले

### संजय राऊत यांचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी,
**मुंबई , दि. १२ :**पोलिसांनी जे पुरावे, व्हिडीओ, फोटो समोर आणले ते पाहून महाराष्ट्र किती क्रूर झाला झाला आहे, हे दिसत आहे. एका बाजूला छावा चित्रपटात औरंगजेब किती क्रूर हे दाखवता, औरंगजेबाने संभाजी महाराजांच्या बाबतीत किती क्रौयार्ने वागला हे दाखवण्यात आले. त्याच संभाजी महाराजांच्या राज्यात तितक्याच क्रूरपणे संतोष देशमुख सारख्या एका प्रजेच्या, नागरिकाच्या बाबतीत दिसला, त्याच क्रौयार्ने संतोष देशमुख यांचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूचा, हत्येचा खेळ राजकारण्यांनी केला असा आरोप संजय राऊत यांनी केला आहे. मुख्यमंत्री कायदा आणि न्याय यांची बूज राखत नाहीत, असेही ते म्हणाले. संतोष देशमुख यांच्या हत्येचे भयावह फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. या फोटोंवर अनेकांच्या प्रतिक्रिया येत आहेत. ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनीही यावरून सरकारवर निशाणा साधला आहे. औरंगजेबाइतकाच क्रौर्य संतोष देशमुखांच्या हत्येवेळी दिसले, असे संजय राऊत म्हणालेत.

### ... तर देशमुखांचे प्राण वाचले असते

इतक्या गोष्टी समोर आल्या, संतोष देशमुख यांना किती क्रूरपणे मारण्यात आले. नंतर त्यांच्यावर लघवी करण्यात आली, किती पराकोटीचे क्रौर्य या महाराष्ट्रात, बीडमध्ये घडले. हे सर्व लोक मुंडे यांच्याशी संबंधित आहेत. मुंडे हे काही कोणी महात्मा नाहीत, हे मिस्टर फडणवीस आणि अजितदादांनाही माहित आहे. त्यांच्या निवडणुकीत प्रत्येक बूथवर कशाप्रकारे मतदारांना धमक्या, दहशत, दाखवून कसे मतदान करू दिले नाही हे निवडणूक आयोगाने, देवेंद्र फडणवीस आणि अमित शहांनी देखील पाहिले आहे. त्यांची निवडणूक त्याचवेळी रद्द व्हायला हवी होती, तसे झाले असते तर कदाचित संतोष देशमुखचे प्राण वाचले असते, असे खडेबोल संजय राऊत यांनी सुनावले. या राज्याचे मुख्यमंत्री, गृहमंत्री असलेल्या देवेंद्र फडणवीसांनी पुढील २४ तासांतच धनंजय मुंडेंचा राजीनामा घ्यायला हवा होता. पण ते म्हणतात कोर्ट ठरवेल. नैतिकतेच्या मुद्यावर हा राजीनामा त्यांनी घेतला असता, तर देवेंद्र फडणवीस यांनी न्याय केला असे आम्हाला छातीठोकपणे सांगता आले असते. असे संजय राऊत म्हणाले.

या राज्याचे मुख्यमंत्री म्हणजे रामशास्त्री नाहीत. मुख्यमंत्री हे कायदा आणि न्याय यांची बूज राखत नाहीत. काही लोकांना ते वाचवण्याचा प्रयत्न



करतात, त्याला न्याय म्हणत नाहीत, अशी टीका संजय राऊत यांनी केली. देवेंद्र फडणवीस यांना जर न्याय करायचा असेल तर कलंकित मंत्र्यांना त्यांनी ताबडतोब मंत्रीमंडळातून बाहेरचा रस्त दाखवायला हवा , जे भ्रष्टाचारी आहेत त्यांना बाहेर काढायला पाहिजे आणि या राज्यात इतर कोणीही कायद्याचा गैरवापर करू नये, याचीसुद्धा त्यांनी काळजी घ्यायला हवी, अशा शब्दांत संजय राऊत यांनी सुनावले.

महासागर ●बुधवार,दि.५ मार्च २०२५



# भारक्षमतेहून अधिक वाहतूक करणाऱ्या वाहनांवर 'आरटीओ'ची कारवाई



■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):
भारक्षमतेहून अधिक माल वाहून नेणाऱ्या मालमोटारी व जड वाहनांविरूद्ध प्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून मोहिम उघडण्यात आली आहे. त्याअंतर्गत आज ३५ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. मोहिमेच्या आजच्या पहिल्या दिवशी सुमारे २०० वाहनांची तपासणी करण्यात आली. त्यात २५ वाहने भारक्षमतेहून अधिक माल वाहून नेत असल्याचे आढळले.

त्यांच्यावर झालेल्या कारवाईत जमा झालेला एकूण १० लक्ष रू. महसूल शासनास जमा करण्यात आला आहे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी रवींद्र भुयार यांच्या मार्गदर्शनात मोहिमेत सर्व मोटार वाहन निरीक्षक, सहायक मोटार वाहन निरीक्षक, वाहनचालक यांचा सक्रिय सहभाग आहे. मोहिमेसाठी ४ कोटी रू. लक्ष्यांक असून, फेब्रुवारीपर्यंत ६० टक्के पूर्तता झाली आहे. सर्व वाहनधारकांनी आपली सर्व कागदपत्रे अद्ययावत ठेवावी.

वाहने चालविताना मोटार वाहन कायद्याचे पालन करावे. वाहनात क्षमतेपेक्षा जास्त वजनाचा माल भरूनये. वाहन तपासणीदरम्यान विभागाच्या नावावर वाहनधारकांनी वेठीस धरून गैरफायदा घेणाऱ्या व्यक्तींच्या विरोधात कार्यालयात तत्काळ तक्रार दाखल करावी.

वाहनचालक, मालक यांनी असामाजिक घटकांच्या कोणत्याही आमिषाला बळी पडू नये. वाहन तपासणी मोहिम पश्चिम वऱ्हाडातील अकोला, वाशिम व बुलडाणा या तिन्ही जिल्ह्यात राबविण्यात येत असल्याचे श्री. भुयार यांनी सांगितले.

# लाईनमन हा महावितरणचा आधारस्तंभ : मुख्य अभियंता राजेश नाईक

## वीज यंत्रणेवर काम करतांना सुरक्षा साधनांचा वापर करावा



■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):
जनसामान्यांना लाईनमन म्हणून परिचीत असणारा महावितरणचा जनमित्र हा महावितरण व्यवस्थेमधील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. तथापि विजेसारख्या अत्यंत जोखीम असलेल्या क्षेत्रात अनावधानाने झालेली चुकही क्षम्य नसते,त्यामुळे परिमंडलातील सर्व जनमित्रांनी तसेच बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांनी सुरक्षा साधनाशिवाय वीज यंत्रणेवर काम करू नये असे भावनिक आवाहन मुख्य अभियंता राजेश नाईक यांनी केले.

लाईनमनबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी ४ मार्च हा परिमंडलात 'लाईनमन दिवस' म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला.त्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. अकोला शहर विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात अधीक्षक अभियंता अजितपालसिंह दिनोरे,यामिनी पिंपळे,सहाय्यक महाव्यवस्थापक मनिषकुमार भोपळे,उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अरूण शेलकर,नितिन मेश्राम,वरीष्ठ तंत्रज्ञ वंदना देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मुख्य अभियंता म्हणाले की, विजेमुळे देशाच्या विकासाच्या चाकाला गती मिळाली,आणि त्या चाकाला अत्यंत खडतर परिस्थिती वीज पुरवठा सुरळीत ठेवण्याचे काम लाईनमन करीत असतात. एवढेच नाही तर दऱ्याखोऱ्यातून त्या शेवटच्या घरांनाही सुरळीत वीज पुरवठा देण्याचे काम लाईनमन करीत असतो. लाईनमनच्या एकंदरीत कामाची दखल घेत शासनाकडून लाईनमन दिवस साजरा करून लाईनमनप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात येत आहे, ही महावितरणसाठी आणि जनमित्रांसाठी अत्यंत आनंदाची आणि गौरवास्पद बाब असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. अधीक्षक अभियंता अजितपालसिंह दिनोरे म्हणाले की, २४ तास ऑन ड्यूटी असलेला महावितरणच्या लाईनमनचे काम हे मानवी हृदयासारखे निरंतर चालणारे आहे.

लाईनमन दिनानिमित्त अकोट आणि अकोला ग्रामीण विभागातही विविध उपक्रमाचे आयोजन करून लाईननन दिवस साजरा करून जिल्ह्यात सर्व लाईनमन म्हणजेच जनमित्रांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अरूण शेलकर यांनी केले.सुत्र संचालन अशोक पेठकर यांनी केले,तर आभार विनोद फुलारी यांनी मानले.

# शिष्यवृत्तीचे प्रलंबित अर्ज निकाली काढा महाविद्यालयांना 'समाजकल्याण'ची सूचना

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):
अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असून, ते महाविद्यालयांनी तातडीने निकाली काढावे, अशी सूचना समाजकल्याण सहायक आयुक्त डॉ. अनिता राठोड यांनी केली आहे.

शिष्यवृत्तीसाठी १२ हजार ६५१ अर्ज नोंदणीकृत असून, विद्यार्थी स्तरावर ६९८, महाविद्यालय स्तरावर २ हजार ५४१ अर्ज प्रलंबित असल्याची नोंद आहे. प्रलंबित अर्जांच्या क्रमवारीत पहिल्या दहा महाविद्यालयांत गाडेगाव येथील डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय (प्रलंबित अर्ज २७७), अकोला येथील श्री शिवाजी अभियांत्रिकी महाविद्यालय (१०३), औद्योगिक प्रशिक्षण संस्था (८७) , इन्स्टिट्यूट ऑफ्फ नर्सिंग एज्युकेशन (८२), उगवा येथील नालंदा खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (६३), श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (६१), ब्रम्ही येथील महात्मा ज्योतिबा फ्फुले महाविद्यालय (५७), सीताबाई महाविद्यालय (५३), स्व. शोभाताई माणिकराव देशमुख महाविद्यालय (४६) व बाभूळगाव येथील श्री संत गजानन महाराज महाविद्यालय (४३) यांचा समावेश आहे.

चालू आर्थिक वर्ष संपुष्टात येण्यास अत्यंत कमी कालावधी राहिला असून, ऑनलाईन अर्जांबाबतची पूर्तता सर्व महाविद्यालयांनी करून घ्यावी आणि कुठलाही पात्र विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन सहायक आयुक्तांनी केले आहे.

# अकोला जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांच्या प्रयत्नाने आरोग्य सेवेत राज्यात पटकावला पुन्हा पहिला क्रमांक




■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):
जिल्हा आरोग्य विभाग रुग्ण सेवेत प्रथम क्रमांकावर आणण्यासाठी जिल्हा परिषद आरोग्य अधिकारी अकोला डॉक्टर बळीराम गाढवे यांनी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांचा महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटनेच्या वतीने जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय अकोला येथे सत्कार करण्यात आला.

राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमातील निर्देशांकावर आधारित डिसेंबर महिन्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सकाच्या संवर्गाच्या रँकिंगची घोषणा २३/२/२०२५रोजी राज्यातील आरोग्य विभागा तर्फे घोषणा करण्यात आली. यात जिल्हा आरोग्य अधिकारी रँकिंग मध्ये ग्रामीण भागातील कामगिरीत अकोला जिल्हा राज्यात अव्वल ठरला आहे.

अकोला जिल्हा नऊ महिन्यात सात वेळा तब्बल पहिला क्रमांक पटकाविला आहे एक वेळा दोन दुसरा क्रमांक एक वेळा पाचवा क्रमांक ४२ आरोग्य सेवा भरती रँकिंग अकोला जिल्ह्यांनी संपूर्ण महाराष्ट्रात ३६ जिल्हा मधून पहिला क्रमांक पटकावलेला आहे एप्रिल पासून तर मार्चपर्यंत प्रत्येक महिन्याचे प्रोग्रेसिव्ह कामाचे आकडेवारी इंडिकेटर नुसार मार्क ठरलेले असतात व महाराष्ट्रातील पूर्ण ३६ जिल्ह्यांपैकी एकूण ४२ आरोग्यसेवा मुद्द्यांवर विशेषतः संस्थात्मक प्रसूती अकोला जिल्ह्यातील ३३ प्राथमिक आरोग्य केंद्रांपैकी एकही प्राथमिक आरोग्य केंद्र निरंक नाही प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसूती होऊन जिल्हा स्त्री रुग्णालयाचा बोजा अकोला जिल्हा परिषद प्रशासनाने कमी केलेला आहे व संस्थात्मक प्रसुतीचे कार्य उल्लेखनीय आहे

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे यांनी केलेल्या आरोग्य विषयक कामगिरीमुळे. अकोला जिल्हा परिषद आरोग्य विभागाची मान अजून उंचावलेली आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर बळीराम गाढवे यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल महाराष्ट्र राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना अकोला या संघटनेच्या वतीने त्यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# राष्ट्रीय कार्यक्रमात जि.प.आरोग्य विभाग राज्यात आघाडीवर

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):
राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमातील निर्देशांकानुसार महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा गुणानुक्रम ठरविण्यात येतो. त्यात अकोल्याचा जि.प.आरोग्य विभाग गतवर्षी ७ वेळा प्रथम क्रमांकावर राहिला आहे. राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमातील निर्देशांकानुसार डिसेंबर २०२४ चे गुणानुक्रम राज्य स्तरावरून काढण्यात आले. त्यात अकोला जि. प. आरोग्य विभागाने प्रथम क्रमांक मिळविला आहे. जिल्ह्याने एप्रिल ते डिसेंबर २०२४ या ९ महिन्याच्या कालावधीत तब्बल सातवेळा राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे.

राष्ट्रीय कार्यक्रमात महत्त्वाच्या काही आरोग्य निर्देशांकाद्वारे संपूर्ण राज्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी ,जिल्हा शल्यचिकित्सक, महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कामाचे राष्ट्रीयकार्यक्रम ांतर्गत लसीकरण, माता बाल संगोपन, आरसीएच पोर्टल ,आयडीएसपी, एनसीडी ,कुटुंब कल्याण कार्यक्रम ,क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम इत्यादी महत्त्वाचे निर्देशांकाचे गुणानुक्रम राज्यस्तरावरून काढण्यात आले.मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी व उपसंचालक आरोग्य डॉ. कमलेश भंडारी मार्गदर्शनानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे आणि त्यांचे सहकारी यांनी राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न केले. विभागाकडून नियमित आढावा, पाठपुरावा, प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देऊन मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कामात सुधारणा करण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांवर पर्यवेक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानुसार आरोग्य सेवक, सेविका यांच्या कामात सुधारणा आदी कामे साध्य झाली. कार्यात अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशीकांत पवार, माता वाल संगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर, तालुका आरोग्य अधिकारी ,वैद्यकीय अधिकारी ,सर्व आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका यांचा सहभाग आहे.

# भारतीय बौद्ध महासभेचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

**अकोला**:महाबोधीमहाविहारचेप्रशासन,व्यवस्थापनबौध्द समाजाला सोपवा तसेच बोधगया मंदिर अधिनियम रद्द करा या प्रमुख मागणी साठी भारतीय बौद्ध महासभा अकोला जिल्ह्याच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मंगळवारी दुपारी मोर्चा काढण्यात आला. मोर्चा मध्ये समाजबांधव, महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. तथागत भगवान बुध्दाचे ज्ञानप्राप्ती स्थळ आणि जगातील बौद्ध बांधवांचे पवित्र स्थान महाबोधी महाविहार ( बोधगया, बिहार) चे नियंत्रण बौध्दांना सोपवा, बोधगया मंदिर अधिनियम (.ऊ. . १९४९) रद्द करण्यासाठी ऑल इंडिया बौध्द फोरम, दि बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया, समता सैनिक दल एवंम समाजातील संघटनांनी पाटणा येथे १७/०९/२०२४ आंदोलन सुरु केले आहे. त्या आंदोलनाला पाठिंबा तसेच मागणी मान्य करण्यात यावी असा आग्रह धरला. बोधगया येथील व्यवस्थापन बौद्ध समाजाला सोपवा या मागणीसाठी पाटणा येथे सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा आहे असे भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष पी. जे. वानखडे म्हणाले. तसेच जिल्हाधिकारी यांच्या माध्यमातून देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधान आणि बिहार चे मुख्यमंत्री यांच्या पर्यंत हा महत्त्वाचा विषय पोहचवत असल्याचे वानखडे यांनी माध्यमाशी बोलताना सांगितले.

# अकोल्यात शिवसेना ठाकरे गट आणि समाजवादी पार्टीचे कार्यकर्ते आमने-सामने

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):
नेहमीच वादग्रस्त विधानामुळे चर्चेत राहणाऱ्या समाजवादी पक्षाचे आमदार अबु आझमी यांना औरंगजेबाचं समर्थन करणं चांगलंच भोवलं आहे. औरंगजेब हा उत्तम प्रशासक होता, असं वादग्रस्त विधान समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांनी सोमवारी विधिमंडळ परिसरात केलं होत. त्यांच्या या वक्तव्यानं नवा वाद निर्माण झाला आहे. दरम्यान अबू आझमी यांच्या या वक्तव्यानंतर राज्यात ठिकठिकाणी आंदोलन करण्यात येत आहे. अकोल्यातही ठाकरेंच्या शिवसेनेकडून अबू आझमी यांच्या विरोधात शेण फेको आंदोलन करण्यात आलं.यावेळी अबू आझमी यांच्या फोटोला शेण फासत प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी अबू आझमींनी आमदारकीचा राजीनामा द्यावा, अशी मागणी संतप्त शिवसैनिकांनी केली आहे. मात्र हे आंदोलन सुरू असताना समाजवादी पक्षाचे काही कार्यकर्ते या ठिकाणी दाखल झाले आणि त्यांनी या आंदोलनाला विरोध करत अबू आझमी यांचा फोटो खाली काढण्याचा प्रयत्न केला.

# भीता हा सर्वांत मोठा आजार आहे :तोडकर

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):
समाजात भीती घालणारे लोक भरपूर भेटतील, पण धाडस शिकविणारे लोक कमी भेटतील. भीती हा सर्वात मोठा आजार आहे, धाडस हा उपाय आहे. डोक्यात आलेला आजार हा शरीरात उतरतो, त्यामुळे डोक्यात आजारांची गाठ बांधू नका, यासोबत दैनंदिन जीवनात नागरिकांना भेडसावणाऱ्या समस्या, आजार यावर तात्काळ करता येणारे उपाय घरीच करावेत असे प्रतिपादन राष्टीय पारीतोषीक विजेते सुप्रसिद्ध निसगोपचार तज्ञ स्वागत तोडकर यांनी केले.

दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी अकोला, राजीविन सोलर यांच्या संयुक्त विद्यामाने रविवार २ मार्च रोजी श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय येथे जाहीर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते औषधाविना आरोग्य या

## औषधाविना आरोग्य विषयावर जाहिर व्याख्यान

विषयावर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दि बेरार जनरल एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष ॲड. मोतीसिंग मोहता, डॉ. पवन माहेश्वरी,आरएलटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश चंद्रवंशी, बालमुकुंद भिरड, सिमरन नागरा, ज्ञानेश साबळे, जेष्ठ कवी बापूराव झटाले आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे आयोजक मनसे जिल्हाध्यक्ष व संचालक पंकज साबळे यांनी प्रस्ताविकेतून कार्यक्रमाची भूमिका विशद केली.

आयुष्य आनंदात जगायचे, रडणाऱ्यांना कोणी विचारत नाही, हासत खेळत जगणाऱ्यांना लोक विचारतात, जगताना अधू म्हणून जगू नका, हिंमतीने जगा, हिम्मत असेल तरच किंमत आहे,आनंदाने जगण्यासाठी कोणताही पैसा लागत नाही, मात्र रुग्णालयात पैसा लागतो. औषधविना जगायचे असेल तर औषधे बाजूला सारून निसगोपचार करणे आवश्यक आहे, त्याकरिता शरीराचे शुद्धीकरण करून घेणे आवश्यक आहे, शरीरातील घाण बाहेर पडक्यास शरीर रोगमुक्त राहते, नागरिकांच्या सदृढ आरोग्य व निसर्गदायी जीवनासाठी निसगोपचाराचा अवलंब करावा असेही ते पुढे बोलताना म्हणाले. तर नागरिकांनी सदृढ आरोग्य सांभाळण्यासाठी योग्य आहार व व्यायाम करावा असे मत अध्यक्षीय भाषणात ? ड. मोतिसिंह मोहता यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिवाजी भोसले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाम देशमुख, सौरभ भगत, प्रायांक बालोदे, पंकज देशमुख, प्रदीप मुस्तद, गौरव देशमुख आदींनी पुढाकार घेतला.

# पातुर पंचायत समितीला नवा गटविकास अधिकारी: राजेश खुमकर यांची नियुक्ती

■पातुर,दि.४ (प्रतिनिधी):
पंचायत समिती, जी गेल्या काही काळापासून आंदोलन, उपोषण आणि ठिय्या आंदोलनांसाठी चर्चेत होती, तिथे अखेर नवीन गटविकास अधिकारी (इऊज) म्हणून राजेश खुमकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अकोला जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यपालन अधिकारी वैष्णवी बी. यांनी ही नियुक्ती जाहीर केली आहे.



पातुर पंचायत समितीच्या तत्कालीन गटविकास अधिकारी सुनीता इंगळे या सध्या रजेवर गेल्या असल्याने, राजेश खुमकर यांना गटविकास अधिकारी म्हणून जबाबदारी सोपवण्यात आली. त्यांनी २७ फेब्रुवारी २०२५ रोजी अधिकृतरित्या पदभार स्वीकारला.

राजेश खुमकर यांनी आपल्या नोकरीच्या कारकिदीत उल्लेखनीय कार्य केले आहे. याआधी त्यांनी पंचायत समिती अकोला आणि अकोट येथे कार्यभार सांभाळला होता. तसेच, बाळापूर पंचायत समितीमध्ये गटशिक्षणाधिकारी म्हणून त्यांनी प्रभावी कामगिरी केली आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक शाळा डिजिटल करण्यात आल्या.इतर शाळांना डिजिटल होण्यासाठी प्रोत्साहन दिले.

वाडेगाव येथे स्वखर्चातून डिजिटल शाळा सुरू करण्याचा पुढाकार घेतला. राजेश खुमकर यांच्या नियुक्ती मुळे पातुर पंचायत समितीला त्यांच्या अनुभवाचा मोठा फायदा होण्याची शक्यता आहे. त्यांच्या प्रशासनातील कार्यक्षमतेमुळे स्थानिक समस्या सोडवण्यासाठी आणि विकासकामे गतीने राबवण्यासाठी योगदान मिळणार आहे.

३ मार्च २०२५ रोजी पातुर पंचायत समितीत राजेश खुमकर यांनी पदभार स्वीकारल्यानंतर त्यांचे स्थानिक पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, शेतकरी आणि ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत केले. पंचायत समितीच्या कार्यक्षेत्रात नव्या गटविकास अधिकाऱ्यांकडून मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत.

गटविकास अधिकारी म्हणून कार्यरत होताच, राजेश खुमकर यांनी पंचायत समितीच्या विविध विभाग प्रमुखांसोबत बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी -स्थानिक पातळीवरील प्रलंबित विकासकामांचा आढावा घेतला.

ग्रामविकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

# आपातापा येथे धाडसी चोरी! १३ क्विंटल तूर लंपास; चोरट्यांनी घराबाहेरुन दरवाजा बंद करुन केली चोरी

■बोरगांवमंजू दि.४ (प्रतिनिधी):
अज्ञात चोरट्यांनी शेतकऱ्यांच्या घराच्या पोर्चमधून १३ क्विंटल तूर लंपास करत मोठी चोरी केली आहे. विशेष म्हणजे, चोरी करण्यापूर्वी चोरट्यांनी घरातील मंडळी बाहेर पडू नयेत म्हणून मुख्य दरवाजाला बाहेरून कडी लावली, आणि नंतर चोरीचा डाव साधला. या घटनेत शेतकऱ्याचे सुमारे ९१ हजार रुपयांचे नुकसान झाले असून, परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.ही घटना ३ मार्च रोजी मध्यरात्री ३ ते ४ वाजेदरम्यान घडली. प्रमोद बोपटे यांच्या घराच्या पोर्चमध्ये २० कट्टे तूर साठवले होते.


मात्र, अज्ञात चोरट्यांनी घरातील लोक बाहेर पडू नयेत म्हणून मुख्य दरवाजाला बाहेरून कडी लावली आणि तुरीसह दोन पिवळ्या रंगाचे तळवही (तागारीसारखे साधन) देखील लंपास केले.

या घटनेनंतर प्रमोद बोपटे यांनी बोरगाव मंजू पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.



पोलिसांनी अज्ञात आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून घटनास्थळी पंचनामा केला आहे. तसेच, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे. आपातापा हे अकोला-अमरावती मार्गावर वसलेले असून, हा मार्ग मोठ्या वाहतुकीचा आहे. रात्रभर ट्रक, वाहने आणि प्रवाशांची मोठी वर्दळ असते. अशा गजबजलेल्या महामार्गावर घराला बाहेरून कडी लावून चोरी करणे म्हणजे चोरटे निर्भय झाले आहेत, असे स्पष्ट होते.शेतकरी दिवसरात्र मेहनत करून पीक घेतात, मात्र काही क्षणांतच चोरट्यांकडून लुटले जातात. या प्रकारामुळे शेतकऱ्यांमध्ये मोठा संताप असून, महामार्गावर पोलिसांनी गस्त वाढवावी, रात्री नाकाबंदी करावी आणि चोरट्यांना त्वरित अटक करावी, अशी मागणी होत आहे.

# प्रा गजानन ऐगावकर यांचे निधन



■**अकोला** येथील बेरार जनरल एज्युकेशन सोसायटी संचालित श्री नथमल गोयनका विधी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. गजानन विष्णू ऐगावकर यांचे दि ४ मार्च रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ते ५५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक पुत्र, एक कन्या आणि मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर उमरी येथील मोक्षधाम येथे अंतिम संस्कार करण्यात आला.त्यांच्या दुःखद निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.


VASTU HOUSING FINANCE

वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि
युनिट २०३ आणि २०४, दुसरा मजला, ए विंग, नवभारत इस्टेट, झकेरिया बंदर रोड, शिवडी (पश्चिम), मुंबई ४०००१५. महाराष्ट्र.
CIN No.: U65922MH2005PLC272501

ताबा सूचना

तर, अधोस्वाक्षरीदार हे सिक्युरिटायझेशन अंतर्गत वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेडचे अधिकृत अधिकारी आहेत आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा, २००२ अंमलबजावणी आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम २००२ च्या नियम ९ सह वाचलेल्या कलम १३ (१२) अंतर्गत त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करताना, खाली नमूद केलेल्या कर्जदारांना संबंधित नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम ही नोटीस मिळाल्यापासून ६0 दिवसांच्या आत परत करण्याचे आवाहन करणारी डिमांड नोटीस जारी केली आहे. रकमेची परतफेड करण्यात अयशस्वी झालेल्या कर्जदारांनी, खाली नमूद केलेल्या तारखेला नमूद केलेल्या नियमांच्या कलम १३(४) अंतर्गत मला दिलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा खाली स्वाक्षरीने घेतला आहे.

कर्जदार आणि जामीनदार विशेषतः आणि सामान्यतः जनतेला याद्वारे सावध केले जाते की मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी कोणतेही व्यवहार खाली नमूद केलेल्या रकमेसाठी वास्तू हाउसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड शाखेच्या शुल्क आणि त्यावरील व्याज, खर्च इ. च्या अधीन असतील.

| अ. क्र. | कर्जदाराचे नाव, सह-कर्जदार आणि लेन क्र. | डिमांड नोटिसची तारीख आणि रक्कम | मालमत्तेचे वर्णन | तारीख आणि ताब्याचा प्रकार |
|---|---|---|---|---|
| 1 | प्रतिमा ओमप्रकाश दोडके, ओमप्रकाश वासुदेवराव दोडके, प्रितेश ओमप्रकाश दोडके HL000000111686 | १७-फेब्रु-२४ १२७४५११ रु रोजी १४-फेब्रुवारी-२४ | मालमत्ता क्र.७८५, प्रभाग क्र.0४, गाव नं.८७, मौजा-चांदूर रेल्वे, प्रगणे-मांजरखेड, कसबा आणि तहसील चांदूर रेल्वे आणि जिल्हा-अमरावती, महाराष्ट्र, ४४४९0४, क्षेत्रफळ १४६.३0 चौ. मीटर उत्तर: गीताबाई गुल्हाने यांचे घर, दक्षिण: पिराजीचे मंदिर, पूर्व: मुन्नासेठ भाटिया आणि लक्ष्मणराव मालखेडे यांचे घर, पश्चिम: रस्ता | 0१-मार्च-२५ रोजी घेतलेला भौतिक ताबा |

तारीख: 0५.0३.२0२५
ठिकाण: अमरावती

वास्तु हाऊसिंग फायनान्स कॉर्पोरेशन लि
अधिकृत अधिकारी

# भारतात रंगीत दूरदर्शनचे जनक : वसंतराव साठे :



(वसंतराव साठेंच्या १०० व्या जयंती प्रित्यर्थ विशेष)

भारतात दूरदर्शनचा प्रवास काळ्या-पांढऱ्या पडद्यावरून रंगीत दुनियेकडे नेण्याचे श्रेय माजी केंद्रीय मंत्री स्व. वसंतराव साठे यांना जाते. दूरदर्शनच्या इतिहासात त्यांचे नाव सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे, कारण त्यांच्या दूरदर्शी नेतृत्वामुळेच भारतीय नागरिकांना 1982 मध्ये प्रथमच रंगीत टीव्हीचे दर्शन घडले. त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या या ऐतिहासिक कार्याचा आढावा घेण्याचा हा एक नम्र प्रयत्न आहे.

-----------------

वसंतराव साठे हे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे प्रभावी नेते होते. त्यांच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले, पण सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीने सर्वात संस्मरणीय योगदान म्हणजे भारतात रंगीत दूरदर्शन सुरू करण्याचा त्यांचा महत्त्वाकांक्षी निर्णय.



ते 1980 च्या दशकाच्या सुरुवातीला माहिती आणि प्रसारण मंत्री होते. त्या काळात दूरदर्शन हा देशभरात मनोरंजन आणि माहितीचा प्रमुख स्त्रोत होता, पण तो फक्त कृष्णधवल स्वरूपातच होता. जगभरातील अनेक देशांमध्ये रंगीत प्रसारण सुरू झाले होते, आणि भारतालाही या प्रगतीसोबत जोडण्याची गरज होती.

**भारतात रंगीत टीव्हीचा शुभारंभ**

1982 मध्ये दिल्ली येथे आशियाई क्रीडा स्पर्धा (एशियन गेम्स) आयोजित करण्यात आल्या होत्या. हा भारताच्या दृष्टीने जागतिक स्तरावर एक मोठा प्रसंग होता. वसंतराव साठे यांनी या सुवर्णसंधीचा फायदा घेत, भारतात रंगीत दूरदर्शन प्रसारण सुरू करण्याचा निर्णय घेतला.

त्यावेळी तांत्रिक आणि आर्थिक अडचणी होत्या, पण साठे यांनी दृढनिश्चयाने हे आव्हान स्वीकारले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे भारत सरकारने रंगीत प्रसारणासाठी आवश्यक पावले उचलली आणि 1982 मध्ये प्रथमच भारतीय प्रेक्षकांनी रंगीत टीव्हीवर प्रसारण पाहिले. आशियाई क्रीडा स्पर्धेचें हे रंगीत प्रक्षेपण दूरदर्शनच्या इतिहासातील मैलाचा दगड ठरले.

**भारतीय प्रसारण क्षेत्रातील क्रांती**

रंगीत दूरदर्शनच्या आगमनाने भारतीय प्रसारण क्षेत्रात मोठी क्रांती घडली. त्यानंतर दूरदर्शन अधिक व्यावसायिक बनले, कार्यक्रमांची विविधता वाढली आणि जाहिरात उद्योगाने मोठी झेप घेतली. वसंतराव साठे यांच्या या निर्णयामुळे भारतीय जनतेला मनोरंजन, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रम आणि माहिती अधिक आकर्षक स्वरूपात पाहण्याची संधी मिळाली.

**वसंतराव साठे यांचे दूरदर्शी नेतृत्व**

फक्त रंगीत टीव्हीच नव्हे, तर त्यांनी माहिती आणि प्रसारण क्षेत्रात अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यांचे धोरण नेहमीच प्रगतीशील आणि आधुनिक तंत्रज्ञानाला स्वीकारणारे होते.

**चित्रपट उद्योगाला मदत :** त्यांनी भारतीय चित्रपट उद्योगाला अधिक स्वायत्तता आणि सरकारी पाठबळ मिळवून दिले.

**माध्यम स्वातंत्र्य :** प्रसारमाध्यमांचे स्वातंत्र्य आणि त्यांच्या विस्ताराला चालना देण्याचे त्यांनी समर्थक होते. त्यांच्या प्रयत्नांमुळे भारतातील प्रसारण प्रणाली अधिक जागतिक दर्जाची बनली.

आज भारतीय मनोरंजन आणि प्रसारण क्षेत्र जेथे आहे, त्याला मजबूत पाया घालणाऱ्यांमध्ये वसंतराव साठे यांचे योगदान अमूल्य आहे. त्यांच्या धाडसी आणि दूरदर्शी निर्णयामुळेच भारतीय प्रेक्षकांना 1982 मध्ये रंगीत दूरदर्शन पाहण्याचा आनंद मिळाला.

**नागपुरातील दूरदर्शन केंद्राचे शिल्पकार**

भारताच्या माहिती आणि प्रसारण क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या वसंतराव साठे यांनी भारतात रंगीत दूरदर्शनची सुरुवात करून इतिहास घडवला. मात्र, त्यांचा आणखी एक महत्त्वपूर्ण आणि नागपूरसाठी अभिमानास्पद ठरलेला निर्णय म्हणजे नागपूरमध्ये दूरदर्शन केंद्र सुरू करण्याचा.

त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे विदर्भातील जनतेला स्थानिक प्रसारणाची सुविधा मिळाली आणि नागपूर प्रसारणाच्या नकाशावर अधोरेखित झाले.

**नागपूरसाठी दूरदर्शन केंद्राची आवश्यकता**

1970-80 च्या दशकात दूरदर्शन हा भारतातील प्रमुख प्रसारमाध्यम होता. परंतु, त्या काळात बहुतांश मोठ्या शहरांमध्येच दूरदर्शन केंद्रे होती, आणि विदर्भ तसेच मध्य भारतातील नागपूरसारख्या मोठ्या शहरातही स्वतंत्र केंद्र नव्हते.

विदर्भ हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा सांस्कृतिक, शैक्षणिक आणि औद्योगिक परिसर असूनही, स्थानिक कार्यक्रम किंवा बातम्यांसाठी स्वतंत्र दूरदर्शन केंद्र नव्हते. त्यामुळे नागपूर आणि विदर्भातील लोकांना मुंबई किंवा दिल्लीवर अवलंबून राहावे लागत होते.

**वसंतराव साठे यांचे प्रयत्न**

वसंतराव साठे जेव्हा केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री होते, तेव्हा त्यांनी नागपूरमध्ये दूरदर्शन केंद्र स्थापन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले.

**नागपूरची केंद्रीय भूमिका**

नागपूर हे भारताच्या भौगोलिक केंद्रस्थानी असल्याने येथे दूरदर्शन केंद्र असणे आवश्यक असल्याचे त्यांनी सरकारसमोर ठामपणे मांडले.

**विदर्भाच्या विकासाचा विचार :** केवळ नागपूरच नव्हे, तर संपूर्ण विदर्भातील ग्रामीण भागात दूरदर्शन पोहोचावे, या उद्देशाने त्यांनी हा प्रस्ताव पुढे नेला.

**संसदेत पाठपुरावा :** केंद्र सरकारकडून निधी मंजूर करून घेण्यासाठी त्यांनी संसदेत आणि सरकारी अधिकाऱ्यांसमोर सातत्याने मागणी केली.

**तांत्रिक आणि पायाभूत सुविधा :**

नागपूरमध्ये उच्च दर्जाच्या प्रसारण सुविधांसाठी त्यांनी विशेष योजना राबवल्या आणि आधुनिक उपकरणे उपलब्ध करून दिली.

डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार, नागपूर.
९४२२१२५६५६

**नागपूर दूरदर्शन केंद्राची स्थापना**

वसंतराव साठे यांच्या अथक प्रयत्नांमुळे नागपूरमध्ये अखेर दूरदर्शन केंद्र सुरू करण्यात आले. यामुळे स्थानिक कार्यक्रम, बातम्या आणि सांस्कृतिक कार्यक्रम प्रसारित होण्यास सुरुवात झाली. विदर्भाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनावर याचा मोठा प्रभाव पडला.

**स्थानिक कलाकारांना संधी :**

नागपूर दूरदर्शन केंद्रामुळे स्थानिक कलाकार, साहित्यिक, आणि पत्रकार यांना राष्ट्रीय स्तरावर झळकण्याची संधी मिळाली.

**कृषी आणि ग्रामीण विकास :** स्थानिक भाषेत कृषीविषयक कार्यक्रम, शिक्षण, आणि सामाजिक समस्यांवर आधारित कार्यक्रम प्रसारित होऊ लागले, ज्याचा थेट फायदा विदर्भातील लोकांना झाला.

**सांस्कृतिक ओळख :** विदर्भातील लोकसंस्कृती, संगीत, लोककला यांना हक्काचे व्यासपीठ मिळाले. आज नागपूर दूरदर्शन केंद्र विदर्भाच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. या केंद्राच्या स्थापनेचे श्रेय वसंतराव साठे यांच्याच दूरदृष्टीला जाते. त्यांनी केवळ नागपूरसाठीच नव्हे, तर संपूर्ण विदभार्साठी एक ऐतिहासिक कार्य केले. त्यांच्या या योगदानामुळेच नागपूर प्रसारणाच्या नकाशावर एक महत्त्वाचा केंद्रबिंदू बनले आणि विदर्भाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक प्रगतीला गती मिळाली.

त्यांच्या जन्मशताब्दीच्या निमित्ताने, त्यांच्या कार्याचा सन्मान करून, त्यांच्या दूरदृष्टीचे स्मरण ठेवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. भारतातील डिजिटल आणि प्रसारण क्षेत्राच्या प्रगतीचा विचार करता, वसंतराव साठे यांनी लावलेली ही क्रांतीची ज्योत आजही तेवती आहे. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना, आपण त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांचे स्वप्न पुढे नेण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

■ ■ ■

# 'राक्षस' नव्हे हे तर मुंडेंनी पोसलेले 'हैवान'!

अत्यंत गंभीर व मरणासन्न अवस्थेत मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख पाणी, पाणी करत असताना त्यांच्या चेहऱ्यावर लघुशंका करणारे नीच नराधम आणि पोलिस तपासात हे फोटो, व्हिडीओ बघूनही धनंजय मुंडे, वाल्मीक कराड आणि त्यांच्या विषारी पिलावळीवर न बोलणारे सर्वाच पक्ष प्रमुख व उपमुख्यमंत्री अजितदादा, गृहमंत्री व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे इतके लाचार व निष्ठूर झालेत याचे अतीव दुःख वाटते. माणुसकीला भर दिवसा अरबी अश्व लावणाऱ्या या हैवानांना मरेपर्यंत फाशी देण्याचे धाडस सन्माननीय न्यायालय तरी करणारं का? स्वतःला 'संत' म्हणून समजणारे नामदेव शास्त्री आता काय बोलणार? या नामदेव शास्त्रींना संत का म्हणावे? गुन्हेगारांची मानसिकता समजून घेतली पाहिजे असे सांगणारे नामदेव सानप यांना समाजाने तरी का डोक्यावर घ्यावे? आता या नामदेव सानपाची भगवानगडाहून हकलपट्टी करायची वेळ आली आहे. कारण देवाच्या दरबारात इतका घाणेरडा माणूस समाजाला मार्गदर्शन करणार असेल, तर त्याचा उपयोग काय होणार? मस्स-ाजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाला दोन महिने पूर्ण झाल्यानंतर आता सर्वात मोठी अपडेट समोर आली अन् संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. सीआयडीने संतोष देशमुखांच्या हत्येचा तपास करत १४०० पानांचे आरोपपत्र दाखल केले आहे. या आरोपपत्रामधून अनेक खळबळजनक खुलासे करण्यात आले असून वाल्मिक कराड हाच मुख्य मास्टरमाईंड असल्याचा दावा केला आहे. धक्कादायक म्हणजे संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचे व्हिडिओही सीआयडीच्या हाती सापडले म्हणून संपूर्ण महाराष्ट्राने डोळ्यात पाणी आणून ते पाहिले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जर ते नक्कीच पाहिले असतील. अशावेळी धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेऊन त्यांना मोकळे करण्याची गरज आहे. अन्यथा महाराष्ट्रात अतिशय चुकीचा संदेश जाऊन पोहोचेल. सत्तेसाठी किती लाचारी असावी याला काही मयार्दा असावी की नाही? स्वतः च्या पक्षाच्या बूथ प्रमुखाची हत्या होते आणि त्याच पक्षाचा अध्यक्ष तडजोड करतो आणि मीटिंग करतो. प्रकरण मिटवायला लावतो याला काय म्हणावे? मुख्यमंत्री देखील माहिती देताना सांगतात की 'काही विशिष्ट पक्षाचे कार्यकर्ते' हा शब्द प्रयोग वापरतात. पण शिंदे गटाच्या शिवसेनेचे नाव पण घेऊ शकत नाही. गुन्हेगार कोणत्या पक्षाचे आहे हे जगजाहीर झाले आहे. याबाबत मंत्री पंकजा मुंडे यांना विचारणा केली असता, त्या म्हणतात की, मी आज पुण्यात आहे, तर मला पुण्याच्या गुन्ह्याबद्दल विचारा. आता बीड प्रकरण कीतीही दाबण्याचा प्रयत्न केला, तरी काहीही उपयोग होणार नाही, हे निश्चित!

थर्ड अम्पायर



जयंत महाजन
jayantmahajansir@gmail.com
मोबा. ९४२०६९९४२०

## चार्जशीट मध्ये काय आहे?

२९ नोव्हेंबरला केजच्या कार्यालयात वाल्मिक कराड, चाटे, सुदर्शन घुले, सुधीर सांगळे आणि कृष्णा आंधळे यांनी बैठक घेतली. याच बैठकीत संतोष देशमुख यांच्या हत्येचा कट रचण्यात आला. ८ डिसेंबरला सुदर्शन घुले व चाटे हॉटेल तिरंगा येथे भेटले. त्यावेळी ₹संतोष देशमुख आडवा आला तर त्याला कायमचा धडा शिकवा₹ असा कराडचा निरोप घुलेने दिला. ९ डिसेंबरला संतोष देशमुख यांचे अपहरण व अमानुष मारहाण करून हत्या करण्यात आली. मारहाण करताना आरोपींनी या घटनेचे १५ व्हिडीओ आणि ८ फोटो काढले. संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचा व्हिडीओ कृष्णा आंधळेने 'मोकारपंती' या व्हाट्सअप ग्रुपवर शेअर केला, पाच सहाजण ते व्हिडीओ पाहत होते. व्हिडीओ बनवत असताना सुदर्शन घुले, सुधीर सांगळे आणि प्रतीक घुले हे हसत आणि आसुरी आनंद घेत संतोष देशमुखांना मारीत होते. जनावरांप्रमाणे मारहाण केल्यानंतर जयराम चाटे याने संतोष देशमुखांचे ओढून कपडे काढतो आणि हात वर करून शर्ट गोल फिरवतो. महेश केदार देशमुखांच्या शेजारी उभा राहून सेल्फी घेतो आणि हैवानासारखा हसतो. 'सुदर्शन घुले हा सगळ्यांचा बाप आहे' असे देशमुखांनी म्हणावे यासाठी जबरदस्ती केली जात होती. हे सर्व नराधम लाथा, बुक्क्या, पाईप आणि वायरने देशमुखांना मारहाण करतात आणि शिवीगाळ करतात. संतोष देशमुखांना एका अंतर्वस्त्रावर बसवून पाठीमागून पाठीवर पाईपने मारहाण करीत होते. मारहाणीनंतर देशमुखांच्या शरीरातील रक्त ओघळून त्यांच्या तळपायापर्यंत आले. संतोष देशमुख मोठ्याने ओरडत होते तेव्हा महेश केदार त्यांचा व्हिडीओ घेत होता. संतोष देशमुख अर्धमेले झाले तेव्हा प्रतीक घुले याने संतोष देशमुख यांच्या छातीच्या दोन्ही बाजूला पाय ठेवून चेहऱ्यावर लघवी केली. चार्जशीट सोबत हे फोटो जोडण्यात आले असून, वरील उल्लेख करण्यात आला आहे. वाल्मिक कराड आणि टोळीचे असे एक दोन नाही तर ६६ पुरावे सीआयला मिळाले आहेत.

संतोष देशमुख यांच्या हत्येची क्रूर कहाणी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचली आहे. जे फोटो घराघरात पोहोचले आहे, त्यात पहिल्या फोटोत जनावरांप्रमाणे मारहाण केल्यानंतर जयराम चाटे संतोष देशमुख यांची पँट काढतोय. दुसऱ्या फोटोत आरोपी महेश केदार हा त्या दृष्याचे सेल्फी घेत हैवानासारखा हसतो. तिसऱ्या फोटोत अमानुष मारहाणीनंतर संतोष देशमुख अर्धमेले झाले, तेव्हा प्रतिक घुले देशमुखांच्या छातीच्या दोन्ही बाजूला पाय टाकून चेहऱ्यावर लघवी करतो.

सुदर्शन घुले देशमुखांच्या शेजारी उभा राहून फोटो काढतो. त्यावेळी हैवानी आवेश चेहऱ्यावर दिसतोय. मारेकरी जयराम चाटे देशमुखांच्या अंगावर शर्ट ओरबाडून काढतो. काढलेला शर्ट हातात धरुन हसतो. यानंतर मारेकरी पाईप आणि वायरने देशमुखांवर वार करतात. लाथा-बुक्क्यांनी मारहाण शिवीगाळ होते. हे दृश्य पाहून जल्लाद, राक्षसांना पाझर फुटेल, अशावेळी महेश केदार सारं हसत हसत शूट करतो.

मारहाणीनंतर सुदर्शन घुले हा सगळ्यांचा बाप आहे, असं देशमुखांनी म्हणावं, यासाठी त्यांना जबरदस्ती केली जाते. संतोष देशमुखांना अंतर्वस्त्रावर बसवून त्यांच्या पाठीवर पाईपने मारहाण होते. हैवानासारख्या मारहाणीनंतर देशमुखांना शरीरातील रक्त ओघळून त्यांच्या तळपायापर्यंत आल्याचे दिसतंय. संतोष देशमुखांच्या मृतदेहावरच नव्हे तर महाराष्ट्राच्या कायदा सुव्यवस्थेवर मुतले आहेत हे हैवान. असल्या अत्याचारी निच प्रवृत्तीला जलद न्यायालयात खटला चालवून भर चौकात फासावर लटकवले पाहीजे. कारण समाजसुधारकांचे, लोकशाहीचे, कायद्याचे राज्य आहे हे. साधु संतांची देव भूमी आहे ही. इथं कोणताही अन्याय अत्याचार जास्त दिवस चालत नाही आणि चालु दिला जात नाही. असल्या निच प्रवृत्तीला पोसणारे सुध्दा सडून मरतील, अशा प्रतिक्रिया महाराष्ट्रातून उमटत आहे.

संतोष देशमुख यांना मारहाण करणारे सहाही आरोपी अत्यंत क्रुरपणे त्यांची कपडे काढून त्यांना मारहाण करत होते. सर्वात मोठी विकृती म्हणजे ही मारहाण सुरु असताना इतर आरोपी मोठमोठ्याने हसत त्यांच्या मारहाणीचा आनंद साजरा करत होते, असे या व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसत आहे. यावेळी एक व्हिडिओ कॉलही सुरु होता, जो जयराम चाटे याने एका वॉट्सअप ग्रुपवर केला होता. हाच सर्वात मोठा डिजीटल पुरावा सीआयडीला मिळाला होता.

हत्या प्रकरणाला जवळपास तीन महिने पूर्ण होत आले असताना नराधम आरोपींनी गाठलेली क्रौयाची परिसीमा दाखवणारे फोटो समोर आले अन महाराष्ट्र हादरला. संतोष देशमुख यांचा विकृत वाल्मीक कराड आणि त्याच्या सहका?यांनी अत्यंत निर्दयीपणे खून केल्याचं सीआयडीच्या तपासात स्पष्ट झालं आहे.

विविध पुराव्यांच्या आधारे नुकतेच सीआयडीने वाल्मीक कराडसह अन्य आरोपींविरोधातचे आरोपपत्र कोर्टात सादर केले. आरोपपत्र सादर झाल्यानंतर आता संतोष देशमुख यांना करण्यात आलेल्या बेदम मारहाणीचे आणि आरोपींची विकृत मानसिकता दर्शवणारे फोटो समोर आले असून सदर फोटो बघून समाजमन सुन्न झालं आहे. संतोष देशमुख यांना विविध हत्यारांनी मारहाण करून आरोपी हा खून 'एन्जॉय' करत असल्याचं फोटोंमधून दिसत आहे.

एक आरोपी संतोष देशमुख यांच्या मृतदेहासोबत फोटो काढत हसताना आढळून आला आहे. एका नराधमाने संतोष देशमुख यांच्या मृत शरीरावर पाय ठेवून फोटो काढला आहे. वाल्मीक कराड म्होरक्या असलेल्या या टोळीने पाइपला करदोड्याने मूठ तयार करून मारहाण केली. तसेच, एका लोखंडी पाइपमध्ये क्लच वायर टाकून त्यानेही बेदम मारहाण केली. या पुराव्यांसह सीआयडीने कराड आणि त्याच्या टोळीविरोधात तब्बल ६६ भक्कम पुरावे जप्त केले आहेत.

सरपंच देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी अपहरण करून हत्या झाली. या प्रकरणात मंत्री धनंजय मुंडे यांचा निकटवर्तीय वाल्मीक कराड हाच मास्टरमाइंड असल्याचे समोर आले आहे. मारहाण, खंडणी आणि हत्या या तिन्ही प्रकरणांचे एक हजार पानांचे दोषारोपपत्र सीआयडीने न्यायालयात दाखल केले. याचे अवलोकन केल्यानंतर अंगावर शहारे आणणारे कृत्य या टोळीने केल्याचे दिसते. मारहाण करताना आरोपींनी देशमुख यांचे कपडे काढून मारहाण केली. हे करताना आरोपी मोठमोठ्याने हसत सदर घटनेचा आनंद साजरा करत असल्याचा दावा सीआयडीने आरोपपत्रात केला. आरोपींनी याचा शेअर केलेला व्हिडीओदेखील सीआयडीच्या हाती लागला आहे. एक गॅसचा पाइप ज्याची लांबी ४१ इंच आहे. एक बाजू गोलाकार केलेली व त्यावर काळ्या करदोड्याने गुंडाळून मूठ तयार केली. याच पाइपवर लालसर रक्ताचा डाग आढळला. एक लोखंडी अर्धा इंच गोलाकार मूठ असलेला पाइप त्यात लोखंडी तारेचे ५ क्लच वायर बसवले.

सरपंच, तुला जिवंत सोडणार नाही - ६ डिसेंबर २०२४ रोजी वाल्मीकला खंडणी दिली नाही म्हणून सुदर्शन घुलेसह इतर मस्साजोगला गेले. तेथे कंपनीच्या सुरक्षा रक्षकाशी वाद घालत असतानाच सरपंच संतोष देशमुख तेथे आले. त्यांनी असे करू नका, अशी विनंती करत अडवले.



यावर घुले याने सरपंच तुला बघून घेऊ, जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिली होती. बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली. या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा पुरावा आता समोर आला आहे.

■ ■ ■

### टायमिंग जुळवून सगळं चालू झाले

संतोष देशमुखांना मारहाण करताना, त्यांची निर्घृण हत्या करतानाचे काही फोटो आणि व्हिडीओ आता समोर आले आहेत. या फोटोत संतोष देशमुखांची हत्या कशी करण्यात आली, त्यांना कशा पद्धतीने अमानुष मारहाण करण्यात आली, याचा घटनाक्रम समोर आला आहे. या हत्येच्या कटात सहभाग असलेले आरोपीही या फोटोत दिसत आहेत. विष्णू चाटे, सुदर्शन घुले, प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार, जयराम चाटे, कृष्णा आंधळे हे सर्वजण या फोटोत पाहायला मिळत आहे. पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रातले तपशील बाहेर कसे आणि कोणी आणले आणि माध्यमांना कोणी पुरवले ? इतक्या तातडीने माध्यमांनी त्यावर स्टोरीज सुरू कश्या केल्या? गृहमंत्रालय आरोपीच्या पिंजऱ्यात आहे. सगळीकडं टीका होत आहे. विधिमंडळ अधिवेशन सुरू आहे. टायमिंग जुळवून सगळं चालू आहे. अधिवेशनाच्या तोंडावर दादांची राष्ट्रवादी दोन पावलं मागे जाईल.? कोरटकर आणि सोलापूरकर यामुळे अडचणीत आलेल्या सरकारला लोकांना चर्चा करण्यासाठी दुसरा विषय देता आलेला आहे. अधिवेशनाच्या सुरुवातीला मुंडेंचा राजीनामा ठरलेलाच होता. सगळा चर्चेचा ओघ आणि टीकेचा रोख मुंडे पवारांच्यावर जाईल याची काळजी माध्यम घेतील यात शंका नाही. बंदूक मुंडेंच्यावर रोखलेली आहे, पण शिकार दादांची करायची आहे. बातमीच्या मागची बातमी अशी आहे. यालाच म्हणतात राजकारण.

### बीडमधील वातावरण पुन्हा एकदा तापले

संतोष देशमुख यांना मारहाण करतानाचे आठ फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर बीडमधील वातावरण पुन्हा एकदा तापले आहे. कारण हे सर्व फोटो संवेदनशील आहेत. अनेक फोटो प्रसिद्ध करु शकत नाही, असे आहेत. संपूर्ण महाराष्ट्र आता पेटून उठला आहे घराघरात ते व्हिडिओ पाहून अश्रूंच्या धारा वाहत आहेत. बीड प्रकरणाचे फोटो व्हायरल झाल्यानंतर आता बीडचे एसपी नवनीत कॉवत यांनी जनतेला शांततेचे आवाहन केले आहे. समाज माध्यमांवरील फोटो मन विचलित करणारे आहे. हे प्रकरण न्याय प्रविष्ट आहे. जनतेने कायदा हाती घेऊ नये. यावरून मराठवाड्यात आता काय होऊ शकेल याचा अंदाज पोलीस खात्याला आलेला दिसतो. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येत वाल्मिक कराड हाच मुख्य सूत्रधार असून खंडणीच्या वादातूनच ही हत्या करण्यात आल्याचा दावा पोलिसांनी दाखल केलेल्या चार्जशीटमध्ये करण्यात आला आहे. खंडणी, ॲट्रॉसिटी आणि संतोष देशमुखांची हत्या ही तिन्ही प्रकरणे एकत्र करुन ही चार्जशीट दाखल करण्यात आली असून या घटना देशमुखांच्या हत्येच्या कटाचाच भाग असल्याचे यामध्ये म्हटले आहे. या हत्येच्या कटामध्ये आरोपी वाल्मीक कराड, विष्णू चाटे, सुदर्शन घुले, प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार, जयराम चाटे, फरार कृष्णा आंधळेचा समावेश करण्यात आला असून नववा आरोपी सिद्धार्थ सोनवणे याचे नाव वगळण्यात आले आहे.

### राजीनामा नको हाकलायला पाहिजे होते

खंडणी, ?ट्रॉसिटी आणि हत्या ही तिन्ही प्रकरणे चार्जशीटमध्ये एकत्रित करण्यात आली आहेत. खंडणीत अडथळा ठरले म्हणून आदर्श सरपंच संतोष देशमुख त्यांची निर्घृण हत्या करण्यात आली. महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्थेचा उडालेला बोजवारा पाहता त्याची नैतिक जबाबदारी स्विकारुन कुणी राजीनामा देण्याची गरज होती? पण ते भाजपच्या नैतिकतेत बसत नाही. मस्साजोगच्या प्रकरणाच्या निमित्ताने अजित पवारांची पुरती बेअब्रू झाली. आपल्या डोळ्यातली पापं इतरांना दिसु नयेत म्हणून डोळ्यावरती महागडा गॉगल घालुन विधिमंडळात प्रवेश करणाऱ्या धनंजय मुंडे यांच्याबद्दल जनमानसात कमालीची घृणा निर्माण झाली आहे. धनंजय मुंडे यांनी वाल्मिक करडला बीडचा अघोषित पालकमंत्री केलं होतं हे हळूहळू स्पष्ट होत आहे. बावनकुळेंच्या मध्यस्थीने धनंजय मुंडे यांनी तडजोडीचा प्रयत्न केला होता. ती बातमी देखील भाजपनेच लिक केली होती. भाजपच्या टेक्निकनुसार धसांसाठी ट्रॅप लावला होता, परंतु उपयोग झाला नाही. त्यातून धसांनाही धडा शिकवायचा होता. पण सुरेश धस त्यातून सहीसलामत सुटले व आपल्या भूमिकेवर शेवटपर्यंत ठाम राहिले. संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो पाहून असंख्य महिला रडताना दिसत आहेत. सरकारला दया येत नव्हती. अख्खा महाराष्ट्र रडतोय, पण या सरकारला दया येत नव्हती. अशा मंत्र्याला लाथ घालून हाकलून द्या. आरोपींना भर रस्त्यात मारा. मारून टाका, यांचे चेहरे झाकू नका. त्यांचे चेहरे दिसले पाहिजेत. लाथ मारून हाकलून द्या अशा विरोधकांच्या संतप्त प्रतिक्रिया आहेत.

### मध्यरात्री खलबतं अन् सकाळी राजीनामा

बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो आणि व्हिडीओ समोर आल्यानंतर महाराष्ट्रातल्या राजकीय घडामोंडींना वेग आला होता. उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या 'देवगिरी' बंगल्यावर रात्री महत्त्वाची महत्वाची बैठक झाली होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः अजित पवारांच्या बंगल्यावर हजर होते. या बैठकीत अजित पवार धनजंय मुंडे आणि सुनिल तटकरेही उपस्थित होते. 'देवगिरी'वर झालेल्या बैठकीत तब्बल दीड तास या चौघांमध्ये चर्चा झाली. शेवटी संतोष देशमुख यांच्या क्रूर हत्येनंतर मंत्री धनंजय मुंडे यांनी अखेर ८२ दिवसानंतर मंत्रिपदाचा राजीनामा दिला. धनंजय मुंडे यांनी त्यांचा राजीनामा स्वीय सहायकाच्या माध्यमातून सागर बंगल्यावर पाठवला होता. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधानभवनाकडे जाण्याची लगबग सुरू होती. त्यावेळी हा राजीनामा त्यांच्यापर्यंत पोहचवण्यात आला आणि मुख्यमंत्र्यांनी हा राजीनामा तातडीने स्वीकारून ते मोकळे झाले. दरम्यान विधानभवनाच्या पायऱ्यांवर विरोधक आणि सत्ताधाऱ्यांनी आंदोलन सुरू केले होते. संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात धनंजय मुंडे यांचा राजीनामा घ्यावा यासाठी विरोधकांनी आंदोलन करून जोरदार घोषणाबाजी केली होती. पण सत्ताधारी मात्र दुसरीकडे समाजवादी पाटीर्चे अबू आझमी यांच्या वक्तव्याचा निषेध म्हणून सत्ताधारी पायऱ्यांवर आंदोलन करत बसले होते. आझमीच्या नावाखाली कॅमेरा दुसरीकडे फिरण्याचा भाजपचा प्रयत्न होता, हे सिद्ध झाले.

# मखान्यासह करा सुपरफूड्सचे सेवन, प्रथिनांची कमतरता होईल दूर



आजकालच्या धकाधकीच्या जीवनात तंदुरुस्त राहणे आणि निरोगी राहणे हे एक आव्हान बनले आहे. तसेच या बदलत्या वातावरणात स्वतःला फिट ठेवणे देखील खूप महत्वाचे आहे. कारण तंदुरुस्त आणि निरोगी राहण्यासाठी पोषक तत्वांनी समृद्ध आहार घेणे खूप महत्वाचे आहे.

प्रथिने हे शरीरासाठी सर्वात महत्वाचे पोषक घटकांपैकी एक आहे, जे स्नायूंना मजबूत देण्यास व हाडांचे आरोग्य सुधारण्यास आणि शरीरात ऊर्जा राखण्यास मदत करतात. मात्र बऱ्याचदा आपण आपल्या आहारात योग्य प्रमाणात प्रथिनांचा समावेश करौ शकत नाही, ज्यामुळे शरीरात त्याची कमतरता निर्माण होते.

तुम्हालाही प्रथिनांच्या कमतरतेवर मत करायची असल्यास तुमच्या डाएटमध्ये मखान्याचा समावेश करा. प्रथिनांसाठी मखाना उत्तम पर्याय असू शकतो. मखान्यामध्ये भरपूर प्रथिने, फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स आढळतात, जे शरीराला अनेक प्रकारे फायदेशीर ठरतात. पण तुम्हाला माहिती आहे का की जर मखाना काही खास गोष्टींसोबत मिसळून खाल्ला तर त्याचे पोषण आणखी वाढते.

**मखानासोबत शेंगदाण्याचे सेवन**

जर तुम्हाला तुमचे स्नॅक्स प्रथिनेयुक्त बनवायचे असतील तर मखाना आणि शेंगदाणे एकत्र भाजून खा. शेंगदाण्यामध्ये प्रथिने आणि हेल्दी फॅटचे प्रमाण चांगले असते, जे शरीराला ऊर्जा प्रदान करतात तसेच स्नायूंना बळकटी देतात.

**मखान्यासह दहीचे सेवन**

दही हे प्रथिनांचा एक उत्तम स्त्रोत मानले जाते. जर तुम्ही दह्यामध्ये मखाना मिक्स करून खाल्ले तर ते केवळ पचनास मदत करत नाही तर चयापचय गतिमान करते.

**दुधासोबत मखाना खा**

रात्री झोपण्यापूर्वी दुधासोबत तुम्ही जर मखाना खाल्ल्यास तुमची हाडे मजबूत होतात आणि शरीराला कॅल्शियम आणि प्रथिने या दोन्ही पोषक तत्वांचा पुरवठा होतो.

**मखान्यात बदाम आणि अक्रोड मिक्स करा**

पौष्टिक नाश्ता करण्यासाठी मखान्यात बदाम आणि आक्रोड नक्कीच मिसळा. या मिश्रणामुळे शरीराला पुरेशा प्रमाणात प्रथिने, ओमेगा-3 फॅटी ॲसिड आणि अँटीऑक्सिडंट्स मिळतात.

■ ■

अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



## जल है तो...

उष्णतेची आलीय लाट
जलसाठे होती
भुईसपाट
पाणी म्हणजे जीवन
समजुन घ्या अर्थ
अन्यथा संभवतो अनर्थ ..

पाण्याचा काटकसरीने
करावा वापर
पुणर्वापरावर
द्यावा भर
तर काही अंशी
दिलासा मिळेल क्षणभर ..!

## भारतात होम फर्निशिंग्सची शेवटच्या टप्प्यापर्यंत सुलभ, शाश्वत डिलिव्हरी देण्यासाठी ईकार्टची आयकियासोबत भागीदारी



**बंगळुरू, ४ मार्च :** ईकार्ट या भारतातील आघाडीच्या ४पीएल पुरवठा साखळीतील एका आघाडीच्या कंपनीने आयकियासोबत भागीदारी केली आहे. त्यामुळे त्यांच्या होम फर्निशिंग बिझनेससाठी शेवटच्या टप्प्यापर्यंत डिलिव्हरी दिल्या जातील आणि आयकियाच्या वेबसाइटवर देण्यात आलेल्या ऑर्डर्स सुलभपणे घरापर्यंत पोहोचू शकतील.
ईकार्टचे मुख्य व्यवसाय अधिकारी मणी भूषण म्हणाले की, ही भागीदारी ईकार्टच्या मोठ्या रिटेल ब्रँड्सना उद्योग दर्जाच्या पुरवठा साखळी उपाययोजना देण्याच्या क्षमतेचे प्रतीक आहे. आयकियाचे स्वप्न अनेक लोकांचे रोजचे आयुष्य अधिक चांगले करण्याचे आहे आणि ईकार्टला या मोहिमेत सहभागी होताना खूप अभिमान वाटतो. आमच्यासाठी ग्राहकांचा आनंद आणि विश्वासार्हतेप्रति अद्वितीय वचनबद्धतेसह पारदर्शकता व शाश्वततेची मूल्ये जपणे महत्त्वाचे आहे. या सहयोगाद्वारे आम्ही आयकिया ज्या जागतिक दर्जाच्या ग्राहक अनुभवासाठी ओळखली जाते ती जास्तीत जास्त ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्नशील असू. आयकिया ग्राहकांचे मननापासून ऐकणे, सहभाग आणि पाठिंबा यांच्याद्वारे ग्राहकांना समाधान देते आणि हे ईकार्टच्या विश्वासार्हता, प्रतिसाद आणि उपाय या तत्वांशी जुळणारे आहे. आम्ही या भागीदारीसोबत ग्राहकांना आनंद देत राहू.
आयकिया इंडियाच्या राष्ट्रीय ग्राहक समाधान व्यवस्थापक सैबा सुरी म्हणाल्या की, उत्तर भारतातील आमच्या विस्ताराच्या केंद्रस्थानी ईव्हीने डिलिव्हरी आहेत. हे पाऊल आम्हाला आमच्या ग्लोबल ईव्ही१०० ध्येयाच्या आणखी जवळ आणेल. आमच्या नवीन बाजारपेठेत ईकार्टसोबत या भागीदारीबद्दल आम्हाला आनंद वाटतो आणि आम्ही एकत्र मोठे होत असताना आयकिया इंडियाच्या विस्तार गाथेला अधिक कार्यक्षमता व शाश्वत माध्यमातून अधिक शाश्वत करण्यासाठी उत्सुक आहोत.
ईकार्ट ४०० पेक्षा अधिक रिटेल ब्रँड्ससाठी एंड टू एंड लॉजिस्टिक्स देते. त्यात शेवटच्या टप्प्यापर्यंत डिलिव्हरी, पार्ट ट्रकलोड (पीटीएल), फुल ट्रकलोड (एफटीएल), गोदामे आणि उद्योगातील प्रथम नावीन्यपूर्ण बाबी जसे ओपन बॉक्स डिलिव्हरी आणि उत्पादनांचा पुनर्वापर यांचा समावेश आहे. त्यामुळे कार्यान्वयन सुलभ आणि पारदर्शक होते. आयकियाचा जागतिक दर्जाचा अनुभव आणि ईकार्टचे उत्तम लॉजिस्टिक्स नेटवर्क एकत्र आणून हा समन्वय भारतात होम फर्निशिंग डिलिव्हरीजची व्याख्या नव्याने करे, त्यांना वेगवान, अधिक हरित आणि अधिक ग्राहक केंद्री करेल.

## सॅमको म्युच्युअल फंड सादर करणार लार्ज कॅप एनएफओ

मुंबई, ४ मार्च : सॅमको ॲसेट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेडने सॅमको लार्ज कॅप फंडसाठी न्यू फंड ऑफर (एनएफओ) सादर केली आहे. ही एक ओपन-एंडेड इक्विटी योजना असून ती लार्ज-कॅप स्टॉक्समध्ये गुंतवणूक करण्यावर केंद्रित असेल. हा एनएफओ ५ मार्च २०२५ ते १९ मार्च २०२५ या कालावधीत सबस्क्रीब्शनसाठी उपलब्ध असेल.
बाजार वरखाली होत असतानाही स्थिरता आणि सातत्यपूर्ण परतावा देत लार्ज-कॅप क्षेत्र गुंतवणुकीसाठी पसंतीचे क्षेत्र राहिले आहे. भारताची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असताना मजबूत पायासह प्रस्थापित व्यवसायांच्या आधारावर लार्ज-कॅप फंडांनी उत्तम कामगिरी दर्शवली आहे. गुंतवणूकदारांना जोखीम आणि परतावा यामधील संतुलन राखावे लागत असताना सुव्यवस्थित लार्ज-कॅप पोर्टफोलिओ दीर्घकालीन संपत्ती निर्माण करण्याचा महत्त्वाचा घटक ठरतो.
हा फंड श्रीमती निराली भन्साळी, श्री. उमेशकुमार मेहता आणि श्री. धवल घनश्याम धनानी यांच्याद्वारे व्यवस्थापित केला जाईल. त्यांचा मूलभूत आणि मोमेंटम-आधारित गुंतवणुकीतील गाढा अनुभव गुंतवणूकदारांना जास्तीत जास्त परतावा मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल.
सॅमको ॲसेट मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेडचे सीआयओ श्री. उमेशकुमार मेहता म्हणाले, लार्ज-कॅप कंपन्या स्थिरता आणि दीर्घकालीन संपत्ती निर्मितीसाठी आदर्श पर्याय आहेत. आमच्या सक्रिय स्टॉक सिलेक्शन प्रक्रियेद्वारे मजबूत मोमेंटम निर्देशांक असलेल्या स्टॉक्सची निवड करून पारंपरिक पॅसिव्ह लार्ज-कॅप स्ट्रॅटेजीपेक्षा अधिक चांगली कामगिरी करणे आमचे उद्दिष्ट असेल. आमच्या शिस्तबद्ध दृष्टीकोनातून जोखीम-आणि त्या अनुषंगाने परतावा यासाठी पोर्टफोलिओ बनवणे सुनिश्चित होते.
सॅमको लार्ज कॅप फंड Nifty 100 Total Returns Index (TRI) शी संलग्न असून भारतातील आघाडीच्या १०० लार्ज-कॅप स्टॉक्स मधील गुंतवणुकीशी जुळणारा मापदंड आहे. किमान ५,००० रु. ची एकरकमी गुंतवणूक आणि किमान १२ हप्त्यांसाठी ५०० रु. ची एसआयपी गुंतवणूक करून यात सहभागी होता येऊ शकते.

## झंकार २०२५ ग्रँड फिनाले : ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल नागपूरमध्ये सर्जनशील प्रतिभेचा भव्य उत्सव

**नागपूर, ४ मार्च :** ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल, लावा, नागपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या झंकार २०२५ ग्रँड फिनालेने प्रतिभा, नृत्य आणि सर्जनशीलतेचा एक अविस्मरणीय उत्सव साजरा केला. तीन स्पर्धात्मक वयोगटांमध्येसब-ज्युनियर (३-५ वर्षे), ज्युनियर (६-९ वर्षे) आणि सीनियर (१०-१४ वर्षे)३०० हून अधिक नोंदण्या मिळाल्या. या कार्यक्रमात सोलो आणि ग्रुप स्वरूपात शास्त्रीय तसेच फ्यूजन नृत्यप्रकारांचे नेत्रदीपक सादरीकरण करण्यात आले. या भव्य अंतिम फेरीत संपूर्ण परिसरातील तरुण नृत्यकलाकारांनी संगीत, नृत्य आणि नाट्याचा रंगतदार मिलाफ सादर केला. काही आठवड्यांपूर्वी सुरू झालेल्या या स्पर्धेचा समारोप एका अविस्मरणीय दुपारी झाला, जिथे उत्कट आणि प्रभावी सादरीकरण पाहायला मिळाले.
ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल नागपूरच्या प्राचार्या सौ. निधी गुप्ता यांनी सांगितले, झंकार २०२५ हा संपूर्ण परिसरातील विद्यार्थ्यांच्या अद्वितीय प्रतिभा आणि सर्जनशीलतेचा एक उत्तम नमुना ठरला. या सादरीकरणे केवळ अप्रतिम होती आणि अशा अविस्मरणीय अनुभवाचा भाग बनल्याचा आम्हाला अभिमान आहे. आमच्या तरुण कलाकारांवर आम्हाला प्रचंड गर्व आहे आणि आमच्या मान्यवर परीक्षकांचे तसेच संपूर्ण शाळा परिवाराचे या कार्यक्रमाला अविस्मरणीय बनवण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल आभार मानतो.
राज्य सांस्कृतिक पुरस्कार प्राप्त आणि भरतनाट्यम-मोहिनीअट्टम नृत्यांगना सौ. रत्नम जे. नायर, उभरती कलाकार सौ. कामाक्षी हम्पिहोळी आणि ख्यातनाम नृत्य दिग्दर्शक चेतन दाशमुखे या प्रतिष्ठित परीक्षकांच्या पॅनेलने कठोर परीक्षण करून सर्वोत्तम प्रतिभेला विजेतेपदासाठी निवडले.
फिनालेमध्ये सर्व वयोगटांमध्ये उत्कट स्पर्धा आणि उत्कृष्ट नृत्यशैली, तंत्र आणि कथा सांगण्याच्या क्षमतेचा भव्य आविष्कार पाहायला मिळाला. सीनियर सोलो परफॉर्मन्समध्ये राहिन्या गुन्हाणे हिने प्रथम क्रमांक पटकावला, तर आरोही सहारे व विहा पंड्या यांनी अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक मिळवला. सुशांत जैस्वाल याला ज्युरी चॉइस पुरस्कार देण्यात आला. ज्युनियर सोलो श्रेणीत आद्या भिसे हिने प्रथम क्रमांक मिळवला, त्यानंतर श्राव्या राऊत आणि कृष्णाई टेकाडे यांनी अनुक्रमे दुसरा आणि तिसरा क्रमांक मिळवला. ज्युनियर ग्रुप परफॉर्मन्समध्ये कृष्णाई टेकाडे आणि श्राव्या राऊत यांच्या जोडीने विजय मिळवला.
ही प्रतिभा शोध स्पर्धा ग्लोबल स्कूल्स ग्रुपची प्रमुख उपक्रम आहे, जी ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूलची मूळ संस्था आहे. गेल्या दहा वर्षांपासून ग्लोबल स्कूल्स ग्रुप जगभरातील युवा प्रतिभेला संधी देत आहे आणि सिंगापूरमध्ये सुरू झालेल्या या स्पर्धेने मोठी लोकप्रियता मिळवली आहे.
झंकार २०२५ ग्रँड फिनालेने केवळ नागपूरमधील युवा नृत्य कलाकारांची प्रतिभा सादर केली नाही, तर ग्लोबल इंडियन इंटरनॅशनल स्कूल नागपूरच्या युवा प्रतिभांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या कटिबद्धतेलाही अधोरेखित केले.

## सॅमसंग पुढील आठवड्यात भारतामध्ये तीन गॅलॅक्सी ए सिरीज स्मार्टफोन्स लाँच करण्यास सज्ज

*गुरूग्राम, ४ मार्च : सॅमसंग पुढील आठवड्यात भारतामध्ये तीन नवीन गॅलॅक्सी ए सिरीज स्मार्टफोन्स लाँच करण्यास सज्ज आहे. गॅलॅक्सी ए भारतातील सॅमसंगची सर्वात यशस्वी स्मार्टफोन सिरीज आहे, जेथे सॅमसंग दरवर्षाला या सिरीजमधील लाखो डिवाईसेसची विक्री करत आहे.*
*गेल्या वर्षी लाँच करण्यात आलेले गॅलॅक्सी ए३५ आणि गॅलॅक्सी ए५५ स्मार्टफोन्सना मिळालेल्या यशानंतर नवीन गॅलॅक्सी ए सिरीज स्मार्टफोन्स लाँच करण्यात येणार आहेत.*
*तरूण ग्राहकांच्या सर्वसमावेशक गरजांची पूर्तता करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या गॅलॅक्सी ए सिरीज स्मार्टफोन्समध्ये नवीन डिझाइन, सुधारित टिकाऊपणा आणि प्रगत सुरक्षितता अशी सर्वोत्तम वैशिष्ट्ये असतील, ज्यामधून विनासायास आणि सुरक्षित युजर अनुभवाची खात्री मिळेल.*
*वर्षानुवर्षे, सॅमसंगने गॅलॅक्सी ए सिरीजमध्ये विविध फ्लॅगशिप वैशिष्ट्ये सादर केली आहेत, ज्यामुळे आधुनिक इनोव्हेशन्स व्यापक युजरवर्गापर्यंत पोहोचण्यास मदत होत आहे. लाँच करण्यात येणरे तीन नवीन गॅलॅक्सी ए सिरीज स्मार्टफोन्स ही परंपरा कायम ठेवतील, ज्यामुळे भारतातील ग्राहकांना अधिक पर्याय मिळतील.*

## सुशीला-सुजीतच्या प्रोमोशनल साँगचे शानदार प्रकाशन

**मुंबई, ४ मार्च :** सुशीला-सुजीत या १८ एप्रिल २०२५ रोजी प्रदर्शित होणाऱ्या बहुप्रतिक्षित चित्रपटाचे प्रसारगीत अर्थात प्रोमोशनल साँग आज एका शानदार समारंभात प्रकाशित करण्यात आले. यावेळी गश्मीर महाजनी आणि अमृता खानविलकर यांनी या गाण्यावर नृत्य सादर केले. पोस्टर, मोशन पोस्टर आणि आता प्रसारगीताचे प्रकाशन झाल्यावर चित्रपटाबद्दलची उत्कंठा वाढली आहे.



माटुंगा येथील रुईया महाविद्यालयात झालेल्या या सोहळ्यात चित्रपटाचे निर्माते स्वप्नील जोशी, मंजिरी ओक, प्रसाद ओक, निलेश राठी तसेच चित्रपटाचे संगीत दिग्दर्शक वरूण लिखते, गायक प्रवीण कुंवर आणि कविता राम, गीतकार मंदार चोळकर, पटकथा-संवाद लेखक अजय कांबळे, नृत्यदिग्दर्शक मेहुल गदानी आणि इतर कलाकार/तंत्रज्ञ उपस्थित होते.
लागेना नंबर, अडचण कशी मी सांगू, घरट्याच्या बाहेर, अजुन किती मी थांबू...कोणीतरी फिरवलंय लिंबू, लागलेत नशिबाचे बांबू, ओढून ताणून हॅन्डल मोडून, पाहीले मारून चार दगड, लचांड झालया, चिऊ ताई चिऊ ताई दार उघड, अंगाशी आलया... असे हे धमाल प्रोमोशनल साँग आहे.
प्रसाद ओक, मंजिरी ओक, स्वप्नील जोशी, सिनेमॅटोग्राफर संजय मेमाणे हे पहिल्यांदाच एकत्र येवून चित्रपटाची निर्मिती करणार आहेत. सोबत निलेश राठी सुद्धा आहेत. प्रसाद ओक दिग्दर्शक आणि संजय मेमाणे सिनेमॅटोग्राफर हे एक यशस्वी कॉम्बिनेशन मानले जाते.
सोनाली आणि स्वप्नील हे थोडेसे वेगळे कास्टिंग या चित्रपटासाठी आम्ही केले आहे. स्वप्नील, सोनालीबरोबर या चित्रपटात अमृता खानविलकरसुद्धा आहे, हे दोन आठवड्यांपूर्वी आम्ही प्रेक्षकांसमोर आणले आणि आता चित्रपटाचे प्रोमोशनल साँग प्रदर्शित करत आहोत. रसिकांनी चित्रपट कधी प्रदर्शित होत आहे, याची विचारणा सुरु केली आहे. आम्हाला खात्री आहे की लोक चित्रपटाला पसंतीची पावती देतील, असे प्रसाद ओक म्हणाले.
चित्रपटाबद्दल बोलताना स्वप्नील जोशी म्हणाले, या आगामी चित्रपटात कित्येक गोष्टी पहिल्यांदाच साध्य होत आहेत. सुशीला-सुजीतच्या नावापासूनच त्याचे वेगळेपण अधोरेखित होते. सोनाली, प्रसाद आणि मी पहिल्यांदाच एकत्र येत असल्याने आमच्यासाठीही हा एक वेगळा अनुभव आहे. आता अमृता आल्याने चित्रपटाला वेगळा ग्लॅमर कोशंट प्राप्त झाला आहे. या सर्वांचा स्वतःचा असा एक चाहता वर्ग आहे. आज प्रदर्शित झालेल्या प्रोमोशनल साँग वरूनसुध्दा चित्रपटाच्या वेगळेपणाची प्रचीती येते.

## आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट

**मुंबई, ४ मार्च :** आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्स ने आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट हा नवा दीर्घकालीन बचत प्लॅन सादर केला आहे, जो ग्राहकांना निश्चित उत्पन्नाची खात्री देतो आणि त्यांना गरजेच्या वेळी पैसे काढण्याची सुविधा देतो.
या प्लॅनमध्ये ग्राहकांना अनेक लवचिक पर्याय उपलब्ध आहेत. निश्चित उत्पन्न कधी सुरू करायचे, निश्चित उत्पन्नाचा कालावधी, परिपक्वतेच्या म्हणजेच प्लॅनच्या मॅच्युरिटीवेळी ठराविक रक्कम मिळविण्याचे स्वातंत्र्य या प्लॅनमध्ये आहे. याशिवाय, यामध्ये जीवन विमा देखील आहे, जो कुटुंबासाठी आर्थिक सुरक्षा प्रदान करतो.
या प्लॅनची खासियत म्हणजे वाढत्या उत्पन्नाचा पर्याय, ज्यात उत्पन्न दरवर्षी ५% चक्रवाढ दराने वाढते. यामुळे महागाईच्या काळात देखील आर्थिक व्यवस्थापन करण्यास मदत होईल.
आयसीआयसीआय प्रुडेंशियल लाइफ इन्शुरन्सचे प्रमुख उत्पादन आणि वितरण अधिकारी अमित पालटा म्हणाले, आमच्या नाविन्यपूर्ण उपक्रमांच्या परिपाठीनुसार आम्ही नेहमीच ग्राहकांसाठी त्यांच्या बदलत्या गरजांनुसार नवीन आणि उपयोगी योजना आणत असतो. आयसीआयसीआय प्रु गिफ्ट सिलेक्ट हा असाच एक प्लॅन आहे, जो ग्राहकांना त्यांच्या आर्थिक उद्दिष्टांनुसार आणि रोख प्रवाहाच्या गरजांनुसार निश्चित उत्पन्नाची हमी देतो.

## अभिसरण २०२५ मध्ये क्सिस बँकेने वन ॲक्सिस सीएसआर व्हिजनचे अनावरण केले ; आणखी २ दशलक्ष कुटुंबांना सक्षम करण्याचा निश्चय

**नागपूर, ४ मार्च :** भारतातील खासगी क्षेत्रातील सर्वात मोठ्या बँकांपैकी एक, ॲक्सिस बँकेने अभिसरण २०२५ चे आयोजन केले आहे. त्यांची भागीदार एनजीओ आणि क्सिस ग्रुपच्या नेतृत्व संघासाठी हा एक बहु-स्टेकहोल्डर उपक्रम आहे. या अंतर्गत राबवल्या जाणारी वन क्सिस सीएसआर व्हिजन, संपूर्ण क्सिस इकोसिस्टममधील सामाजिक प्रभावासाठी एक एकीकृत दृष्टीकोन आहे. हा कार्यक्रम बँकेच्या सीएसआर प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून ओळखला गेला, ज्याने आपला मिशन२ मिलियन उपक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्याचा आनंद साजरा केला आणि शाश्वत उपजीविका, आर्थिक सक्षमीकरण आणि कौशल्य विकासाला चालना देऊन अतिरिक्त २ दशलक्ष असुरक्षित कुटुंबांना आधार देण्याच्या दिशेने मिशन४ मिलियन उपक्रम सुरू केला.



अभिसरण २०२५ मध्ये एस. रामादोराई, चेअरपर्सन, मुनीष शारदा, एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर, ॲक्सिस बँक, विजय मुलबागल, ग्रुप एक्झिक्युटिव्ह स्ट्रॅटेजिक प्रोग्रॅम्स अँड सस्टेनेबिलिटी, ॲक्सिस बँक आणि ७०+ एनजीओ भागीदारांसह ॲक्सिस बँक फाउंडेशन (एबीएफ) चे वरिष्ठ बँक अधिकारी आणि विश्वस्त यांचा उपजीविका निर्मिती, शैक्षणिक परिणाम, आर्थिक समावेश, आरोग्यसेवांची उपलब्धता आणि पर्यावरणीय टिकाव यासाठी नावीन्यपूर्ण उपाय शोधण्यासाठी सहभाग होता. उद्योगतज्ज्ञ अलोका मजुमदार एमडी, ग्लोबल हेड ऑफ फिलान्थ्रॉपी हेड ऑफ सस्टेनेबिलिटी - इंडिया, एचएसबीसी; डॉ. आनंद बंग, सर्चचे जॉइंट डायरेक्टर, टाटा ट्रस्ट आणि महाराष्ट्र सरकारचे सल्लागार; सेल्को फाऊंडेशनचे संस्थापक हरीश हांडे आणि केअरिंग फ्रेंड्सचे सह-संस्थापक निमेश सुमती यांनीही कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीबद्दल त्यांचे विचार मांडण्यासाठी पॅनल डिस्कशनमध्ये भाग घेतला.
या प्रसंगी आपल्या भावना मांडताना, ॲक्सिस बँकेचे ग्रुप एक्झिक्युटिव्ह स्ट्रॅटेजिक प्रोग्राम्स अँड सस्टेनेबिलिटी, विजय मुलबागल म्हणाले, अभिसरण २०२५ म्हणजे आम्ही आजपर्यंत विविध सामाजिक उपक्रमांमध्ये मिळवलेले यश आणि समाजाप्रती आमची अटळ बांधिलकी दृढ करण्याची एक महत्त्वाची घटना आहे. शिक्षण, पर्यावरण, आरोग्यसेवा, उपजीविका आणि क्रीडा यांसारख्या सात प्रमुख स्तंभांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या आमच्या वन ॲक्सिस सीएसआर व्हिजनद्वारे मार्गदर्शित आम्ही सर्व समुदायांमध्ये सर्वांगीण विकास आणि शाश्वत प्रगती करत आहोत,ज्यात आम्ही २०३१ पर्यंत २ दशलक्ष अधिक कुटुंबांना सक्षम बनवण्यासोबतच ग्रामीण आणि असुरक्षित समुदायांमध्ये लवचिकता आणि नेतृत्व सक्षम करण्यासाठी कटिबद्ध असू.

## पीडब्ल्यूने एआय एकीकरणासह पाच स्थानिक भाषांमध्ये नीट/जेईई कन्टेन्ट सादर केले

**नागपूर, ४ मार्च :** फिजिक्सवाला (पीडब्ल्यू) ही शैक्षणिक कंपनी प्रोजेक्ट भारत अंतर्गत भारत बॅचेसच्या माध्यमातून स्थानिक भाषेचा विस्तार करण्यासोबत दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दिशेने पुढाकार घेत आहे. विद्यार्थ्यांच्या यशाला साजरे करणारा पीडब्ल्यूचा वार्षिक प्रमुख इव्हेण्ट विश्वास दिवसमध्ये घोषणा करण्यात आलेला प्रोजेक्ट भारत भाषेमधील अडथळ्यांना दूर करण्यास मदत करण्यासाठी आणि भारतभरातील, विशेषत: ग्रामीण व हिंदी/इंग्रजी भाषा न बोलल्या जाणाऱ्या प्रांतांमधील विद्यार्थ्यांना त्यांच्या स्थानिक भाषांमध्ये दर्जेदार अध्ययन मटेरिअल्स उपलब्ध होण्याची खात्री घेण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे. भारत बॅचेसचा भाग म्हणून लक्ष्य प्रोग्रामचा नीट व जेईई कन्टेन्ट मराठी, बंगाली, गुजराती, कन्नड आणि इंग्रजी या भाषांमध्ये उपलब्ध असेल, तसेच अधिक भाषांमध्ये हे कन्टेन्ट उपलब्ध करून देण्याची योजना आहे. सर्व भारत बॅचेस १० मार्चपर्यंत २० टक्के सूटसह उपलब्ध आहेत.
संशोधनांमधून निर्दशनास आले आहे की, विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेमध्ये संकल्पना उत्तमप्रकारे समजतात व ते उत्तमप्रकारे आत्मसात करतात, ज्यामुळे धारणा व महत्त्वपूर्ण विचारसरणी क्षमतेमध्ये सुधारणा होते.* तसेच, नुकतेच युनेस्को अहवालामधून निर्दशनास आले की जगभरातील ४० टक्के व्यक्तींना त्यांच्या स्थानिक किंवा ओळखीच्या भाषेमध्ये शिक्षण मिळत नाही, ज्यामुळे प्रभावी अध्ययनामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे. पीडब्ल्यू उत्तम अध्ययन अनुभव निर्माण करण्यासाठी आपल्या अध्यापन अनुभवासह एआय-संचालित तंत्रज्ञानाचा वापर करत आहे. प्रोजेक्ट भारत अंतर्गत, सर्व कन्टेन्ट स्थानिक भाषांमध्ये स्क्रिप्ट केला जाईल, डब केला जाईल आणि त्यानंतर एआयसह वाढवला जाईल.



या दृष्टिकोनाचा पीडब्ल्यूचे संस्थापक अलख सर आणि प्लॅटफॉर्मच्या प्रख्यात फॅकल्टीने वैयक्तिकरित्या दिलेल्या व्याख्यानांचा अनुभव पुन्हा देण्याचा मनसुबा आहे. यामधून खात्री मिळते क, विद्यार्थ्यांना पीडब्ल्यूच्या शिक्षकांकडून त्यांच्या स्थानिक भाषांमध्ये (अध्यापनाचे पैलू न गमावता) त्याच दर्जाचे, विश्वसनीय अध्ययन मिळते.
या विस्तारीकरणाबाबत मत व्यक्त करत फिजिक्सवालाचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी अलख पांडे म्हणाले, ''विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता इंग्रजी किंवा हिंदी भाषेमधील त्यांच्या अस्खलतेवरून मोजली जात नाही तर त्यांच्या मातृभाषेत समजल्या जाणाऱ्या संकल्पनांवर असलेल्या आकलनाने मोजली जाते. प्रोजेक्ट भारत हा प्रथम भाषेतील शिक्षणाच्या मागणीला प्रतिसाद देतो. एआय वापरून आम्ही विद्यार्थ्यांना ते प्रत्यक्षात शिक्षकांकडून शिकत असण्याचा अनुभव देण्याचा प्रयत्न करत आहोत. हा उपक्रम अपग्रेड करण्याचा प्रयत्न करत आहे, तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरणात विचार करण्यात आलेल्या आणि माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या स्थानिक भाषांमध्ये शिकण्याच्या संकल्पनेला पाठिंबा देण्याचा प्रकल्प आहे.

## आज का अंदाज

बुधवार ५ मार्च २०२५

### खुल जा सीम सीम

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | ३ | ५ | ८ | ३ | ६ | ८ | ९ |
| ११० | १२० | १४० | २४० | १२० | १५० | १७० | १२६ |
| ३३६ | ३०० | ११३ | ३३० | ३०० | २२२ | २५० | २२५ |
| २२८ | १४८ | २३० | ७९० | २२९ | १२३ | ३४० | ३६० |
| २४ | ३१ | ५१ | ८४ | ३४ | ६२ | ८२ | ९१ |
| २६ | ३४ | ५८ | ८६ | ३५ | ६४ | ८५ | ९४ |
| २७ | ३९ | ५९ | ८० | ३९ | ६७ | ८७ | ९८ |

**५ मार्च : सर्व बाजारांसाठी**

| | | | |
|---|---|---|---|
| ३४ | ४२ | ५३ | ९१ |
| ३३ | ४६ | ५६ | ९४ |
| ३६ | ४७ | ५७ | ९६ |


## भाग्य लक्ष्मीच्या ऐश्वर्या खरेने एका गहन दृश्यासाठी कोल्ड स्टोरेजमध्ये सहा तासांचे चित्रीकरणसहन केले!

**मुंबई, ४ मार्च :** झी टीव्हीवरील 'भाग्य लक्ष्मी' या मालिकेत लक्ष्मीची भूमिका साकारणारी लोकप्रिय टेलिव्हिजन अभिनेत्री ऐश्वर्या खरे हिने अलीकडेच तिच्या कारकिर्दीतील सर्वात कठीण आव्हानांपैकी एक पूर्णकेले. एका महत्त्वाच्या भागात आपल्या गरोदरपणाबद्दलचे सत्य जाणून घेण्यासाठी एका रुग्णालयात गेलेल्या लक्ष्मीला मलिष्का (मेघा प्रसाद) तिथल्या कोल्ड स्टोरेज रूममध्ये अडकवते. चालू कथानकात या दृष्याची महत्त्वाची भूमिका असून त्यामुळे ऐश्वर्याला वास्तववादी आणि भावनिक दृष्ट्या गहन अभिनय साकारावा लागला कारण तिची व्यक्तिरेखा लक्ष्मी ही थंड वातावरणात जीव घेण्या परिस्थितीशी झुंजत होती.
अतिशय थंड असे वातावरण असल्याचा परिणाम निर्माण करण्यासाठी टीमने एक स्टोरेज सेट निर्माण केला आणि त्यात एक फॉग मशीन आणि दाट धुके निर्माण करण्यासाठी लोहानचा वापर केला. धुके जागच्या जागी कायम ठेवण्यासाठी त्यांना एसी देखील बंद ठेवावा लागला. तापमान नियंत्रित असले तरी, उष्ण, धुक्याच्या वातावरणात जवळजवळ सहा ते सात तास घालवणे ही सहनशक्तीची खरी परीक्षा होती. अशा आव्हानात्मक परिस्थितीतही प्रत्येक फ्रेम प्रामाणिक वाटेल याची खात्री करत ऐश्वर्या संपूर्ण वेळआपले लक्ष केंद्रित करून राहिली. क्रूने नियमित ब्रेक आणि वैद्यकीय देखरेखीसह सर्व आवश्यक सुरक्षा उपाययोजना केल्या होत्या.

## राशीभविष्य

**मेष :** काही अपूर्ण कामे पूर्ण झाल्याने मनातील उत्साह व उत्साह वाढेल. ज्ञान आणि विज्ञानाच्या क्षेत्रात तुमच्या बौद्धिक क्षमतेचे कौतुक होईल. उपजीविकेच्या शोधात तुम्हाला तुमच्या शहरापासून दूर जावे लागेल.
**वृषभ :** आज व्यवसायात कोणताही मोठा निर्णय विचारपूर्वक घ्या. नोकरीत अधीनस्थ लाभदायक ठरतील. आयात, निर्यात किंवा परदेशी सेवेशी संबंधित लोकांना अचानक मोठा आर्थिक लाभ होऊ शकतो.
**मिथुन :** हंगामी ताप असलेल्या लोकांना लवकर आराम मिळेल. आज कष्टानंतर व्यवसायात फायदा होईल. वडिलोपार्जित संपत्तीबाबत कोणताही वाद न्यायालयाच्या माध्यमातून सोडवला जाईल.
**कर्क :** आज एखाद्या जवळच्या मित्राकडून तुमचा विश्वासघात होऊ शकतो. कोणतेही महत्त्वाचे काम दुसजयावर सोडू नका. नाहीतर तुमची सगळी मेहनत वाया जाईल. घरात ठेवलेले सामानही चोरीला जाऊ शकते.
**सिंह :** आज तुमचे आरोग्य चांगले राहील. कोणत्याही गंभीर आजाराने त्रस्त असलेल्या लोकांच्या तब्येतीत सुधारणा दिसून येईल. प्रिय व्यक्तीची तब्येत बिघडल्यामुळे कुटुंबात काही चिंता आणि तणाव असेल.
**कन्या :** आज कामाच्या ठिकाणी अनावश्यक वाद होऊ शकतात. कठोर शब्द आणि रागावर नियंत्रण ठेवा. राजकारणात तुम्हाला एखाद्या महत्त्वाच्या मोहिमेची कमान मिळू शकते.
**तुळ :** वैवाहिक जीवनात घटस्फोट किंवा जोडीदारापासून विभक्त होण्याची परिस्थिती असेल. तुमची आर्थिक स्थिती सुधारेल. तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे.
**वृश्चिक :** आज तुमचे आरोग्य चांगले राहील. तुमची खबरदारी तुम्हाला कोणत्याही गंभीर आजारापासून वाचवेल. तुम्हाला नवीन जीवन मिळेल. कुटुंबातील नातेवाईकाच्या तब्येतीची चिंता राहील.
**धनु :** आज तुमची प्रेमसंबंधांमध्ये फसवणूक होऊ शकते. प्रेमविवाहाच्या योजना फसतील. जिव्हाळ्याच्या नात्यात थोडा थंडपणा जाणवेल. तिसजया व्यक्तीमुळे नात्यात तणाव निर्माण होऊ शकतो.
**मकर :** तुमच्या बुद्धीने व्यवसायाचा विस्तार करण्यात तुम्ही यशस्वी व्हाल. काही सामाजिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी तुम्हाला घरापासून दूर जावे लागेल. प्रकृतीकडे लक्ष पुरवा. हयगय करू नका.
**कुंभ :** अनावश्यक धावपळ केल्याने तुम्हाला अशक्तपणा जाणवेल. आज तुम्हाला सरकारमधील उच्चपदस्थ व्यक्तीकडून सहकार्य आणि साहचर्य मिळेल. व्यवसाय विस्ताराच्या योजना यशस्वी होतील.
**मीन :** व्यवसायात अपेक्षित आर्थिक लाभ न मिळाल्याने आज तुम्ही दु:खी व्हाल. बिझनेस ट्रिपला जाऊ शकता. पण अपेक्षित पैसे मिळण्यात काही कमतरता जाणवेल. प्रेमसंबंधांमध्ये पैसे आणि भेटवस्तूंची देवाणघेवाण होईल.

## शब्दकोडे क्रमांक २०५१



**आडवे शब्द :-**
१) मत देणारा
४) बाजारबुणगे
८) मदत
९) सततचे नामस्मरण
१०) लाल डोळ्याचा शुभ्र पांढरा प्राणी
११) वृद्धत्वाने पीडलेला
१२) बढाया मारणारा
१३) मालक
१४) लाकडी जिना
१६) मेहनत, त्रास, कष्ट
१८) होडी
१९) रेशमी कापडाचा एक प्रकार
२१) धुळीचा कण
२२) देश
२४) लक्ष्मी
२६) दुर्गंधी येऊ लागलेला
२८) मृताची क्रिया
३०) जेव्हा
३२) रोकड
३३) विहिरीतून पाणी काढण्याचे जोड साधन
३६) इंद्र
३८) दडविणे
४१) *** पालन, संगोपन
४२) रक्षण करणारा
४४) किंमत, प्रत्येक
४५) कहाणी
४७) जमीन सिमेंटने गुळगुळीत करणे
४८) वल्लरी
५०) महिना
५२) आजूबाजूस
५४) पुष्कळ
५५) मुलगी
५७) सबब, निमित्त
५९) सासरच्या विरुद्ध
६२ ) वाचणारा
६४) औषध
६६) आश्रय, टेका
६७) फूल, पुष्प
६८) रेशमी धोतर
६९) दुसऱ्याच्या मनातील विचार जाणणारा
७१) परका, अपरिचित
७३) त्वचेचे सालपट
(बो भा)
७४) पुरुष
७५) नेहमी, सदोदित
७७) सप्तस्वरातील पहिला स्वर
७८) मुख, तोंड
७९) एक पक्षी
८०) उत्सव

**उभे शब्द :-**
१) टप्पे घेत घेत केलेला प्रवास
२) बारा वर्षांचा काळ
३) अतिशयोक्ती करणे (म्ह.)
४) वाळवी
५) त्या प्रमाणे
६) रात्र
७) राजाची कारकीर्द
८) गुजराथमधील एक धरण
१२) भांडण, चर्चा
१३) नवरा
१५) चांदी
१७) जागविणारा आवाज
१८) आवाज, छंद
२०) एक अधिक एक चतुर्थांश
२३) धोबी
२५) आई (ग्रा)
२७) लक्ष, एक आंकडा
२९) मोठा भूभाग
३१) वणवा
३४) आकाशातून पडणारे हिमकण (अ. व.)
३५) कमीतकमी
३७) द्वेष
३९) अधिकाराचे स्थान, गीत
४०) दुधाचे दही बनविणारा पदार्थ
४३) माफी मागणारा
४५) शिखराचे टोक
४६) खोटी कारणे
४९) वडील
५१) ठेकेदार
५३) संतोष, आनंद
५६) नूतन
५८) पाठवणी
६०) परराष्ट्राच्या बातम्या गुप्तपणे काढणारा
६१) नक्की, खात्रीने
६३) कदर करणारा
६५) हिंमत, धैर्य
६७) परमेश्वर
७०) मोठी टोपली
७१) कबूतर
७२) बैलाच्या नाकात घालण्याचा दोर
७४) सुसर
७६) सेवक, गुलाम

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# राष्ट्रीय कार्यक्रमात जि.प.आरोग्य विभाग राज्यात आघाडीवर

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):

राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमातील निर्देशांकानुसार महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा गुणानुक्रम ठरविण्यात येतो. त्यात अकोल्याचा जि. प. आरोग्य विभाग गतवर्षी ७ वेळा प्रथम क्रमांकावर राहिला आहे.

राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमातील निर्देशांकानुसार डिसेंबर २०२४ चे गुणानुक्रम राज्य स्तरावरून काढण्यात आले. त्यात अकोला जि. प. आरोग्य विभागाने प्रथम क्रमांक मिळविला आहे. जिल्ह्याने एप्रिल ते डिसेंबर २०२४ या ९ महिन्याच्या कालावधीत तब्बल सातवेळा राज्यात प्रथम क्रमांक मिळविला आहे.रष्ट्रीय कार्यक्रमात महत्त्वाच्या काही आरोग्य निर्देशांकाद्वारे संपूर्ण राज्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी ,जिल्हा शल्यचिकित्सक , महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कामाचे राष्ट्रीय कार्यक्रमातर्गत लसीकरण, माता बाल संगोपन, आरसीएच पोर्टल ,आयडीएसपी, एनसीडी ,कुटुंब कल्याण कार्यक्रम ,क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम इत्यादी महत्त्वाचे निर्देशांकाचे गुणानुक्रम राज्यस्तरावरून काढण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी व उपसंचालक आरो ग्य डॉ. कमलेश भंडारी मार्गदर्शनानुसार जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे आणि त्यांचे सहकारी यांनी राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न केले. विभागाकडून नियमित आढावा, पाठपुरावा, प्राथमिक आरोग्य केंद्रांना भेटी देऊन मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कामात सुधारणा करण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी व जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांवर पर्यवेक्षणाची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यानुसार आरोग्य सेवक, सेविका यांच्या कामात सुधारणा आदी कामे साध्य झाली. कार्यात अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशीकांत पवार, माता वाल संगोपन अधिकारी डॉ. विनोद करंजीकर, तालुका आरोग्य अधिकारी ,वैद्यकीय अधिकारी ,सर्व आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका यांचा सहभाग आहे.

# गांधीग्राम कावड यात्रेसाठी आरोग्य सेवांसाठी ५ लाखांच्या निधीची मागणी

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):

श्रावण महिन्याच्या शेवटच्या सोमवारी (दि. १८ ऑगस्ट २०२५) अकोल्यात भव्य पालखी व कावड महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. या धार्मिक सोहळ्यात गांधीग्राम ते अकोला या मार्गावर लाखो भाविक कावड घेऊन पदयात्रा करतात. यात्रेदरम्यान भाविकांना आरोग्य सेवा पुरवण्यासाठी जिल्हा परिषद अर्थसंकल्पातून रु. ५ लक्ष निधीची तरतूद करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते वंचित बहुजन आघाडी चे शहर संघटक निलेश देव यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अकोला यांना लेखी निवेदन दिले आहे. यात्रेदरम्यान मोठ्या प्रमाणात भाविक पायदळ चालत येत असल्याने त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक सुविधा पुरवण्यासाठी ही मागणी करण्यात आली आहे.भाविकांसाठी आरोग्य सुविधा गरजेच्या

गेल्या काही वर्षांत कावड यात्रेत सहभागी होणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. तासन्तास चालणे, उष्णतेचा त्रास, थकवा आणि इतर शारीरिक तक्रारींमुळे अनेक भाविकांना वैद्यकीय मदतीची आवश्यकता भासते. त्यामुळे, यात्रेच्या मार्गावर 'आपला दवाखाना' उपक्रम राबवून मोफ्फत आरोग्य तपासणी, प्राथमिक उपचार आणि औषधोपचार सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

**आरोग्य सेवांसाठी प्रस्तावित सुविधा:**

**मोफत आरोग्य तपासणी केंद्रे:**

यात्रेच्या मार्गावर विविध ठिकाणी तात्पुरती आरोग्य तपासणी केंद्रे उभारण्यात यावीत.

येथे रक्तदाब, तापमान, ऑक्सिजन पातळी आणि इतर प्राथमिक तपासण्या केल्या जातील.यात्रेच्या मार्गावर किमान १० ठिकाणी रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात याव्यात.

आकस्मिक परिस्थितीत रुग्णांना तातडीने रुग्णालयात हलवता यावे.

**वैद्यकीय अधिकारी आणि आरोग्य कर्मचारी:**यात्रेच्या मार्गावर डॉक्टर, परिचारिका, आरोग्य सेवक आणि स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात यावी.आरोग्य दूतांमार्फत भाविकांना वैद्यकीय मदतीबाबत माहिती आणि मदत देण्यात यावी.शासनाच्या 'आपला दवाखाना' उपक्रमाअंतर्गत मोफत वैद्यकीय मदत आणि औषधोपचार सेवा प्रभावीपणे राबवावी. आवश्यक औषधे, प्राथमिक उपचार साहित्य आणि पिण्याच्या पाण्याची सोय केली जावी. अकोल्यातील ऐतिहासिक कावड महोत्सव अकोल्यातील पालखी व कावड महोत्सव ७२ वर्षांची परंपरा असलेला मोठा धार्मिक सोहळा आहे. संपूर्ण महाराष्ट्रासह इतर राज्यांमधून हजारो भाविक यात सहभागी होतात. गांधीग्राम ते अकोला हा २५ किलोमीटरचा मार्ग भाविक पार करतात.या यात्रेदरम्यान भाविकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्यातच आरोग्य समस्या उद्भवल्यास तात्काळ वैद्यकीय मदतीची आवश्यकता भासते. त्यामुळे भाविकांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाने तातडीने निधी मंजूर करावा, अशी मागणी होत आहे.

## राष्ट्रीय महामार्गावर बर्निंग कार



■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):

राष्ट्रीय महामार्गावर एका प्रख्यात कंपनीच्या शोरूम मधून सर्विसिंग करून बाहेर पडलेल्या कार ला अचानक आग लागली.प्राप्त माहिती नुसार कारची सर्विसिंग पूर्ण झाल्यावर कार मालक टेस्ट ड्राइव साठी निघाला होता. तेव्हा अचानक कार ला आग लागली. सुदैवाने कार मध्ये बसलेले सर्व जण सुखरूप बाहेर पडले. अग्निशमन दलाने आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला. परंतु कार जळून खाक झाली. या घटनेत कार मालकाचे बरेच आर्थिक नुकसान झाले. आग लागण्याचे कारण अद्याप गुलदस्त्यात आहे.

# यशासाठी कठोर परिश्रम शिवाय गुणवत्ता गरजेचे:आ.खंडेलवाल

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):

यशासाठी फक्त कठोर परिश्रम पुरेसे नाहीत, गुणवत्तेवर लक्ष केंद्रित करणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे. जर तुमचे उत्पादन किंवा सेवा चांगली नसेल तर तुमची वाढ मंदावेल.म्हणून उत्पादन समवेत गुणवत्ता अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन आ.वसंत खंडेलवाल यांनी केले.मारवाडी बिझनेस नेटवर्किंग फाउंडेशन ऑफ इंडियाची बैठक नुकतीच मोठ्या उत्साहात संपन्न झाली.या बैठकीत आ वसंत खंडेलवाल यांनी व्यवसाय, कौशल्य विकास आणि उद्योजकता यावरील त्यांचे अनुभव सांगितले. आ.खंडेलवाल यांनी तरुणांना कौशल्ये विकसित करण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले की, जरी अभ्यास पूर्ण झाला नाही किंवा पैसे कमी असले तरी योग्य कौशल्ये शिकून करिअर घडवता येते. कौशल्ये केवळ नोकरी मिळविण्यातच मदत करत नाहीत तर स्वतः चा व्यवसाय सुरू करण्यास देखील मदत करतात. नोकरीऐवजी व्यवसायावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. नोकरीत मर्यादित संधी आहेत, तर व्यवसायात प्रचंड शक्यता आहेत. उद्योजकता स्वीकारून तुम्ही



केवळ स्वावलंबी होऊ शकत नाही तर इतरांसाठीही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊ शकता.या वेळी त्यांनी प्रलंबित प्रश्नावर चर्चा केली.अकोला विमानतळाचा प्रकल्प एआय तंत्रज्ञानाने विकसित केला जाईल,जो शहराच्या आर्थिक विकासाला नवीन उंचीवर घेऊन जाईल.ते म्हणाले,आता लोक मोठ्या शहरांमधून लहान शहरांमध्ये स्थलांतरित होत आहेत जिथे व्यवसायाच्या संधी जास्त आहेत आणि खर्च कमी आहे. त्यांनी व्यावसायिकांना या ट्रेंडचा फायदा घेण्यास सांगितले.शेवटी आ खंडेलवाल जी यांनी एमबीएफच्या कामाचे कौतुक केले आणि संस्थेला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी संघाचे अभिनंदन केले.

## अकोला रोडवर अपघाताची मालिका सुरुच बोलेरो पिकप व ट्रॅक्टरचा भीषण अपघात

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):

अपघाताची मालिका सुरूच ट्रॅक्टर व पिकअप ची समोरासमोर जोरदार धडक अकोला रोड वनी वारुळा फाटा आज पहाटे चार वाजता जे दरम्यान ट्रॅक्टर व बोलेरो पिकअप चा अपघात झाला.खापरवाडी रोड वरून निघालेला ट्रॅक्टर वासुदेव पाटील पडोळे राहणार वरुड जऊळका तालुका अकोला जिल्हा अकोला हे चालवत होते.ट्रॅक्टरमध्ये तीन व्यक्ती होते मुंडगाव मार्गे येणारी पिकअप बोलेरो वाहन वारोळा फाट्यावर आमोरासमोर धडक झाली त्यामध्ये वासुदेव पडोळे जखमी झाल्याचे वृत्त आहे. ट्रॅक्टरची मुंडी वेगळे व ट्रॅक्टर वेगळा झाला पिकअप मध्ये वाटाणा भरलेला असल्याचे दिसत होते.जखमीला परस्पर शासकीय रुग्णालयामध्ये अकोला येथे नेण्यात आले वृत्त लिहत पर्यंत ग्रामीण पोलीस स्टेशनला गुन्हा नोंद न झाल्याचे कळते.

# श्री राम उत्सव समितीच्या अध्यक्षपदी विक्रांत देशमुख व संयोजिका दीपिका ठाकुर

■अकोला,दि.४ (प्रतिनिधी):

गांधी चौकात राम देखावा साकार करणाऱ्या रामनवमी उत्सव समितीच्या वतीने यावर्षी पण राम नवमी पर्वात विविध सांस्कृतिक एवं धार्मिक कार्यक्रम आयोजित केले आहेत.समितीच्या अध्यक्ष संदर्भात स्थानीय रामदेवबाबा श्यामबाबा मंदिरात समिती सदस्य व मान्यवरांच्या उपस्थितीत श्रीराम उत्सव समिती २०२५ च्या अध्यक्ष पदी समाजसेवी विक्रांत देशमुख यांची निवड करण्यात आली. यावेळी त्यांना शक्ती स्वरुप हनुमान गदा प्रदान करीत सन्मानित करण्यात आले. समितीच्या महिला शाखेच्या संयोजिका पदी दीपिका ठाकुर व सहसंयोजीका म्हणून रचना तिवारी व निशा कढी यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी नूतन पदाधिकारी वर्गाचे स्वागत करण्यात आले.यावेळी समितीच्या राजश्री शर्मा, सुनिता तिवारी,सुमन गावंडे, भाविका मिश्र,रुचिका इंदौरिया,संगीता शर्मा,निशा कागलीवाल,एड स्नेहल साँवल, राखी सोनोने, रेखा शर्मा,आरती दुबे,अनोखी शुक्ला,मोनिका देशमुख,श्रुति सोनोने,सुनिता तिवारी, रेश्मा शहा, तरुणा खिलोसिया,दुर्गा शर्मा,ऊषा मिश्रा,चंदा शर्मा,ललिता वर्मा,वंदना पारोचे,एड ममता तिवारी,स्वाति अग्रवाल,पूनम



लखन,आशा मंजुलकर,स्वाति मांडेकर, कीर्ति नवलकार,चंचल रूहाटिया,पुष्पा वानखड़े, वैशाली सोनालेकर समेत समिति के वरिष्ठ मार्गदर्शक नितिन खंडेलवाल,एड मोतीसिंह मोहता,पवन पाडय़िा, रामप्रकाश मिश्रा,कमल अग्रवाल,ओमप्रकाश गोयनका, शैलेश खरोटे,बनवारी बजाज,संतोष अग्रवाल, दिलीप खत्री,विजय तिवारी,राधेश्याम शर्मा, संजय सिसोदिया,संतोष गोयनका,किशोर गुजराती,राजेश मिश्रा,दीपक रूहटिया,अभय बिजवे, पंकज कागलीवाल,संजय शर्मा नर्सरी, राजू शर्मा,बालाजी पुरुषोत्तम अग्रवाल, सुनील करनानी, भरतकुमार मिश्रा, शशांक जोशी, श्याम पचौरी, पं.श्रीकांत इंदौरिया,मनोज शर्मा, महेंद्र पंडित, अमरीश शुक्ला,संजय शर्मा,भूषण इंदौरिया,विष्णु वर्मा,राजीव शर्मा,निहार अग्रवाल,संदीप बाथो,उमेश लखन,अरविंद पिंटू मिश्रा,प्रियांश खेलोसिया,अंकुर सुरेका,राजेश शर्मा,राहुल अग्रवाल,ऋषिकेश जकाते,शंकर शर्मा दीपक अग्रवाल,राजेश सोनटक, राजू जोशी,संजय शर्मा,रवि मिश्रा,संजय अग्रवाल राजू डोल्या,जय तिवारी,पंकज टावरी,राहुल लोहिया,दर्पण अग्रवाल,आशू मिश्रा, अमित अग्रवाल,रियांश मिश्रा,सितीश पवार,वीर मिश्रा,दीक्षांत बोरकर, कुणाल ढोरे,चेतन,उज्वल जोशी, आदि उपस्थित होते.

# नेहरु युवा मड़ळाच्या 'पाणेरी पाखराची' अभियानाचे उदघाटन

## सतत सतरा वर्षा पासून अविरत चालू आहे उपक्रम

■मुर्तिजापुर,दि.४ (प्रतिनिधी):

२००७ पासून प्रारंभ झालेल्या नेहरु युवा मंडळ, मुर्तिजापुर च्या 'पाणेरी पाखरांची' या अभियानाचे श्री संत गाडगेबाबा यांच्या जन्मोत्सवांतर्गत मा. कृष्णा दादा अंधारे जिल्हाध्यक्ष रा. कां. पा. अजित पवार गट यांच्या व गाडगेबाबांचे पणतू सतिश भाऊ सनोने यांच्या उपस्थितीत उदघाटन होऊन श्री संत गाडगेबाबा स्मारक बहूउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राहूल भाऊ तिडके यांच्या हस्ते निष्काम कर्मयोगी संत गाडगेबाबा यांच्या वास्तव्याने पुनित पावण बाबांच्या झोपडी परिसरात गौरक्षण येथे झाडावर लावून झाले.

श्री संत गाडगेबाबा यांचा जन्म महाशिवरात्री चा असल्याने मुर्तिजापुर येथिल स्मारक समिती व्दारा गेल्या ३५ वर्षापासून जन्मोत्सव साजरा केला जात असतो. याच जन्मोत्सवात गाडगेबाबांचे दससुत्रीतील दोन



संदेशाचे पालन म्हणून पशू पक्षाऩा अभय आणि पाणि वर लक्ष केंद्रीत करुन नेहरु युवा मंडळ, मुर्तिजापुरचे अध्यक्ष अनिल डाहेलकर याच़्या संकल्पनेतून अविरत चालेल्या अभियानाचे दिवंगत युवा संत भैय्युजी महाराज यांनी करुन पाखरासाठी पाणपोया लावण्याचे आवाहन करुन जणू कौतुकाची थापच दिली.

तर उमेश अलोने यांच्या माध्यमातून झी मराठी ने तेव्हा आपल्या बातमीतून सव्वा चार मिनिटाचे कवरेज देवून या उपक्रमास भारतभर पोहचविण्यास मदत केली तर विदर्भातील सर्वच वृतपत्रांनी ही अबाल वृध्दाप्रयंत पोहचून त्याच्या मनात दया भाव जागृत करुन या अभियानास सफल केले. आता गावोगावी खेडोपाडीच नव्हे तर मोठ मोठ्या शहरात ही लोक पशु पक्षाऩसाठी पाण्याची सोय करतात हेच या आमच्या छोट्याश्या सक़्ल्पित अभिमानाचे मोठे फलित असल्याचे मत अभियानाबाबत माहिती देताना अनिल डाहेलकर यांनी व्यत केले.

# रुईखेड येथे श्री बागाजी महाराज यात्रेनिमित्त भव्य सोहळा साजरा



■अकोट,दि.४ (प्रतिनिधी):

महाशिवरात्रीच्या पवित्र दिवशी सकाळी भव्य कावड यात्रा काढण्यात आली. श्री कपलेश्वर मंदिरातून कावडने आणलेल्या पवित्र जलाने श्री बागाजी महाराजांचा सकाळी दहा वाजता मंदिर परिसरात संस्थान चे विश्वस्त विजय राहणे यांनी कावडदारी यांचे स्वागत व पूजा अर्चाना केले गावातु परिक्रमा काडुन कावड यात्रा फिरल्यानंतर श्रद्धाळू भाविकांनी आपल्या घरासमोर पूजा-अर्चना केली.रात्री श्री बागाजी महाराज यांना कपिलेश्वर येथून आणलेल्या पवित्र जलाने अभिषेक करण्यात आला बुधवार रोजी श्री बागाजी महाराज यांच्या मंदिरात लहान मुलांना सकाळी लोटांगण घातले जाते व दुपारी गावातील बागाजी महाराज भजन मंडळ चा गजरात मोठ्या मुलांचे लोटांगण घालत गावातुन काढले

व रात्री श्री बागाजी महाराज यांचे पुरातन काळातील रथ यात्रा सुरू झाली महिलांनी आपल्या घरांसमोर रंगीबेरंगी रांगोळ्या अकाढून बागाजी महाराज यांच्या रथाचे स्वागत व पूजा अर्चाना केले. नवस फेडण्यासाठी नारळाचे तोरण बांधण्यात आले. यामुळे यात्रेला एक भक्तिमय व पवित्र स्वरूप प्राप्त झाले.यात्रेचा मुख्य आकर्षण म्हणजे गुरुवार दिनांक २८ रोजी श्री बागाजी महाराज भंडारा उत्सव समिती चा वतीने भव्य महाप्रसाद. संपूर्ण गावातील नागरिक एकत्र येऊन महाप्रसादाच्या आयोजनात सहभागी झाले. भक्तगणांनी महाप्रसादाचा लाभ घेतला आणि एकोपा व सामंजस्याचा संदेश दिला.यात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी आकोट ग्रामीणचे पोलीस निरीक्षक किशोर गुनघरे मार्गदर्शनखाली पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता विशेष सहकार्य केले. शिस्तबद्ध वातावरणात यात्रा पार पडली आणि कोणत्याही अनुचित प्रकाराला वाव मिळू न देता भक्तांनी मनसोक्त श्रद्धा व्यक्त केली.रूईखेडची श्री बागाजी महाराज यांची ही केवळ एक उत्सव नसून, ही परंपरा गावातील लोकांच्या श्रद्धेचा व संस्कृतीचा अभिमान आहे. या यात्रेच्या निमित्ताने गावकऱ्यांमध्ये बंधुत्वाची भावना वृद्धिंगत होते आणि संपूर्ण वातावरण भक्तिमय होते.

महाशिवरात्रीच्या दिवशी पासून पवित्र दिवशी रूईखेड यात्रेचा हा भव्य सोहळा भविष्यातही याच भक्तिभावाने साजरा होईल, असा विश्वास भाविकांनी व्यक्त केला.श्री बागाजी महाराज भंडारा उत्सव समिती चा वतीने ग्राम स्वच्छता अभियान राबविण्यात आले व तसेच बागाजी महाराज यात्रेनिमित्त भव्य महाआरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिरामध्ये एकूण १९०० रुग्णांनी लाभ घेतला व तसेच रक्तदान शिबिर मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला रक्त संकलन जिल्हा स्त्री रुग्णालय अकोला शिबिरामध्ये डॉक्टर निखिल धांडे डॉक्टर मयूर व्यवहारे डॉक्टर दर्शन कुलट डॉक्टर परवेज खान यांनी निशुल्क सेवा दिली त्याबद्दल त्यांचे श्री बागाजी महाराज भंडारा उत्सव समितीतर्फे आभार व्यक्त करण्यात आले.

## समृध्दी महामर्गावर अपघातांची समृध्दी

**अकोला** : अलीकडेच प्रयागराज या ठिकाणी झालेल्या कुंभमेळ्यासाठी हजेरी लावण्यास निघालेल्या भाविकांनी प्रवासासाठी समृध्दी महामार्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर केला असला तरी ४७ दिवसात झालेल्या ६५ अपघातात ७ जण मृत्यूमुखी पडले तर ६७ जण जखमी झाल्याच्या घटना नोंद झाल्या आहेत.अपघातांच्या अवघ्या दिड महिन्यात झालेल्या या घटना बघता समृध्दी महामार्गावर अपघातांची समृध्दी असे काहीसे चित्र निर्माण झाले आहे.३९० गावांना जोडणारा आणि अत्यंत कमी वेळात ७०१ कि. मी. चे अंतर पार करणारा असा हा समृध्दी महामार्ग आहे. याच मार्गावर १० जानेवारी ते २६ जानेवारी दरम्यान ५ प्राणांतिक तर दुखापती व किरकोळ स्वरुपाचे २४ अपघात झाले. त्यामध्ये ४४ जण जखमी झाल्याचे आकडेवारी समोर आली आहे. प्रवास विना अडथळा पुर्ण होतो त्यामुळे चालकाची या मार्गाला प्रवासासाठी पसंती असते. लवकर पोहोचता यावे म्हणून चालकाकडून थांबा न घेता अनेक तास पर्यंत वाहन चालविल्या जाते.

**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला**
मुर्तिजापूर रोड, अकोला - 444001
वेब पत्ता : mjp.maharashtra.gov.in
ई-मेल : eemjpda@rediffmail.com

जा.क्र./५८४/२०२५
दिनांक ०४/०३/२०२५

**-- निविदा सुचना --**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला या कार्यालयाकडुन खालील निविदा सुचना मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | निविदा सुचना क्रमांक | कामाचे नांव | कामाची अंदाजीत किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | क्रमांक ६४ सन २०२४-२५ | जल जिवन मिशन अंतर्गत अकोट ८४ गा.प्रा.पु. योजने अंतर्गत रेल, धनकवाडी, ढगा, करतवाडी, कवठा खु., सावरगांव, विटाळी, पुंडा, बांबर्डा, रोहनखेड या गावामधील अस्तित्वातील उंच पाण्याच्या टाक्यांचे Bye Pass तोडुन उंच टाकीव्दारे पाणी पुरवठा करणे | रु. ८,४३,२३२/- |

या उपरोक्त सर्व कामांची निविदा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणा कडुन मागविण्यांत येत आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि.०५.०३.२०२५ पासुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अकोला येथील निविदा शाखेत पाहण्यास निशुल्क उपलब्ध आहेत.

**कार्यकारी अभियंता**
मजीप्रा.विभाग,अकोला.

**विभागीय वन अधिकारी सामाजिक वनिकरण विभाग अकोला यांचे कार्यालय**
कॅशिया पार्क, बिर्ला रोड, रामदासपेठ, अकोला -४४४००१
E-mail ddsfakola@mahaforest.gov.in दुरध्वनी क्र. (०७२४) २४३५०३

**ई-निविदा सुचना**

**क्रमांक :- ०२ सन २०२४-२५**

विभागीय वन अधिकारी सामाजिक वनिकरण विभाग अकोला यांचे वतीने सार्वजनीक बांधकाम विभाग यांचेकडे मजुर सहकारी संस्था यांच्याकडुन खालील कामासाठी B-१ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाज पत्रीत कामाची किंमत (रुपये) | इसारा रक्कम (रु) | निविदा शुल्क | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|
| १. | Providing & Fixing 1.65 High Fencing supported on m.s. Angle post with man gate to Nursery At Degadparwa in Social Forestry Range Barshitakli under Social Forestry Division, Akola. | २९३८७०० | २९३८७ | ५९० | मजुर सहकारी संस्थे मार्फत |

ई-निविदा तपशिलवार माहिती व अटी व शर्ती www.mahatender.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. ईच्छुक कंत्राटदारांनी वरील संकेतस्थळावर भेट देऊन निविदा भरावयाची कार्यवाही करावी.

**ई निविदा प्रसिद्धीचा तपशिल**

| | |
|---|---|
| ई-निविदा प्रसिध्दी | दि.०४.०३.२०२५ सायंकाळी ६.०० वा. |
| ई-निविदा दाखल करण्यास सुरवात | दिनांक दि.०४.०३.२०२५ सायंकाळी ६.०० वा. पासुन |
| ई-निविदा दाखल करण्याचा अंतीम दिनांक | दि.१२.०३.२०२५ सायंकाळी ६.०० वा. पर्यत |
| ऑनलाईन निविदा उघडण्याचा दिनांक /आर्थिक निविदा उघडण्याचा दिनांक | तांत्रिक बिड उघडण्याचा दि.१३.०३.२०२५ आर्थिक बिड उघडण्याचा दि.१४.०३.२०२५ सायंकाळी ६.०० वाजता (शक्य झाल्यास) |

**(एम.सी.खोरे)**
विभागीय वनअधिकारी
सामाजिक वनिकरण विभाग,अकोला.

क्र./विमाका/अम/जाही/११३४

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण नथमलदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्क्वेअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण नथमलदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम बोले फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)






## प्रवास महामानव बनण्याचा

**भा**रतीय संस्कृती उदात्त आणि सर्वसमावेशक मानली जाते. म्हणूनच ऋषीमुनींनी 'वसुधैव कुटुंबकम' ही शिकवण दिली आहे. अवघी पृथ्वी हे आपलं कुटुंब आहे. सगळ्यांशी प्रेमाने वागा, असा त्याचा अर्थ आहे. या शिकवणीकडे आपण बारकाईने पाहत नाही. याकडे वैज्ञानिक दृष्टीकोनातून पाहिलं तर लक्षात येतं की तन आणि मन संतुलित करण्याचा मार्गही या विचारामुळे सूकर होतो. यामुळे माणूस आदर्श वर्तन करू शकतो. या वाक्याचा खोलात जाऊन विचार केला तर बरंच काही लक्षात येऊ शकतं. प्रत्येकाला सामावून घ्यायला हवं, अशी शिकवण आपल्याला 'वसुधैव कुटुंबकम' या संज्ञेमधून मिळते. 'वसुधैव कुटुंबकम'मधून सांगितलेला मूळ भाव जाणून घेतला तर आपण मानवच नाही तर महामानवही बनू शकतो.

भक्ती आणि बोध

माणसाचं शरीर सर्वात मौल्यवान मानलं जातं. सुख असो वा दु:ख, हे शरीर सगळं काही भोगत असतं. सुख-दु:ख, वेदना, विकार, जन्म-मरण हे सगळं शरीर भोगत असतं. प्राणवायूला गीतेत अजर आणि अमर म्हटलंय. शरीराने होणारं एखादं कार्य मनाच्या परवानगीशिवाय पूर्ण होत नाही. आपल्या मनाची सगळी कार्यं ज्ञानेद्रियांच्या आदेशाने होत असतात. माणूस विवेकाने वागला आणि सगळ्या इंद्रियांना एकाच कुटुंबाचे सदस्य मानून ताळमेळ साधण्याचा प्रयत्न केला तर अनेक गोष्टी सुकर होऊ शकतात. असा ताळमेळ साधता आला तर शरीररूपी वसुधेत कोणतेही विकार उत्पन्न होणार नाहीत. मनात एक, डोक्यात एक असं असेल तर शरीरात विकारांचा वास होऊ लागतो. शरीर मन आणि डोकं यांच्या द्वंद्वात अडकून पडतं. यामुळे ताणतणाव निर्माण होतात. विविध अवयवांवर वाईट परिणाम होऊ लागतात. त्यामुळे लहानसहान बाबींसाठी शरीराला त्रास देणं योग्य ठरत नाही. आज जगभरातले अनेक देश भौतिकवादाचा त्याग करून भारतीय जीवनशैलीचा, अध्यात्माचा योगाचा अंगिकार करत आहेत पण आपण इतरांचं अंधानुकरण करत आहोत. शरीराचा त्रास टाळायचा असेल तर अध्यात्मिक मार्गाने चाला. भोगवाद टाळा आणि ज्ञानेंद्रियांवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न करा. यामुळे शरीराचे त्रास कमी होऊ शकतील आणि आपण महामानव बनण्याच्या दिशेने मार्गक्रमण करू.

## फाल्गुनातील वसंतसोहळा

**वर्षातला सर्वात शेवटचा म्हणजे बारावा महिना असलेला फाल्गुन अवतरला आहे. बदलत्या ऋतूपर्वात येणाऱ्या या महिन्याला 'वसंताचा महिना' म्हणूनही ओळखलं जातं, कारण या महिन्यात वसंत अगदी भरात असतो. एकीकडे थंडी परतलेली असते तर दुसरीकडे उन्हाळ्याचं प्रथम चरण असल्याने म्हणावी तशी तलखी जाणवू लागलेली नसते. हा महिना सृष्टीसौंदर्याचा अनुपम सोहळा मांडतो तसंच धार्मिक कृत्यांद्वारे अनोखं पावित्र्यही देतो.**

**का**लचक्र आपल्या गतीने फिरत असतं. त्यात बारा मास आणि सहा ऋतूंचे सोहळे साजरे करताना दिवस कसे जातात हे समजतही नाही. दर वर्षी आपण तेच सण साजरे करतो, पण प्रत्येक वेळी उत्साह, चैतन्य यात तसूभरही अंतर पडलेलं दिसत नाही. याचं महत्त्व कारण म्हणजे आपणही या कालचक्राचाच एक भाग होऊन फिरत असतो. या चक्राचा एक छोटा आरा आपणही असतो. त्यामुळे बदलत्या महिन्यांचे, ऋतूंचे, सणावारांचे पडसाद आपल्या आयुष्यावर पडत असतात. प्रत्येक पिढी या बदलाचा कालसुसंगत अर्थ लावण्यात गर्क असते. या सणांमध्ये जीवनाचं आणि जीवनशैलीचं प्रतिबिंब पाहणं हा आपला लाडका छंद असतो. विविध कलांना, महोत्सवांना, उत्सवपर्वांना बरोबर घेऊन भ्रंमती करत असणारा हा महिन्यांचा काफिला दर वेळी आपल्याला सामोरा येतो आणि आपणही नेहमीच्याच उत्साहाने त्याला सामोरं जातो. आता असंच एक वर्ष आपला निरोप घेण्यास आणि एक नवीन वर्ष आपल्यासमोर येण्यास सज्ज आहे. वर्षातला सर्वात शेवटचा म्हणजे बारावा महिना फाल्गुन अवतरला आहे. बदलत्या ऋतूपर्वात येणाऱ्या या महिन्याला 'वसंताचा महिना' म्हणूनही ओळखलं जातं, कारण या महिन्यात वसंत अगदी भरात असतो. एकीकडे थंडी परतलेली असते तर दुसरीकडे उन्हाळ्याचं प्रथम चरण असल्याने म्हणावी तशी तलखी जाणवू लागलेली नसते. म्हणूनच स्थित्यंतराचं हे पर्व एका आल्हाददायक वातावरणाची अनुभूती देऊन जातं. हा महिना सृष्टीसौंदर्याचा अनुपम सोहळा मांडतो तसंच धार्मिक कृत्यांद्वारे अनोखं पावित्र्यही देतो.

व्रतवैकल्यांच्या दृष्टीने फाल्गुन मास महत्त्वाचा मानला गेला आहे. या महिन्यात भारताच्या विविध भागांमध्ये वेगवेगळे महोत्सव आयोजित होतात. छोट्या-मोठ्या देवळा-राऊळांमध्ये फाल्गुन मासानिमित्त खास पूजा-अर्चना संपन्न होतात. या महिन्यात बरेच सण साजरे होत असले तरी सर्वात लक्षवेधी ठरते ती होळीपौर्णिमा. भारतात हा दिवस धूमधडाक्यात साजरा केला जातोच त्याचबरोबर अन्य दिवसही महत्त्वाचे मानले जातात. फाल्गुन शुक्ल अष्टमी हा असाच एक दिवस. या दिवशी लक्ष्मीची अर्थात सीतेची पूजा केली जाते. फाल्गुनी पौर्णिमेला फाल्गुन नक्षत्र असेल तर हा दिवस विशेष शुभ मानला जातो. या दिवशी भाविक पलंग अथवा बिछाना दान देतात. यामुळे सुभार्याची प्राप्ती होते अशी भाविकांची श्रद्धा आहे. या दानकार्यामुळे सौभाग्याची प्राप्ती होते असाही विश्वास आहे. दक्षिण भारतात फाल्गुनी पौर्णिमेच्या दिवशी 'उत्तिर' नामक एका महोत्सवाचं आयोजन होतं. हा मंदिरोत्सव हे या महिन्यातील प्रमुख आकर्षण असतं. फाल्गुन मासात द्वादशीला श्रवण नक्षत्र असलं तर या तिथीला फाल्गुन श्रवण द्वादशी असं म्हणतात. या दिवशी उपवास केला जातो. दानधर्म करुन हा दिवस साजरा करतात.



हा सगळा काळ वसंतोत्सवाने भारलेला असल्यामुळे रम्य भासतो. सगळीकडे पाना-फुलांचा मोहोर लगडलेला असतो. उत्सव केवळ आनंदासाठी नसून त्यामागे दृष्टीकोन आणि शास्त्रीय बैठक असते. म्हणून या महिन्याला नवोन्मेषाचा महिना म्हणून संबोधलं जातं. या काळात सृष्टी कात टाकून नव्या नव्हाळीने आपले रूप, रंग बदलत असते. एक सुरेल ताजेपणा चराचरात भरून राहिलेला असतो. संपत आलेली थंडी आणि सुरू होणारा वैशाख वणवा याच्या धुसरशा सीमारेषेवर वातावरण रम्य बनतं. त्यात होळी आणि रंगपंचमी हे उत्सव निर्मळतेने आणि विविध रंगांना स्वच्छ अंत:करणाने सामावून घेणारे ठरतात. 'जुने जाऊ दे मरणालागून'सारख्या नाविन्याच्या ध्यास घेणाऱ्या वृत्तीला होळीच्या उत्सवाने चालना मिळते आणि त्यानंतर प्रकटणाऱ्या रंगपंचमीने नवनिर्मितीला रंगीत-संगीत केलं जातं. ही रंगपंचमी किंवा होळी हे मानवाच्या विचारांचे द्योतक आहेत. चांगलं ते घ्यावं, इतरांना वाटावं आणि वाईट ते संपवून टाकावं असा संदेश देणारे हे उत्सव साहजिकच मानवी संस्कृतीच्या इतिहासातले महत्त्वाचे टप्पे म्हणावे लागतील. निसर्ग, त्यात असणारा मानव आणि त्याचे सर्वांशी असणारं सहचर्य यातून उलगडत जाणारं भावविश्व या उत्सवातून लोककला संगीताच्या माध्यमातून उलगडत जातं.

आपल्या बाराही महिन्यातले सणवार त्या त्या ऋतुमानाशी, पर्यावरणाची सांगड घालून साजरे केले जातात. शास्त्र आणि रुढी यांचा मनोहर संगम इथं साधलेला दिसतो. दानधर्माचासुद्धा तसाच समन्वय साधलेला आहे. फाल्गुन महिन्यातल्या सणांची वैशिष्ट्यं पाहिली तर मानवी मनाचा किती सुक्ष्म विचार केलेला आहे याची प्रशंसा करावीशी वाटते. फाल्गुन मासातले सणवार साजरे करताना भारतभर वैविध्य जाणवेल, त्याच्या स्वरूपात थोडा फार फरक आढळेल पण मूळ सूत्र तेच आहे. या महिन्यात विष्णूला संतुष्ट करण्यासाठी तांदूळ, गाय, कृष्णाजिन, वस्त्र यांचे दान देण्याची प्रथा आहे. स्कंध पुराणात पुरुषांनी या कालात एकभुक्त रहावं असं सांगितलं आहे. असे पुरूष स्त्रियांना प्रिय होतात असंही म्हटलं आहे. आधी वर्णन केल्याप्रमाणे पौर्णिमेला फाल्गुनी नक्षत्र असताना चंद्रोदय झाल्यावर रात्र गायन, नर्तन, वादन यात घालवावी. पौर्णिमेला फाल्गुनीयाग करण्याची प्रथाही प्राचीन काळात होती. मानवगृह्यसूत्रात या यागाचे विधान सांगितले आहे. भग आणि अर्यमा देवतांना लाह्यांच्या, अपूपाच्या आहुत्या द्याव्यात. यज्ञयाग, होम, तिळातांदुळाच्या आहुत्या आदी विधी प्राचीन शास्त्रात सांगितले आहेत.

भक्ती विशेष

फाल्गुन महिना लक्षात राहतो तो मुख्यत्वे होळीमुळे. होळी, हुताशनी महोत्सव, शिमगा इत्यादी त्याची नावं आहेत. होळीमधला मूळ शब्द आहे 'सुग्रीष्मक'. फाल्गुन पौर्णिमेपासून पंचमीपर्यंत हा होळीचा उत्सव चालतो. काही ठिकाणी नवमीपासूनच सुरवात होते. हा वसंताच्या आगमनाचा आनंद साजरा करण्याचा उत्सव आहे. वसंताआगमनोत्सवच म्हणा ना ! पौर्णिमेला सर्वत्र होळी पेटवण्याची पद्धत आहे. लहान मुलांना पीडा देणाऱ्या होलिका, होलाका, ढूंढा, पुतना या राक्षसींना अग्नी पेटवून पळवून लावण्याचा हेतू त्यामागे आहे. प्राचीन अग्नीपूजक पूर्वजांच्या परंपरेचा हा अवशिष्ट भाग आहे समजण्यास हरकत नाही.

या महिन्यात बंगालमध्ये 'दोलायात्रा' असते. फल्गु म्हणजे गुलाल, तो कृष्णमूर्तीवर उधळून होळी खेळतात. उत्तर प्रदेशमध्ये लाल, पिवळी वस्त्रं परिधान करून टिपऱ्या खेळतात. महाराष्ट्रात आंबा, केळी, माड, पोफळ, एरंड यांची होळी उभारतात. गोव्यामध्ये होळी केवळ उभी करतात. जाळत नाहीत. ग्रामदेवतेच्या देवळासमोर ती उभी रहाते. उभा वृक्ष हेरून, त्याची यथोचित पूजा करून, त्याच्या फांद्या तोडून तो वाजत-गाजत खांद्यावरून मिरवत गावात आणला जातो. त्याला आंब्याच्या पानांनी सजवतात. टोकावर असोला नारळ बांधतात. कागदी झेंडे लावतात. या महिन्यात महाराष्ट्रात लोक कॉफी, भांग, मद्य, अफू यांचे सेवन करतात. गंजिफा, पत्ते, सोंगट्या यांचे खेळ करतात. गाणी म्हणतात. अनेक प्रकारची सोंगं काढली जातात. गोमूचे नाच होतात. देवाची निशाणे वाजतगाजत घरोघर जातात. राधाकृष्णाचे नाच काढतात, खेळ्ये खेळतात, एकूणच हा नवनिर्मितीचं दिलखुलास स्वागत करण्याचे संकेत देणारा महिना आहे. माणसांच्या मनात असलेल्या सर्व क्षुद्र भावनांना जाळून टाकून रंगाची उधळण करत नवजीवनाचं स्वागत करण्यासाठी सज्ज होण्याचा संदेश आपल्याला फाल्गुन मास देतो ! तेव्हा आपण या मासाचा मनमुराद आनंद लुटू या. पुरणपोळीने आणि नाचगाण्यांनी त्याचे स्वागत करू या. घराबाहेर पडून सृष्टीचं नव्यानव्हाळीचं रूप अनुभवू या.

## घर बांधताना

**स्व**त:च्या हक्काचं घर हे प्रत्येकाचं स्वप्न असतं. आपल्या घरात शांतता नांदावी, ती वास्तू सुख, समृद्धी आणि भरभराट घेऊन यावी, असंही वाटत असतं. यासाठी घरातल्या माणसांसोबतच वास्तूशास्त्राचं योगदान महत्त्वाचं मानलं जातं. घर बांधताना फेंगशुई शास्त्राची मदत घेतली तर अनेक गोष्टी सूकर होऊ शकतात, असं मानलं जातं. म्हणूनच घर घेताना किंवा बांधताना कोणती खोली कुठे असावी, याबाबतचं हे मार्गदर्शन...

वास्तू भक्ती

✻ नव्याने लग्न झालेल्या जोडप्याने घर घेतल्यास शयनकक्ष उत्तर-पश्चिम दिशेला असेल असं बघावं. आयुष्यात महत्त्वाकांक्षा असलेल्या जोडप्यांचा शयनकक्ष दक्षिणेकडे असावा तर काही उद्देश्य साध्य करायची असतील तर शयनकक्ष उत्तरेकडे असावा. विवाहाला बरीच वर्षं झाली असतील तर शयनकक्ष पूर्वेकडे असावा. यामुळे दांपत्य सुखी आणि समाधानी आयुष्य जगू शकेल. पाहुण्यांची खोली उत्तर-पश्चिम दिशेला असावी. झोपताना डोकं दक्षिणकडे करा. दक्षिणेकडे डोकं करून झोपणं शक्य नसेल तर पूर्वेकडे डोकं करून झोपा.



✻ स्वयंपाकघर दक्षिण-पूर्व दिशेला असू द्या. दक्षिण-पूर्व हा अग्नीचा कोपरा मानला जातो. या दिशेला स्वयंपाकघर करणं शक्य नसेल तर उत्तर-पश्चिम, पश्चिम किंवा दक्षिण दिशेला प्राधान्य द्या. दक्षिण-पश्चिम दिशेला स्वयंपाकघर असू नये. यामुळे नातेसंबंधांमध्ये तणाव निर्माण होऊ शकतो. स्वयंपाकघरात सिंक उत्तरेकडे तर फ्रिज उत्तर-पश्चिम दिशेला असावा. मोठी भांडी आणि इतर सामान दक्षिण-पश्चिम दिशेला ठेवावं.

✻ स्नानगृह पूर्व किंवा उत्तर दिशेला असलं पाहिजे. या दिशेला स्वच्छतागृह असू नये. स्वच्छतागृह उत्तर, उत्तर-पश्चिम किंवा पश्चिमेकडे असावं.

✻ उत्तर-पूर्व ही दिशा मानसिक समाधान आणि शांतता देते. या दिशेकडचा कोपरा कायम स्वच्छ असला पाहिजे. या कोपऱ्यात देवघर ठेवता येईल. इथे ध्यानधारणा, योगासनं करता येतील.

## चमत्कारी पातालेश्वर

**भ**गवान शिवशंकराला भोळा सांब असं म्हटलं जातं. ही देवता भक्ताच्या एका हाकेला धावून जाते पण प्रसंगी तांडवनृत्यही करते. भगवान शंकराची अनेक मंदिरं आहेत. प्रत्येक मंदिराचं अनोखं वैशिष्ट्य आहे. बारा ज्योतिर्लिंगांचं महत्त्व तर आपण जाणतोच. भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण करणारा असा शिवाचा लौकिक आहे. म्हणूनच भक्तमंडळी शिवाची मनोभावे आराधना करतात. उत्तर प्रदेशमध्ये मुरादाबाद आणि आग्रा या दोन शहरांना जोडणाऱ्या महामार्गाच्या मध्यावर सदत्बदी हे गाव आहे. या गावात पातालेश्वर मंदिर वसलंय. या मंदिरात झाडू अर्पण केला तर त्वचारोग दूर होतात, अशी भाविकांची श्रद्धा आहे.



पातालेश्वर हे शिवाचं प्राचीन मंदिर आहे. या मंदिरात भक्तांची गर्दी झाल्याचं पहायला मिळतं. त्वचारोगांचा सामना करणारे अनेक भक्त इथे श्रद्धेने येतात आणि शिवाला झाडू अर्पण करतात. यामुळे त्यांना रोगापासून मुक्ती मिळते. भक्तमंडळी समाधानाने आपल्या घरी परत जातात. पातालेश्वर मंदिरासंबंधी एक दंतकथा सांगितली जाते. ती अशी की, भिकारीदास नावाचा एक श्रीमंत व्यापारी होता. त्याला त्वचारोगांनी ग्रासलं होतं. रोगावर उपचार घेण्यासाठी गावातल्या एका प्रसिद्ध वैद्याकडे तो निघाला. वाटेल त्याला तहान लागली. तहानेने व्याकूळ झालेल्या व्यापाऱ्याला एक आश्रम दिसला. तो आश्रमात गेला. इथे ठेवलेल्या झाडूला त्याचा धक्का लागला. झाडूच्या स्पर्शाने व्यापाऱ्याचा त्वचारोग दूर झाला. व्यापाऱ्याच्या दृष्टीने हा मोठा चमत्कार होता. रोगमुक्त झाल्याने व्यापाऱ्याला खूप आनंद झाला. आश्रमातल्या साधूला त्याने पैसे देऊ केले पण साधूने ते नाकारले. या स्थानी मंदिर बांधावं, अशी त्याची इच्छा होती. काही दिवसांनी व्यापाऱ्याने शिवमंदिर बांधलं. या ठिकाणी झाडू अर्पण केल्याने त्वचारोग दूर होतात, अशी श्रद्धा यामुळे दृढ झाली आहे.

तीर्थक्षेत्र

## हे आहेत अवतार

**महाभारत हा अत्यंत प्राचीन असा ग्रंथ मानला जातो. वेद व्यासांनी लिहिलेलं हे महाकाव्य रहस्यमय मानलं जातं. कौरव आणि पांडवांचं युद्ध, द्रौपदी वस्त्रहरण अशा अनेक घटनांमुळे महाभारत गाजलं. महाभारतातलं प्रत्येक पात्र कुणा ना कुणाचा अवतार असल्याचं मानलं जातं. काही पात्रं देवतांचा अवतार होती तर काही गंधर्वांचा. साक्षात श्रीविष्णूनेही श्रीकृष्णाचा अवतार घेऊन महाभारतात महत्त्वाची भूमिका वठवली. महाभारतातलं कोणतंही पात्र सामान्य नव्हतं. महाभारताच्या आदिपर्वात याबाबचा उल्लेख आढळतो. याविषयीची माहिती रंजक आहे.**

**६४** कला आणि अष्टसिद्धींचा अधिपती असलेला श्रीकृष्ण भगवान विष्णूचा अवतार मानला जातो. श्रीकृष्ण मागच्या जन्मी मनू होता, असं मानलं जातं.

✻ बलराम शेषनागाचा अवतार असल्याचं मानलं जातं. बलवान असल्याने त्याला बलभद्र या नावानेही ओळखलं जातं. महाभारताच्या युद्धादरम्यान बलरामाने तटस्थ रहायचं ठरवलं होतं.

✻ द्यु नावाच्या वसूने भीष्माच्या रूपात जन्म घेतला होता. श्रीकृष्णानंतर भीष्म हे महाभारतातलं महत्त्वाचं पात्र मानलं जातं. भीष्माला देवव्रत असंही म्हटलं जातं. वशिष्ठ ऋषींनी दिलेला शाप आणि इंद्राच्या आज्ञेमुळे आठही वसूंची उत्पत्ती शांतनू आणि गंगेपासून झाली. सात वसूंना गंगेतच बुडवण्यात आलं. पण आठवा वसू द्यु जिवंत राहिला. त्याने भीष्मरूपात जन्म घेतला.

✻ अश्वत्थामा हा गुरू द्रोणाचार्यांचा पुत्र. महादेव, यम, काल आणि क्रोध यांच्या एकत्रीकरणातून तयार झालेल्या अंशातून अश्वत्थाम्याचा जन्म झाला होता.

जाणून घ्या

✻ कर्ण सूर्याचा पुत्र होता. कर्णाला सूर्याचा अंश मानलं जातं. कर्ण कुंती आणि सूर्य यांचा पुत्र होता.

✻ दुर्योधन कलियुगाचा अवतार मानला जातो तर इतर कौरव पुलत्स्य वंशाच्या राक्षसाचे अंश मानले जातात.

✻ अर्जुनाला पांडूचा मुलगा मानलं जात असलं तरी तो कुंती आणि इंद्र यांचा पुत्र होता. त्यामुळे इंद्राने कपट करून कर्णाची कवच कुंडलं काढून घेतली होती.

✻ भीम पवनपुत्र होता. हनुमानही पवनपुत्र होता. भीमात १० हजार हत्तींचं बळ असल्याचं मानलं जातं.

✻ युधिष्ठिर हा धर्मराज आणि कुंतीचा पुत्र होता. पाच पांडवांमधला तो ज्येष्ठ भाऊ होता. द्रौपदीसोबतच देविका नावाच्या स्त्रीशी त्याने लग्न केलं होतं.

✻ नकुल आणि सहदेव यांनी दोन अश्विनीकुमारांच्या अंशातून जन्म घेतला होता. नासत्य आणि दस्त्र अशी त्यांची नावं होती.

✻ शकुनी द्वापारयुगातल्या एका अंशातून जन्मला होता.

✻ हंस नावाच्या गंधर्वाने धृतराष्ट्र आणि पांडूच्या रूपात जन्म घेतला.

✻ सिद्धी आणि धृतिका यांनी कुंती व माद्री यांच्या रूपात जन्म घेतला.

✻ मतीने गांधारीच्या रूपात जन्म घेतला होता.

✻ इंद्राणीने द्रौपदीच्या रूपात जन्म घेतला होता.



## काय करू नये?

**रा**मायण हे आदर्श महाकाव्य मानलं जातं. श्रीराम हा मर्यादापुरूषोत्तम आणि आदर्श राजा होता. सीता त्याची कर्तव्यदक्ष पत्नी. लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न यांनी भावांचं कर्तव्य पार पाडलं. रामायणातली पात्रं आदर्श मानली जातात. आजच्या काळातही त्यांचं अनुकरण करण्याचे सल्ले दिले जातात. रामायणात खलनायकी पात्रंही होती. रावण हा मुख्य खलनायक. चरित्र, मर्यादा यांचा विचार केला तर रामायण सर्वश्रेष्ठ मानलं जातं पण रामायणातली प्रत्येक घटना आजच्या काळात लागू होईलच असं नाही. रामायणाचा काळ त्रेतायुगातला. या घटना त्या काळातही अनैतिकच मानल्या गेल्या. उदाहरण द्यायचं झालं तर कैकयीने सावत्र मुलगा रामाला वनवासात धाडलं. अयोध्येचं राज्य भरताला मिळावं यासाठी ती हट्ट धरून बसली. दशरथ राजाने तिला दिलेल्या वचनाचा गैरवापर केला. पण आईने आपल्या मुलांमध्ये कधीही भेदभाव करू नये. यामुळे कुटुंबात दुरावा निर्माण होतो.



बाली हा सुग्रीवाचा मोठा भाऊ. सुग्रीवाने रामाची साथ दिली. बालीने आपल्या मोठ्या भावाच्या पत्नीचं अपहरण करून राणी बनवायचा विचार केला पण अखेरीस बालीचा अंत झाला. श्रीरामाने बालीचा संहार केला. कुकर्मांमुळे त्याला ही शिक्षा मिळाली. वाईट मार्ग आचरू नये, हे या घटनेतून शिकता येईल. भावाची पत्नी किंवा कोणत्याही परस्त्रीवर वाईट नजर ठेऊ नये. परस्त्री मातेसमान मानली जाते. त्यामुळे तिच्याकडे त्याच नजरेने पाहिलं पाहिजे. परस्त्रीवर वाईट नजर टाकणं अनैतिक मानलं जातं. त्याची शिक्षा मिळते. नैतिक आणि चारित्र्याच्या अध:पतनामुळे परस्त्रीवर वाईट नजर टाकली जाते. त्यामुळे आजच्या काळातही परस्त्रीवर वाईट नजर टाकू नये. मुद्दे बाळबोध असले तरी बोलके आणि सदासर्वकाळ मार्गदर्शक ठरणारे आहेत.

धर्मग्रंथातून...

## मोक्ष मिळवण्यासाठी

**श्री**मद्भगवत गीता हा हिंदूधर्मीयांचा धर्मग्रंथ. कुरूक्षेत्रावर लढाई करत असताना श्रीकृष्णाने अर्जुनाला गीतोपदेश केला. गीतेतला उपदेश आजच्या जगातही लागू पडतो. आजही आपण या मार्गाने चालू शकतो. यातील एका श्लोकानुसार ही चार कामं करणाऱ्या मनुष्याला स्वर्गप्राप्ती होते. अशा माणसाची सगळी पापं नष्ट होऊन त्याला मोक्ष मिळतो. नरकयातना टळतात, असं सांगण्यात आलंय. म्हणूनच माणसाने ही चार कामं केली पाहिजे. याविषयी जाणून घेऊ...

✻ दानेन तपसा चैव, सत्येन च दमेन च। ये धर्ममुवर्तन्ते ते नरा: स्वर्गामिन:।। हा गीतेतला श्लोक आहे.

✻ गरजूंना दान द्यावं. दानामुळे आपलं पुण्य वाढतं. आपलं दान गुप्त असावं. याची वाच्यता किंवा गवगवा करू नये. उजव्या हाताने केलेल्या दानाबद्दल डाव्या हातालाही कळता कामा नये असं आपली संस्कृती सांगते. सत्पात्री दानामुळे सगळ्या पापांचा नाश होतो.

करा स्वमदत

✻ मन नियंत्रणात ठेवणं गरजेचं आहे. आयुष्यात महत्त्वाकांक्षा असावी पण यामुळे मनाचं संतुलन ढासळायला नको. आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी माणूस कोणत्याही थराला जाऊ शकतो. त्यामुळे मनावर नियंत्रण ठेवणं सर्वाधिक गरजेचं आहे.

✻ कायम सत्याचा मार्ग अवलंबायला हवा. खोटं कधीही बोलू नये. सत्याचा मार्ग कितीही कठिण असला तरी तो आपल्याला ध्येय गाठण्यास मदत करतो. असत्य वागणारी आणि असत्याची कास धरणारी व्यक्ती पापाची धनी बनते. त्यामुळे कायम खरं बोललं पाहिजे.

✻ परमेश्वराची आराधना करणं गरजेचं आहे. देवाची आराधना करणाऱ्या व्यक्तीवर देवदेवता लोभ ठेवतात. दिवसातला काही काळ देवाच्या आराधनेसाठी दिल्याने सगळ्या समस्या दूर होतात. समस्येतून बाहेर पडण्याचा मार्ग मिळतो आणि यशही मिळतं. नामस्मरणाने पापांपासून मुक्ती मिळते.



# काँग्रेस कार्यकर्त्यांच्या संतापाचा उद्रेक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

रस्ते, रस्त्यावरील खड्डे, पिण्याचे पाणी, अस्वच्छता तसेच घर कर आणि पाण्याचे देयक यासंदर्भातील अनेक समस्या आहेत. त्या सोवडण्यात महापालिका प्रशासनाला अपशय आले आहे. त्याविरोधात शहर काँग्रेसने आज, मंगळवारी महापालिका कार्यालयासमोर निदर्शने केले आणि कार्यालयातील कुंड्या फोडून निषेध नोंदवला. यावेळी कार्यकर्त्यांनी हातात फलक घेऊन महापालिका मुदार्बादच्या घोषणा दिल्या.

शहरातील विविध समस्यांवरून आमदार विकास ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. त्यानंतर महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अजय चारठनकर यांना निवेदन देण्यात आले. महापालिकेत सुमारे चार वर्षांपासून प्रशासक राज आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना विविध कामे करवून घेण्यात अडचणी निर्माण होत आहे.

प्रशासकाकडून नागरिकांना योग्य दिलासा देण्यात विलंब होत आहे. महागाई प्रचंड वाढल्याने जनता त्रस्त आहे आणि महापालिका घर कर आणि पाण्याच्या दरात सवलत देत नाही. पाण्याचे देयक कमी करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. तसेच चोवीस

### महापालिकेतील फुलांच्या कुंड्या फोडून निषेध



तास पाणी पुरवठा योजना नागपुरात सुरू असताना अजूनही अनेक भागात पुरेसा पाणी पुरवठा होत नाही. उन्हाळ्याची चाहूल लागताच काही भागात पिण्याच्या पाणीची समस्या निर्माण झाली आहे. अनेक वस्त्यांमध्ये मलनिस्सारण वाहिन्या फुटल्या आहेत. रस्त्यावर खड्डे आहेत. याकडे महापालिका प्रशासनाचे दुर्लक्ष झाले आहे.

पश्चिम नागपूर विधानसभा मतदारसंघात अनेक प्रभागात पाणी मिळत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. या आंदोलनात प्रदेश व्यापारी सेल प्रमुख व सरचिटणीस अतुल कोटेचा, सचिटणीस उमाकांत अग्निहोत्री, कमलेश समर्थ, संजय महाकाळकर, प्रशांत धवड, संजय दुबे, संदेश सिंगलकर, शहर उपाध्यक्ष प्रा. दिनेश बानाबाकोडे, बंडोपंत टेंभुर्णे, अरुण डवरे, कोमल गजभिये, अक्षय समर्थ, महिला पदाधिकारी नॅश अली, नंदा देशमुख, सुकेशनी डोंगरे, अनिता ठेंगरे यांच्यासह अनेक कार्यकर्ते सहभागी झाले होते.

शहरातील अनेक ठिकाणी अतिक्रमण करून शो रुम सुरू उघडण्यात आल्या आहेत. महापालिका त्यांच्यावर कारवाई करत नाही. मात्र, हातठेले, फेरीवाले रस्त्यावर फिरतात त्यांच्याविरुद्ध कारवाई केली जाते. त्यांचे साहित्य जप्त केले जाते. दुकानदारांकडून वसूली केली जाते, असा आरोप यावेळी आंदोलकांनी केला.

## कोरटकरची डॉक्टरेट पदवी बोगस असल्याचा संशय

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्याबद्दल वादग्रस्त वक्तव्य करीत इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना अश्लील शिवीगाळ करणारा कथित पत्रकार प्रशांत कोरटकर याचे एक-एक कारनामे समोर येत आहे.

पीएचडी केल्याचा आव आणत स्वतःला डॉक्टर संबोधणारा प्रशांत कोरटकर याची डॉक्टरेट पदवीसुद्धा बोगस असल्याचा संशय निर्माण झाला आहे. त्याने एका खाजगी विद्यापीठाकडून घेऊन मानद डॉक्टरेट मिळविली असून त्या संस्थेला विद्यापीठ अनुदान आयोगाची मान्यताच नाही. अशा स्थितीत नियमानुसार कोरटकर हा कुठल्याही दृष्टीने स्वतःला डॉक्टर असल्याचे संबोधू शकत नाही. मात्र, गेल्या पाच वर्षांपासून तो डॉक्टरेट अशी बिरुदावली मिरवत फिरत असल्याची चर्चा सुरु आहे.

मार्च २०२० मध्ये कथित पत्रकार आरोपी प्रशांत कोरटकरला भारत व्हर्चुअल युनिव्हर्सिटीकडून मानद डॉक्टरेट मिळाली. त्यानंतर तो नावासमोर डॉक्टर लिहून मिरवायला लागला. त्याचे व्हिजिटिंग कार्ड, फेसबुक, इंस्टाग्राम त्याचप्रमाणे पत्रव्यवहारातदेखील तो ह्यडॉ.ह्न असे नावासमोर लिहू लागला. आरोपी कोरटकर याचे अनेक कारणाने समोर आल्यामुळे त्याच्या डॉक्टरेट या पदवीबद्दल अनेकांना उत्सूकता होती.

डॉक्टर असल्याचे सांगून तो अनेक कार्यक्रमात प्रमुख पाहुणा म्हणून मिरवायचा. विद्यापीठातील अनेक प्राध्यपकांच्या शेजारी बसून तो उच्चविद्याविभूषित असल्याचा आव आणायचा. मात्र, त्याच्या डॉक्टरेट पदवीबाबत चाचपणी केली असता धक्कादायक प्रकार समोर आला.

आरोपी कोरटकरने भारत व्हर्चुअल युनिव्हर्सिटीकडून मानद डॉक्टरेट मिळविली आहे. संबंधित विद्यापीठातून ही डॉक्टरेट मिळविण्याचे कुठलेही अधिकृत मापदंड नाहीत. यासाठी कुठलीही पात्रता परीक्षा होत नाही किंवा कुठलेही संशोधन तसेच संबंधित क्षेत्रात अत्युच्च दर्जाचे कामदेखील अपेक्षित नसते. एकीकडे पीएचडी मिळविण्यासाठी उमेदवार दिवसरात्र एक करून अभ्यास व संशोधन करतात. मात्र, दुसरीकडे कोरटकरसारख्या प्रवृत्ती अर्थपूर्ण व्यवहार आणि राजकीय नेत्यांचा दबाव आणून डॉक्टरेटचा मान विकत घेतात. छत्रपती शिवराय व छत्रपती संभाजी महाराजांचा अपमान करणाऱ्या कोरटकरकडून स्वतःला उच्चविद्याविभूषित दाखविण्याचा हा प्रयत्न असून राज्याचे शिक्षणमंत्री व शासकीय यंत्रणा याची दखल घेईल का असा सवाल उपस्थित होत आहे. आरोपी कोरटकरचे पदवीपर्यंत शिक्षण झाले असून त्याने अर्थपूर्ण संबंध जोपासून डॉक्टरेट मिळविल्याची चर्चा जोर धरु लागली आहे.

आरोपी प्रशांत कोरटकर हा नेहमी आयपीएस दर्जाच्या पोलीस अधिकाऱ्यांच्या गर्दीत मिरवायचा. त्यांच्यासोबत फोटो काढून फेसबुक आणि इंस्टाग्रामवर पोस्ट करायचा. पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करुन देण्यासाठी गृहमंत्रालयापर्यंत आर्थिक व्यवहार करायचा, असे आता अनेकजण बोलू लागले आहेत.

## वकीलानेच केला चिमुकलीवर अत्याचार

■ महासागर प्रतिनिधी
भंडारा, दि. ४ :

शेजार धर्माला काळिमा फासणारी संतापजनक घटना शहरातील एका सोसायटीत घडली. एका वकिलाने त्याच्या मुलीला खेळायला बोलवायला आलेल्या शेजारच्या एका ११ वर्षीय मुलीला खोटे बोलून घरात घेतले आणि तिच्यावर अत्याचार केला.

याप्रकरणी भंडारा पोलीस ठाण्यात लैंगिक अत्याचारासह पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल करत पोलिसांनी नराधमाला तासाभरातच बेड्या ठोकल्यात. विजय रेहपाडे असे अटक करण्यात आलेल्या नराधमाचे नाव असून तो व्यवसायाने वकील आहे.

पीडितेच्या आईंच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे. आई आणि १३ वर्षीय भावासोबत राहते. पीडित मुलीचे वडील शासकीय नोकरीत असून ते नोकरीनिमित्त दुसऱ्या ठिकाणी राहतात. पीडिता आणि आरोपी विजय रेहपाडे याची मुलगी समवयस्क असल्याने दोघींमध्ये मैत्री झाली. मागील काही महिन्यांपासून दोघींचे एकमेकींच्या घरी येणे-जाणे आहे. दोघीही सोसायटीचे परीसरात सोबत खेळत असतात.

घटनेच्या दिवशी दिनांक ३ मार्च रोजी पीडिता रोजच्याप्रमाणे सायंकाळच्या सुमारास सोसायटी परिसरात खेळण्याकरीता गेली. मात्र अर्धा तासातच ती घरी रडत रडत परत आली. त्यावेळी आईने ती का रडत आहे? असे विचारले.

मात्र तिचे रडणे थांबत नसल्याने आईने तिला बेडरुममध्ये नेले आणि रडण्याचे कारण विचारले. त्यावेळी पीडित अल्पवयीन मुलीने आईला आपबिती सांगितली.

पीडित मुलीने आईला सांगितले की, ती खेळण्याकरीता सोसायटी परिसरात गेली मात्र तिथे तिला तिची मैत्रीण दिसली नाही. त्यामुळे ती तिच्या मैत्रिणीला बोलाविण्याकरीता घरी गेली. त्यावेळी फ्लॅटचे दार मैत्रिणीचे वडील आरोपी विजय रेहपाडे याने उघडले. पीडीतेने तिची मैत्रीण घरी आहे का? अशी विचारणा केली असता आरोपी विजय रेडपाडे याने घरात खेळत आहे असे खोटे बोलून पीडित मुलीला घरात घेतले आणि बेडरुममध्ये जाण्यास सांगितले. त्यानंतर घरी कुणीही नसल्याचा फायदा घेत विजय रेडपाडे या नराधमाने त्या अल्पवयीन मुलीवर अतिप्रसंग केला.

तिने त्याला प्रतिरोध केला मात्र वासनांध नराधमाने तिला सोडले नाही. अखेर तिने त्याच्या तावडीतून कशीबशी स्वतःची सुटका करून घेतली. त्यानंतर ती रडत रडत घरी आली आणि आईला रेहपाडे याने केलेल्या दुष्कृत्याचे कथन केले. आईने ताबडतोब पोलीस ठाणे गाठले आणि विजय रेहपाडे यांच्याविरोधात तक्रार दाखल केली.

कायद्याच्या आधारे लोकांना विविध प्रकरणातून सुटका करून देणाऱ्या या वकिलाला कायद्याचे भान राहिले नाही आणि त्याने स्वतःच्या मुलीच्या वयाच्या चिमुकलीला वासनेची शिकार केले. या घटनेमुळे संतापाची लाट उसळली असून या नराधमाला कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी केली जात आहे.

## वकीलांना ३० जून पर्यंत काळा कोट न घालण्याची मुभा

■ महासागर प्रतिनिधी, संग्रामपूर, दि. ४ :

पक्षकारांनी न्यायालयात बाजू मांडणाऱ्या वकिलांना आपल्या पेशाची ओळख व्हावी ह्यासाठी न्यायालयात विशेषतः काळ्या कोट मध्ये रहावे लागते,परंतु उन्हाळ्यात जाड अश्या काळ्या कोटमुळे उन्हाळ्यात काळ्या कोटमुळे उकाड्याचा त्रास होवू नये, यासाठी १ मार्च ते ३० जून पर्यंत वकिलांना काळा कोट न घालण्याची मुभा देण्यात आली आहे.

काळा रंग सूर्यप्रकाश शोषून घेत असल्यामुळे उन्हाळ्यात काळ्या रंगाचे कपडे वापरणे शक्यतो टाळले जाते. त्या अनुषंगाने सिव्हिल मॅन्युअलच्या प्रकरण २२ मधील परिच्छेद ६३६ नुसार वकिलांना काळा कोट वापरण्यास सूट मुभा देण्यात आली असून, काळ्या कोटचा वापर ऐच्छिक असेल. पुरुष वकिलांसाठी पांढरा शर्ट, काळी किंवा राखडी रंगाची पँट, काळा टॉय किंवा पांढरा बँड तर महिला वकिलांसाठी पांढरी किंवा सौम्य रंगाची साडी, सलवार कुर्ता अथवा काळी पँट, पांढरा शट, पांढरा पँट असा पेहराव असेल.

## बेदम मारहाण करीत तरूणीवर अतिप्रसंगाचा प्रयत्न

■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. ४ :

गावालगतच्या जंगलात शौचास गेलेल्या तरुणीला बेदम मारहाण करीत अतिप्रसंगाचा प्रयत्न केल्याची घटना शिवणी गावात उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे अज्ञात नराधमाद्वारे बेदम मारहाणीत पीडित तरुणी बेशुद्ध झाली असून, तिला उपचारार्थ नागपूर येथील खासगी रुग्णालयात हलविण्यात आल्याची माहिती आहे.

गडचिरोली पोलिस ठाणे हद्दीतील शिवणी गावातील २२ वर्षीय तरुणी सायंकाळच्या सुमारास गावालगतच्या जंगल परिसरातील खुल्या जागेत शौचास गेली होती. ती एकटी असल्याची संधी साधून अज्ञात व्यक्तीने बेदम मारहाण करीत तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. या मारहाणीत ती बेशुद्ध पडल्याने आरोपीने घटनास्थळावरून पळ काढला. इकडे शौचास गेलेली तरूणी एक ते दीड तास होवून परत न आल्याने कुटुंबियांनी तिचा शोध सुरू केला. दरम्यान, काही अंतरावर ती बेशुध्दावस्थेत आढळून आली. तिच्या शरीरावर जखमा आढळून आल्या. कुटुंबियांनी पीडित तरूणीला जिल्हा रूग्णालयात उपचारार्थ दाखल केले. तेथे प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी नागपूरला हलविण्यात आल्याची माहिती आहे.

**बयाणानंतर गुन्हा दाखल...**

घटनेनंतर पिडीतेला बेशुद्धावस्थेत जिल्हा सामान्य रुग्णालयात आणण्यात आले. तिचे बयाण घेणे शक्य झाले नाही. पीडितेला नागपूर येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले आहे. गडचिरोली शहर पोलिसांचे एक पथक पीडितेचे बयाण घेण्यासाठी नागपूरला रवाना करण्यात आले आहे. बयाणानंतरच गुन्हा दाखल करण्यात येईल.

**रेवचंद सिंगनजुडे, ठाणेदार, गडचिरोली**

## लोकमानस

### : मुलखावेगळी माणस :

## मुंबईकर निखिलची शीळ घुमली



शिटी वाजवणे हे असभ्य, टपोरी वर्तन समजले जाते. मात्र, जगात शिस्तप्रिय देश म्हणून ओळखल्या जाणारा जपान या देशात शिटी वाजवणे ही एक परफॉर्मिंग आर्ट आहे. जपानमध्ये जगभरातील व्हिसलर्सचं 'वर्ल्ड व्हिसलर्स कन्व्हेन्शन २०१८' नुकतेच पार पडले. या स्पर्धेत मुंबईकर निखील राणे या तरुणाने सलग दुसऱ्यांना भारताला चॅम्पियनशिप मिळवून दिली आहे.

हिकीफुकी या प्रकारात त्याला चॅम्पियनशीप मिळाली असून यात वाद्य वाजवत शिटी वाजवायची असते. दोन वर्षांपूर्वी म्हणजेच २०१६ मध्ये निखिलने 'वर्ल्ड व्हिसलर्स कन्व्हेन्शन'मध्ये सहभाग नोंदवत भारताला पहिल्यांदा चॅम्पियनशिप मिळवून दिली. विजयाची हीच परंपरा कायम राखत यंदाही निखिलने भारताचे नाव जागतिक पातळीवर पुन्हा उंचावले आहे. 'वर्ल्ड व्हिस्टलर्स कन्व्हेंशन'मध्ये इस्त्राइल, कॅनडा, जपान, चीन, कोरीया, अमेरिका, स्पेन, ऑस्ट्रेलिया, व्हेनेझुएला आदी देशांचा सहभाग होता.

सादरीकरणात निखीलने 'शोले' या सिनेमातील 'मेहबूबा मेहबूबा' हे गाणं शिट्टीतून वाजवले होते. यावेळी त्याने दरबुका, कहॉन बॉक्स, खंजिरी, पियानिका आणि घुंगरू ही वाद्ये देखील वाजवली.

निखीलच्या शिट्टी वाजवतानाची पद्धत ही मूक अर्थात 'सायलेंट व्हिसल' आहे. जगात 'सायलेंट व्हिसल' वाजवणारे केवळ दोन कलाकार आहे. त्यातील एक म्हणचे बॉस्टनचा जेफरी एमॉस आणि दुसरा निखिल राणे. मुंबई, ताडदेवचा रहिवाशी असलेला मध्यमवर्गीय कुटुंबातील निखिलने आपल्या अंगी असलेल्या कलेच्या बळावर संपूर्ण जगाचे लक्ष स्वतःकडे वेधून घेतले आहे. वयाच्या आठव्या वर्षापासून निखील 'सायलेंट व्हिसल' वाजतो. सर्वसाधारणपणे शिटी वाजवण्यासाठी ओठांचा चंबू करावा लागतो. परंतु, निखील मात्र ओठांची कोणतीही हालचाल न करता कंठातून शीळ फुंकतो.

संगीताची आवड असल्यामुळे त्याने आपल्या शिटीला सुरांची साथ दिली. पाच वर्षे त्याने शास्त्रीय संगीताचे देखील शिक्षण घेतले आहे. घरची परिस्थितीत बेताची असल्यामुळे त्याने कॉलेज शिक्षणाबरोबर अनेक ठिकाणी संगीताचे कार्यक्रमही केले आहेत. यातून मिळणाऱ्या मानधनातून तो स्वतःचा खर्च स्वतः करत असे. निखील आरजे म्हणूनही काम करतो.

जगात मान्यता असलेल्या या कला प्रकाराला भारतात मानाचे स्थान मिळावे अशी अपेक्षा आहे. आपल्या भारताचा कानाकोपरा विविध कलाप्रकारांनी नटलेला आहे. आपल्याला फक्त त्यांना कलेच्या मुख्य प्रवाहात आणायचे आहे. भारतात शिटी वाजवण्याच्या कलेला देखील परफॉर्मिंग आर्टचा दर्जा मिळावा यासाठी माज्यासारख्या व्हिसलर्सचे प्रयत्न सुरू आहेत. माझं आजचं यश माझ्या कुटुंबीयांना आणि भारतीय तिरंग्याला समर्पित आहे. ■ ■

## टोयोटा किर्लोस्करचे वॉटर युनिट्स

समुदाय कल्याण आणि समाजाला ते परत देण्याच्या त्यांच्या सततच्या वचनबद्धतेच्या अनुषंगाने, टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने म्हैसूर जिल्ह्यात जल शुद्धीकरण युनिट्सच्या उद्घाटनाची घोषणा केली. या कार्यक्रमाला कर्नाटक विधान परिषदचे सदस्य डॉ. यतींद्र सिद्धरामय्या आणि टीकेएमचे वरिष्ठ नेतृत्व सुदीप दळवी, मुख्य संप्रेषण अधिकारी, वरिष्ठ उपाध्यक्ष आणि राज्य व्यवहार प्रमुख - टोयोटा किर्लोस्कर मोटर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

सुरक्षित आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, सार्वजनिक आरोग्य वाढवणे आणि जलजन्य रोग रोखण्याच्या वचनबद्धतेसह, टीकेएमने २०२४-२५ आर्थिक वर्षासाठी म्हैसूर जिल्ह्यात अत्याधुनिक जल शुद्धीकरण युनिट्स स्थापित केले आहेत. या नवीनतम तैनातीसह, या स्थापनेचा फायदा होतो आणि समुदाय कल्याणात लक्षणीय सुधारणा करणाऱ्या ३,९८,८७० हून अधिक लोकांना सकारात्मक परिणाम होतो.

प्रत्येक युनिटमध्ये सहा-टप्प्यांचे प्रगत शुद्धीकरण प्रक्रिया आहे, ज्यामध्ये रिअल-टाइम वॉटर मॉनिटरिंग सिस्टम आहे जी टोटल डिसॉल्व्ड सॉलिड्स (टीडीएस) सारख्या प्रमुख पॅरामीटर्सचा मागोवा घेते आणि उच्च टीडीएसने दूषित पाणी असलेल्या समुदायाच्या गरजा पूर्ण करते. याव्यतिरिक्त, ही प्रणाली सौर ऊर्जा, अखंड वापरासाठी बॅकअप पॉवर सोल्यूशन्स आणि कार्यक्षम सांडपाणी व्यवस्थापन यंत्रणेने सुसज्ज आहे, ज्यामुळे उर्जेचा वापर कमीत कमी करताना इष्टतम पाणी वितरण सुनिश्चित होते. एकूण ७५०० लिटर/तास पाणी शुद्धीकरण क्षमता विकसित केली गेली आहे. ■




### : वाद संवाद :

## बदलत्या काळानुसार वर्तमानपत्र मुद्रित असावीत की डिजिटल?

■ **अमेय गोगट, डिजिटल संपादक**

एक काळ असा होता की समाजाला दिशा देण्यासाठी वर्तमानपत्रांची सुरवात झाली. संपादकांचे विचार ही वाचकांसाठी पर्वणी असायची आणि याच विचारधारेमुळे समाजात बदल घडायचे. तेंव्हा आपला बहुतेक भारतीय समाज हा नवसाक्षर मोठ्या प्रमाणत होता त्यामुळे अगदी आता पर्यंत वर्तमानपत्र मुद्रित स्वरूपात वाचकांना देणे हि गरज होती. मात्र आता आजच जग हे सर्वार्थाने डिजिटल बनलेले आहे. प्रत्येकाला स्मार्ट फोनने स्मार्ट बनविले आहे त्यामुळे आता कोणतेही वर्तमान पत्र ऑनलाईन अगदी सहज उपलब्ध होत आणि वाचता देखील येत. बदलत्या नव्या काळाची हीच गरज आहे. डिजिटल वर्तमानपत्रामुळे कागदाची निर्मिती करण्याकरिता जी मोठ्या प्रमाणात झाडांची कत्तल होते ती देखील थांबवता येईल म्हणजेच पर्यावरणाच्या दृष्टीने देखील डिजिटल वर्तमान पत्र हीच अनुकूलता आहे.

■ **मीनल जोगळेकर, पत्रकार**

काळ कितीही बदलला आणि तंत्रज्ञानामध्ये कितीही बदल झाला तरी सकाळी आपल्या प्रत्येकाच्या घरात येणार वर्तमानपत्र आणि त्यामध्ये वाचायला मिळणाऱ्या बातम्या या गोष्टीला पर्याय असू शकत नाही. आजही आपल्या देशात लाखो वाचक हे आपली पहिली पसंती हातात पडणाऱ्या मुद्रित स्वरूपातील वर्तमानपत्रालाच देतात.

डिजिटल स्वरूपातील ऑनलाईन वर्तमानपत्र हि सातत्याने साद्यन्त वृत्तांत देणारी असली तरी पेपर वाचनाची,ठराविक कॉलम शोधण्याची,शब्दकोडे सोडविण्याची, संपादकीय वाचण्याची अशा कितीतरी गोष्टींची सवय जडलेल्या लोकांची मुद्रित वर्तमानपत्रालाच पसंती असेल हे नक्की. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## टॉवरला गळफास घेत प्रेमीयुगुलाची आत्महत्या

■ महासागर प्रतिनिधी, चंद्रपूर, दि. ४ :

वीज टॉवरला दोरीने गळफास लावून प्रेमीयुगुलाने आत्महत्या केल्याची घटना ब्रह्मपुरी तालुक्यातील उचली शिवारात उघडकीस आली. रोहित रमेश लिंगायत (२५, रा. उचली) आणि १४ वर्षीय मुलीने आपली जीवनयात्रा संपवली.

उचली येथील रोहित लिंगायत याचे चांदली येथील एका अल्पवयीन मुलीसोबत प्रेमसंबंध जुळले. ती भंडारा जिल्ह्यातील एका वसतिगृहात राहून नववीचे शिक्षण घेत होती. तिचे आई-वडील मजुरी करतात. काही दिवसांपूर्वी वसतिगृहातून ती घरी आली होती.

तिचे वडील मजुरीला तर आई घरकामात व्यग्र असताना रोहित हा २६ फेब्रुवारीला सकाळी दुचाकीवर तिच्या घरासमोर आला. घराबाहेर बोलावून तिला दुचाकीवर बसवून पळवून नेले. आई-वडिलांनी तिच्या मोबाइलवर संपर्क केला. मात्र तो बंद आढळून आला. त्यामुळे त्यांनी ब्रह्मपुरी पोलिसांत तक्रार केली.

दरम्यान, उचली शिवारातील वीज टॉवरला गळफास लावून दोघांनी आत्महत्या केल्याचे काही नागरिकांना आढळून आले. ही माहिती पोलिसांना दिल्यानंतर मृत प्रेमीयुगुलाची ओळख पटली. दरम्यान, दोघांच्या आत्महत्येचे कारण पोलिस शोधत आहेत.

## सरकारच्या कृत्यामुळे महाराष्ट्राची मान खाली

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ४ :

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सपकाळ यांची टीका



संतोष देशमुख यांच्या हत्येची छायाचित्रे आणि व्हिडिओ पोलिसांसह सरकारकडे असताना त्यांनी धनंजय मुंडेंच्या बचावाची भूमिका घेतली. सरकारच्या या कृत्यामुळे महाराष्ट्राची मान शरमेने खाली गेली आहे. मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पदावर राहण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे, अशी टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

हर्षवर्धन सपकाळ पुढे बोलताना म्हणाले की, धनंजय मुंडेंच्या राजीनामा घेतला म्हणून सरकार आपली पाठ थोपटून घेऊ शकत नाही. देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, संतोष देशमुख हत्या प्रकरण सरकारला दाबायचे होते. या टोळीला सरकारचा पाठिंबा होता असे दिसून येत आहे. या अमानवी कृत्यांचे सगळे फोटो, व्हिडिओ, पुरावे सुरुवातीपासून पोलिसांकडे होते म्हणजेच गृहमंत्री व सरकारकडे होते. या सैतानांच्या टोळीची अमानवी कृत्यांची संपूर्ण माहिती असूनही दोन महिने सरकार धनजंय मुंडेंना वाचवण्याचा प्रयत्न करत होते.

**सरकारचा कातडी बचाव प्रयोग यशस्वी होणार नाही**

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, आता आपली कातडी वाचविण्यासाठी मुंडेंनी राजीनामा द्यावा अशी मुख्यमंत्र्यांची भूमिका होती अशा बातम्या पसरवून अंग झटकण्याचा प्रयत्न मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडून सुरु आहे. हा त्यांचा कातडी बचाव प्रयोग यशस्वी होणार नाही, त्यांचे सत्य जनतेसमोर आले आहे. हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, देशमुख कुटुंबियांच्या लढ्याला जनता आणि माध्यमांनी दिलेली साथ यामुळे या प्रकरणातील सत्य उजेडात आले. अन्यथा हे प्रकरण दडपण्यात सरकार यशस्वी झाले असते.

## मायाश्री इंडस्ट्रीज गृपला कायमस्वरूपी काळ्या यादीत टाका

### देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडेची प्रधान सचिवांकडे मागणी



■ महासागर प्रतिनिधी
देसाईगंज दि. ४ :

जिल्ह्यात हंगाम-२०१७ पासुन सीएमआर मिलींगमध्ये मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होत आहे. देसाईगंज येथील मायाश्री इंडस्ट्रीज स्थानिक अधिकारी कर्मचाऱ्यांना हाताशी धरून अनियमितता करीत असली तरी संबंधितावर कारवाई करण्यात आली नाही. मायाश्री इंडस्ट्रीज गृपच्या घोटाळ्याची सखोल चौकशी करून संबंधित राईसमिलला कायमस्वरूपी काळ्या यादीत टाकण्याची मागणी देसाईगंज सिटीझन फोरमचे अध्यक्ष किशोर कऱ्हाडे यांनी केली असून, यासंदर्भात राज्याच्या अन्न नागरी पुरवठा विभागाच्या प्रधान सचिवाकडे तक्रार केली आहे

पणन हंगाम-२०१७-१८ मध्ये कुरखेडा येथील शासकीय गोदामात मायाश्री राईस इंडस्ट्रीने जमा केलेल्या तांदळाची तत्कालीन तहसीलदार डी.टी. सोनवाने व निरिक्षण अधिकारी बारदेवार यांनी चौकशी केली असता मानवाला खाण्यास अयोग्य तांदूळ आढळून आला. प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठविण्यात आले. त्यावेळी कारवाईचे आदेश देण्यात आले. नंतर मायाश्री राईस इंडस्ट्रीज व मायाश्री फुड इंडस्ट्रीज यांचा मानवी खाण्यास अयोग्य तांदूळ गडचिरोली येथील नागरिकांनी पकडला होता. त्यावेळी ६८ हजार ४६० रुपयाचा दंड ठोठावला होता. तत्कालीन विधानपरिषद सदस्य डॉ. परिणय फुके यांनी सभागृहात लक्षवेधी लावली होती. आमदार प्रविण दरेकर यांनीही कारवाईची मागणी करीत पत्र दिले होते.

देसाईगंज येथील मायाश्री राईस इंडस्ट्रीज, मायाश्री फुड इंडस्ट्रीज व मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीज मधुन फुड कार्पोरेशन ऑफ इंडियाच्या टिमने तपासणीकरीता तांदळाचे नमुने घेतले असता या तीन मिलचा एकुण ९१.३ मेट्रिक टन तांदूळ मानवी खाण्यास अयोग्य आढळून आला होता. याप्रकरणी चौकशी आणि कारवाईचा अहवाल सादर करण्याचे आदेश अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय मुंबई येथूप सहसचिव सुधिर तुगांर यांनी दिले होते. तसेच संबंधित विभागाचे कक्ष अधिकारी यांनीही तिनही मिलवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते.

मात्र तत्कालीन जिल्हाधिकारी संजय मिणा व तत्कालीन प्रभारी जिल्हा पुरवठा अधिकारी दर्शन निकाळजे यांनी संबंधित राईसमिलर्स सोबत संगनमत करून त्यांचेवर कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळे उपरोक्त राईसमिलर्स सोबत भरडाईचे करारनामे करून संगनमताने भरडाई मध्ये गैरव्यवहार सुरु आहे.

मायाश्री राईस इंडस्ट्रीज व मायाश्री ॲग्रो इंडस्ट्रीज हे उष्मा तांदुळ तयार करणारी राईसमिल असून शासकीय धानापासून उष्मा तांदूळ तयार करून खुल्या मार्केटमध्ये विकत आहेत. त्या बदल्यात काळ्या बाजारातील मानवी खाण्यास अयोग्य, निकृष्ठ तांदूळ पुरवठा विभागातील अधिकाऱ्यांशी संगनमत करून शासकीय गोदामात जमा करीत आहेत.

त्यांनी शासनाकडून भरडाई करीता किती धानाची उचल केली? खुल्या बाजारातुन किती धान खरेदी केले? पणन हंगाम २०२१ पासून भरडाई करीता किती वीज खर्च केली? याची सखोल चौकशी केल्यास वास्तविकता समोर येऊ शकते. उपरोक्त तिनही राईसमिल एकाच परिवारातील असून पुरवठा विभागातील अधिकारी, आदिवासी विकास महामंडळ तसेच मार्केटिंग फेडरेशन कार्यालय गडचिरोली येथील अधिकाऱ्यांना हाताशी धरून शासनाला मानवी खाण्यास अयोग्य तांदळाचा पुरवठा करीत आहेत

शासनाची कोट्यवधी रुपयाने फसवणूक करीत असल्याने संबंधित राईसमिलला कायमस्वरुपी काळ्या यादीत टाकण्यात यावे तसेच शासनाची फसवणूक करीत असल्यामुळे फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी कऱ्हाडे यांनी केली आहे.